# घटक १: अनुभवकथन : लेखनप्रकाराची संकल्पना आणि स्वरूप

## अनुक्रमणिका


१.० उद्दिष्टे
१.१ प्रास्ताविक
१.२ विषयविवेचन
    १.२.१ साहित्याचे स्वरूप आणि वर्गीकरण व्यवस्था
    १.२.२ अनुभवकथन: संकल्पना आणि स्वरूप
    १.२.३ अनुभवकथनपर लेखनाची वैशिष्ट्ये
    १.२.४ अनुभवकथनपर लेखनाची मराठीतील परंपरा
    १.२.५ संपत देसाई : सामाजिक कार्य आणि लेखन
१.३ समारोप/ सारांश
१.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ
१.५ स्वयं-अध्ययन प्रश्न आणि उत्तरे
१.६ लघुत्तरी प्रश्न सारांश
१.७ दीर्घोत्तरी प्रश्न
१.८ टीपा लिहा.
१.९ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ / पुस्तके


## १.० उद्दिष्टे

विद्यार्थी मित्रहो, प्रस्तुत घटकाच्या अभ्यासातून आपल्याला-

१. अनुभवकथन या लेखनप्रकाराची संकल्पना आणि स्वरूप समजून घेता येईल.
२. अनुभवकथन या लेखनप्रकाराची वैशिष्ट्ये सांगता येतील.
३. इतर लेखनप्रकारांहून अनुभवकथन या प्रकाराचे वेगळेपण अभ्यासता येईल.
४. अनुभवकथनपर लेखन करण्याच्या दृष्टीने त्यासाठी आवश्यक लेखनकौशल्ये समजून घेता येतील.

## १.१ प्रास्ताविक

विद्यार्थी मित्रहो,

साहित्याचे कविता, कथा, कादंबरी, नाटक, आत्मचरित्र, निबंध, लघुनिबंध असे अनेक प्रकार केले जातात. साहित्याच्या अभिव्यक्तीच्या वैशिष्ट्यानुसार हे प्रकार केले जातात. अनुभवकथनपर लेखन हादेखील अशाच पद्धतीचा एक वैशिष्ट्यपूर्ण लेखनप्रकार आहे. साहित्य जीवनाच्या अनेक पैलूंचा शोध घेते आणि एका कलात्मक रूपात त्यांना अभिव्यक्त करते. अनुभवाच्या वेगवेगळ्या शक्यतांचा मागोवा घेत जगण्याचा अफाट आवाका सतत कवेत घेण्याचा प्रयत्न करते. जगण्याच्या गुंतागुंतीला भिडण्याचा आग्रह धरते आणि त्यातूनच अनुभवाकडे पाहण्याची एक मर्मदृष्टी आपल्याला देते. त्यामुळे साहित्याचा अनुभव, आस्वाद आणि अभ्यास एक व्यक्ती म्हणून आपल्या धारणा अधिक निकोप करणारा, आपल्या जाणिवा समृद्ध करणारा असतो. परंतु त्यासाठी साहित्याकडे पाहण्याची सजग अशी दृष्टी विकसित होत जाणे गरजेचे असते. अन्यथा साहित्याविषयीचे आणि पर्यायाने जीवनाविषयीचे आपले आकलन सदोष आणि एकारलेले राहण्याची शक्यता असते. उत्तम साहित्य जगण्याच्या ज्या मूलभूत भानाकडे आपल्याला नेऊ पाहते ते समजून घेण्यासाठी वाचक म्हणून स्वतःला घडवत नेणे आवश्यक असते. साहित्याचे समतोल आकलन ही प्रयत्नसाध्य गोष्ट असते. प्रस्तुत घटकातून आपल्याला अनुभवकथन या लेखनप्रकाराची संकल्पना आणि स्वरूप समजून घ्यायचे आहे. साहित्याचे त्याच्या अभिव्यक्तीच्या स्वरूपानुसार कविता, कथा, कादंबरी, नाटक, निबंध असे अनेक प्रकार केले जातात. अनुभवकथनपर ललित गद्य हादेखील अशाच प्रकारचा एक महत्त्वाचा लेखनप्रकार आहे. साहित्याचे हे प्रकार किंवा वर्गीकरणव्यवस्था समजून घेणे साहित्याच्या अभ्यासाला मदत करणारे ठरते. साहित्याच्या रूपबंधाविषयीची, रचनेविषयीची एक समज या अभ्यासातून तयार होत असते. म्हणूनच साहित्याचे स्वरूप आणि साहित्याचे प्रकार यांचे स्वरूप समजून घेणे साहित्याभ्यासात महत्त्वाचे ठरते.

## १.२ विषयविवेचन

### १.२.१. साहित्याचे स्वरूप आणि वर्गीकरण व्यवस्था

साहित्य आपल्या सशक्त अशा भाषिक संरचनेतून मानवी जगण्याचे अत्यंत सूक्ष्म असे पैलू आविष्कृत करते. मानवी जीवनव्यवहार, माणसांचे परस्परांशी आणि सृष्टीशी असणारे नाते, माणसाचे मनोविश्व आणि वर्तनव्यवहार यांचे चित्रण, विश्लेषण, अर्थनिर्णयन आणि सर्जनशील भाष्य करणाऱ्या भाषिक अभिव्यक्तीला स्थूलमानाने साहित्य असे म्हटले जाते. 'सहित' ह्या विशेषणापासून साहित्य हे भाववाचक नाम बनलेले आहे. एकत्र असणे, बरोबर असणे, असा त्याचा शब्दशः अर्थ आहे. शब्द आणि अर्थ यांचे एकत्र अस्तित्त्व 'साहित्य' या शब्दामधून दर्शवले जाते. साहित्यात शब्द आणि अर्थ हे एकमेकांत मिसळलेले असतात, एकजीव झालेले असतात. त्यांची एकसंधता हेच साहित्याचे

प्रमुख लक्षण मानले जाते. इंग्रजीतील ए. सी. ब्रॅडली या समीक्षकाने साहित्याची ‘व्हेअर साउंड अँड मीनिंग आर वन’ अशी व्याख्या केली आहे. त्यातूनही शब्द व अर्थाची ही एकरूपताच अधोरेखित केली गेली आहे. शब्द म्हणजे ध्वनी किंवा अक्षरांचा गट , वर्णसमूह असा विस्तार होत अशा अनेक शब्दसमूहांचे बनणारे वाक्य व वाक्यसमूहांतून व्यक्त होणारा आशय असा व्यापक अर्थ शब्द या संकल्पनेत सामावलेला आहे. संवेदनांची, विचारांची, कल्पनांची एकसंध अशी रचना असाही अर्थ या संज्ञेत दडलेला आहे. अशा व्यापक अर्थांनी शब्द व अर्थ यांची एकरूपता साहित्य या शब्दात अभिप्रेत आहे. साहित्य हा शब्द इंगजीतील लिटरेचर (literature) या शब्दाला पर्याय म्हणून वापरला जातो. मूळ 'Littera’ या लॅटिन शब्दापासून ‘लिटरेचर’ हा शब्द तयार झाला. Littera ही संज्ञा प्राचीन असून तिचा अर्थ वर्णमालेतील अक्षर किंवा अक्षरे, असा होतो. काळाच्या ओघात लिटरेचर ह्या संज्ञेला अनेक लेखक, तत्त्वज्ञ, समीक्षकांनी अर्थांची वेगवेगळी परिमाणे दिली. त्यामधून या संज्ञेचा अर्थविस्तार होऊन ती अधिक व्यापक, सखोल आणि बहुआयामी बनली. अर्थात काही तज्ज्ञांनी 'जे जे लिहिले जाते असा सर्वच लिखित मजकूर म्हणजे साहित्य’ अशी काहीशी अतिव्याप्त व्याख्या करण्याचा प्रयत्न केला. तर काहींनी केवळ अभिजात म्हणजे श्रेष्ठ अशा वैश्विक साहित्यालाच साहित्य असे म्हणावे असा आग्रह धरला. अशा दोन्हीही टोकाच्या भूमिका साहित्य या संज्ञेचा योग्य अर्थ समजून घेण्यासाठी स्वीकारार्ह ठरत नाहीत. या दोन्ही भूमिकांचा समन्वय साधता आल्यास साहित्य या संकल्पनेचे अधिक निकोप आकलन हाती लागू शकेल. या दोन्ही भूमिकांचा संदर्भ घेत साहित्याचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे करता येऊ शकते-

**१. ललित साहित्य**

ललित साहित्य हे लेखकाच्या सर्जनशील आणि बौद्धिक क्षमतेमधून आणि त्याच्या कल्पनाशक्तीतून निर्माण होते. ललित म्हणजे सौंदर्यपूर्ण अथवा कलात्मक. ललित साहित्याला वास्तवातील व्यक्ती, घटना, प्रसंग, तपशील ह्यांचा पायाभूत आधार असला तरी त्यातून साकारणारा अनुभव ही लेखकाची स्वायत्त अशी कल्पित अभिव्यक्ती असते. त्यामुळे ललित साहित्य हा व्यक्तिनिष्ठ, आणि सर्जनशील अशा संवेदनदृष्टीतून निर्माण होणारी रचना किंवा रूपबंध असतो. सौंदर्यनिर्माण आणि कलात्मक जाणिवेतून ललित साहित्य आकार घेते. त्यातून मांडला गेलेला आशय आणि त्याची प्रत्यक्ष संरचना अशा दोन्ही स्तरावर ही कलात्मकता काम करते. काव्य, कथा, कादंबरी, नाटक हे ललित साहित्याचे प्रमुख प्रकार आहेत. ललितबंध किंवा मुक्तगद्य हेही ललित साहित्याचाच भाग असतात. सर्जनशील कल्पनाशक्ती, वाङ्मयीन रचनेचे कौशल्य, सूक्ष्म निरीक्षण क्षमता आणि जीवनाचे मौलिक असे अर्थनिर्णयन करणारी प्रज्ञा यातून उत्तम ललित साहित्य आकाराला येते.

**२. ललितेतर साहित्य**

वाचकाला विशिष्ट विषयाची विशेषतः वास्तवाची माहिती पुरवणारे, त्याचे वेगवेगळ्या ज्ञानशाखांविषयीचे कुतूहल शमवणारे,त्यातील अद्ययावत असे ज्ञान देणारे साहित्य म्हणजे ललितेतर

साहित्य असे म्हणता येईल. ललितेतर साहित्यात कल्पित गोष्टींच्या आविष्काराला फारसे स्थान नसते. वास्तवाचे वर्णनात्मक किंवा तपशीलवार विश्लेषण यांनाच त्यात वाव असतो. विविध ज्ञानशाखांमधील वैचारिक, शास्त्रीय, संशोधनपर, चर्चाचिकित्सात्मक, तत्त्वमीमांसक अशा विविध प्रकारच्या साहित्याचा समावेश ललितेतर साहित्यात केला जातो. तत्त्वज्ञान, अर्थशास्त्र, मानववंशशास्त्र, समाजशास्त्र, मानसशास्त्र अशा विविध सामाजिक शास्त्रांमधील तसेच मानव्यविद्याविषयक ग्रंथ, पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, प्राणिविज्ञान, वनस्पतिविज्ञान अशा वैज्ञानिक विषयांमधील शास्त्रीय माहिती देणारे, त्याविषयी चर्चा करणारे ग्रंथ, संशोधनपर, वैचारिक अशा सर्व लिखाणाचा ललितेतर साहित्यात समावेश केला जातो. हे साहित्य वस्तुनिष्ठ, बुद्धिप्रेरित, तर्क आणि अनुमानावर आधारित असते. त्यामुळे त्यांतील मांडणी तर्काधारित, वस्तुनिष्ठ अशा स्वरूपाची असते.

### ३. ललित व ललितेतर यांच्या सीमारेषेवरचे साहित्य-

विशिष्ट प्रकारचे इतिहास लेखन, प्रासंगिक व्यक्तिचित्रे आणि निबंध, टिपणे, दैनंदिनी स्वरूपाचे लिखाण, चरित्र, आत्मचरित्र, चर्चात्मक गद्य,अनुभव कथनपर गद्य अशा प्रकारच्या लेखनाचा यात समावेश करता येईल. वरच्या दोन्ही प्रकारातल्या लेखनाची काही वैशिष्ट्ये अशा लेखनात एकवटलेली दिसतात. लेखकाच्या विशिष्ट व्यक्तिमत्त्वाचा पडणारा प्रभाव, रचनेचे, रूपबंधाचे कौशल्य, आणि शैलीदारपणा ही ललित साहित्याची वैशिष्ट्ये ; आणि त्यातून प्रकट होणारे वस्तुनिष्ठ विचार, माहितीपूर्णता, ज्ञानात्मकता ही ललितेतर साहित्याची वैशिष्ट्ये अशी दोन्ही प्रकारातली वैशिष्ट्ये या प्रकारच्या लेखनात सामावलेली असतात. त्यामुळे या लेखनाचा समावेश ललित व ललितेतर यांच्या सीमारेषेवरील लेखन म्हणून करावा लागेल.

साहित्याचा विचार जसा लेखकाच्या दृष्टीने केला जातो तसाच आस्वादकाच्या म्हणजेच वाचकाच्या संदर्भातून करणेही आवश्यक ठरते. वाचक साहित्याचे वाचन कशासाठी करतो, ह्या प्रश्नाचे उत्तर शोधताना वेगवेगळे हेतू समोर येतात. दैनंदिन आयुष्यातील ताणतणावापासून मुक्त होण्यासाठी चार घटका विरंगुळा, मनोरंजन, स्वप्नरंजन , उद्‌बोधन, जिज्ञासातृप्ती, ज्ञान आणि माहिती मिळविणे, दैनंदिन समस्यांवर उपाय शोधणे अशा विविध हेतूंनी वाचक साहित्याकडे वळतो. पण श्रेष्ठ अशा ललित साहित्याचा आस्वादासाठी हे हेतू पुरेसे ठरत नाहीत. विदग्ध किंवा श्रेष्ठ अशा साहित्याच्या आस्वाद आणि आकलनासाठी वाचकांकडून अधिकच्या तयारीची, अनुभवक्षमतेची अपेक्षा असते. वाचकाच्या अंगी साहित्याचा आस्वाद घेण्यासाठीची जिज्ञासा आणि सहृदयता, विवेकशील वैचारिक बैठक, बौद्धिक आव्हाने पेलण्याची तयारी असेल तरच त्याची वाङ्‌मयीन अभिरुची विकसित, संपन्न व प्रगल्भ होऊ शकते. अशा अभिरुचीमधूनच त्याला दर्जेदार व सकस साहित्याच्या अनुभव घेता येऊ शकतो. अशा साहित्याने निर्माण केलेल्या मौलिक भानापर्यंत

पोहोचता येते. त्यातून त्याच्या जीवनविषयक जाणिवा समृद्ध होऊन आयुष्याचे नवनवे अर्थ त्याला प्रत्ययास येतात. आपल्या अनुभवकक्षेची मर्यादा ओलांडून श्रेष्ठ साहित्याने घडवलेले मानवी मनोविश्वाचे, जीवनाचे विस्तृत, वैविध्यपूर्ण, सर्वांगीण व परिपूर्ण दर्शन अनुभवता येते. त्यातूनच वाचकाच्या अनुभूतीच्या कक्षा विस्तारत जातात. मानवी जीवनाचा अफाट पसारा समजून घेता येतो. त्याची व्याप्ती आणि खोली लक्षात येते. जगण्यातील गुंतागुंतीच्या प्रश्नांची मनोज्ञ उकल होते. संस्कृतीने घडवलेल्या नैतिक, सामाजिक, सांस्कृतिक मूल्यांची जाणीव होते. साहित्याच्या आणि कलांच्या सजग अनुभवातून एकूणच मानवी जीवनाविषयीची आपली जाण समृद्ध, प्रगल्भ बनते.

### १.२.२ अनुभवकथन : संकल्पना आणि स्वरूप

अनुभवकथनपर गद्य हा ललित गद्य या साहित्यप्रकारातीलच एक उपप्रकार मानता येईल. एक स्वतंत्र लेखनप्रकार म्हणून ललित अनुभवकथन या लेखनप्रकाराचे स्वरूप आणि विशेष आता आपण समजून घेऊ. ललित साहित्याच्या अनेक प्रकारांमधील 'ललित गद्य' हा एक महत्त्वाचा साहित्यप्रकार आहे. ललितगद्यालाच 'ललितलेख', 'आत्मनिष्ठपर गद्य', 'मुक्तगद्य' अशा संज्ञाही वापरल्या जातात. परंतु 'ललित गद्य' ही संज्ञा सर्वसमावेशक असल्यामुळे तीच अधिक समर्पक ठरते. या संज्ञेमध्ये 'आठवणी-अनुभवपर ललित', ' लघुनिबंध', 'प्रवासलेख', 'व्यक्तिचित्रणपर ललित ', 'ललितलेख' अनुभवकथनपर गद्य असे ललित गद्याचे विविध उपप्रकार सहजपणे सामावले जातात. 'ललितगद्य' हा वाङ्मयप्रकार अत्यंत लवचिक अशा स्वरूपाचा असल्यामुळे त्यामध्ये इतर उपप्रकारांचा विकास झालेला दिसतो. या वाङ्मयप्रकारामध्ये लेखकाला मुक्तपणे आपली अभिव्यक्ती घडवता येते. वाङ्मयप्रकाराची काटेकोर किंवा जाचक अशी बंधने नसल्यामुळे या प्रकाराला इंग्रजीत 'Formless form' ही संज्ञा वापरली जाते. या संज्ञेमधूनही या वाङ्मयप्रकाराचे मोकळेपण किंवा लवचिकता लक्षात येते. प्रामुख्याने १९५० नंतर साहित्यामध्ये 'ललित गद्य' ही संज्ञा अधिक प्रस्थापित आणि रूढ झालेली दिसते. अनुभवकथनपर गद्य हा ललित गद्याचा एक महत्त्वाचा उपप्रकार आहे

“लेखकाच्या विविध अनुभवांचा आविष्कार ललित गद्यामधून होत असतो. या विविधतेची व्याप्ती फार मोठी असते. समूर्तापासून अमूर्तापर्यंत, वास्तवापासून काल्पनिकापर्यंत या अनुभवाचा पल्ला असतो. म्हणूनच एखादे विशिष्ट ऐतिहासिक ठिकाण आणि एका व्यक्तीला एका विशिष्ट रात्री पडणारी स्वप्ने या दोन्हींवर ललितलेखन करता येते. प्रत्यक्षात भेटलेल्या हाडामासांच्या माणसाप्रमाणेच केवळ वाङ्मयीन व्यक्तींवर किंवा त्याहीपुढे जाऊन केवळ कल्पनेतच असू शकतील अशा व्यक्तींवरही लिहिता येते. कुणाचे भाषण हा विषय चालतो. तसाच कुणाचे मौन हाही चालतोच. या परस्परविरोधी टोकांना असणाऱ्या अनुभवांच्या मध्ये वावरणारा लेखक एकच असल्यामुळे अनुभवांचे विषय अत्यंत भिन्न असतानाही त्या अनुभवांना एक समान सूत्र प्राप्त होते. त्या अनुभवांचा आविष्कार होत असताना 'आत्म' ही आविष्कृत होऊन त्याचा लेखनावर रासायनिक स्वरूपाचा परिणाम होतो आणि

अनुभव कळताकळताच अनुभव घेणाराही कळत जातो. यशस्वी ललित लेखनात या दोघांचे वेगळे अस्तित्त्व फारसे जाणवत नाही. स्वतःचे, स्वतःभोवतीचे, जाणवणारे, न जाणवणारे, वर्तमान, भूत, भविष्य या तिन्हींमधले व्यापक संदर्भ ज्या ललित लेखकामध्ये जागृत असतात, तोच लेखक असे यशस्वी ललितलेखन करू शकतो."

-विनय हर्डीकर

मागील सर्व विवेचनावरून ललित गद्य हा अनेक उपप्रकारांना सामावून घेणारा बहुजिनसी, समावेशक आणि लवचिक असा लेखनप्रकार असल्याचे लक्षात येते. अनुभवकथनपर लेखनप्रकार स्वातंत्र्योत्तर काळात अधिक ठळकपणे विकसित झालेला दिसत असला तरी त्याचे मूळ प्राचीन मराठी गद्य परंपरा आणि त्यानंतर अलीकडच्या काळातील 'निबंध', 'लघुनिबंध' यामध्ये सापडते. निबंध, लघुनिबंधाचेच अधिक विकसित रूप म्हणजे आजचे ललित गद्य होय. आणि ललित गद्यातीलच एक महत्त्वाचा प्रकार म्हणजे अनुभवकथन होय. अनुभवकथनपर गद्य हे बाह्य स्वरूपावरून निबंधात्मक वाटले, तरी अंतर्गत वैशिष्ट्यांमुळे निबंधापेक्षा वेगळे ठरते. आत्मपरता, अनौपचारिकता हे त्याचे विशेष असले, तरी त्यामध्ये चिंतनशीलता आणि वैचारिकता आणि वस्तुनिष्ठ अशी वास्तवदर्शी शैली यांचे प्रतिबिंब दिसून येते. हे लेखन एखाद्या अनुभवाच्या किंवा विषयाच्या निमित्ताने झालेले असते. एखादी विशिष्ट घटना, व्यक्तिगत अनुभव अथवा सामाजिक वास्तव टिपणारा घटनाक्रम, एखादा प्रवासाचा अनुभव किंवा निसर्गानुभव, एखाद्या स्थळाचे दर्शन, एखाद्या कलाकृतीचा अनुभव, एखादा संवेदनानुभव, भावानुभव किंवा विचारानुभव यांचे निमित्त अशा लेखनाला पोषक ठरते. त्या अनुभवाचे सर्वांगाने दर्शन घडवण्याच्या, तो अनुभव अनुभूतीच्या पातळीवर भावजीवनाचा भाग बनवण्याचा प्रयत्न अनुभवपर गद्य लेखनातून केला जातो. अनुभवातील संवेदना, भावना, विचार यांच्याशी जोडले गेलेले विविध प्रकारचे पैलू त्या अनुभवाचे बारीकसारीक कंगोरे आणि तपशील नोंदवण्याचा प्रयत्न अनुभवकथनपर लेखनातून केला जातो. त्यातूनच सूक्ष्म सामाजिक निरीक्षणे, जीवनातील गुंतागुंतीचे दर्शन अनुभव कथनातून घडताना दिसते. सामाजिक वास्तवाचे चित्रण घडवताना अटळपणे अवतरणारी वैचारिकताही या लेखनात येऊ शकते. वरवर पाहता अनुभवकथनपर लेखन निरीक्षण, विश्लेषण, तर्क-अनुमान, प्रमाण अशा गोष्टींचा आधार घेत लिहिले जाते असे वाटते पण त्याची संरचना शास्त्रीय लेखनाच्या मांडणीप्रमाणे तर्काधिष्ठित नसते. अनुभवकथनाची संरचना त्या-त्या अनुभवाचा पोत सांभाळून केली जाते. अनुभव कथनाची एकूण शैली ही त्या अनुभवाचे जगण्याशी असणारे अतूट असे नाते प्रभावीपणे उलगडून दाखवणारी असते. तो अनुभव भाषेतून मांडण्यासाठी कथनाच्या अनेक पद्धतींचा वापर अनुभव कथनातून केला जातो. अनुभव, सामाजिक सांस्कृतिक चिंतन, आणि वैचारिकता यांचा वाचकाला एकाच वेळी एकत्रित असा प्रत्यय देणारी एक संरचना निर्माण करण्याचा प्रयत्न अनुभव कथनातून केला जातो.

ललित गद्यात्मक लेखन आत्मपर असल्यामुळे त्यामध्ये लेखककरूपी 'मी' ठळकपणे दिसत राहणे अपरिहार्य असते. 'मी', 'मला' 'माझे' अशी 'मी' ची रूपे त्यात सहजपणे येतात. पण असे असले तरीही ज्या ललित गद्यात 'मी'पेक्षा तो ज्या संवेदनानुभवाच्या, भावानुभवाच्या किंवा विचारानुभवाच्या निमित्ताने बोलत असतो, त्याला अधिक अर्थपूर्णत्व प्राप्त होणे अधिक महत्त्वाचे असते. ज्या लेखनात 'मी'पेक्षा अनुभवाला अधिक ठळकपणे मांडले जाते ते ललित गद्य अधिक गुणवत्तेचे आणि यशस्वी मानावे लागते. कारण अशा ललित गद्यातील अनुभवाचे निवेदन लेखक 'मी' करत असूनदेखील खऱ्या अर्थाने त्यातील 'मी' हा निमित्तमात्र असतो. काही फसलेल्या किंवा सदोष ललित गद्यात मात्र नेमका उलट अनुभव येतो. जेव्हा लेखकामधील 'मी', एखाद्या अनुभवाचा फक्त स्वतःचे प्रदर्शन करण्यासाठीच वापर करतो तेव्हा ते ललित गद्य रचनेच्या दृष्टीने अपयशी ठरते.

## १.२.३. अनुभवकथनपर लेखनाची वैशिष्ट्ये

### अ) **प्रवासवर्णन आणि स्थळदर्शनाचा अनुभव देणारे लेखन**

प्रवासात आलेले स्थळांचे, निसर्ग चक्रातील ऋतूबदलांचे, घटना-प्रसंगांचे अनुभव व्यक्तीचे आंतरिक विश्व कसे बदलून टाकतात याचे प्रत्ययकारी दर्शन या प्रवासानुभवातून घडते. प्रवासात भेटणारी माणसे प्रवासाच्या सगळया अनुभवालाच कसे नवे आयाम देऊन जातात याचेही दर्शन अनुभवकथनपर गद्यातून प्रभावीपणे घडते. रुळलेल्या वाटा नाकारून नव्या शक्यता आजमावण्याचे आवाहन या लेखनातून व्यक्त होते. सततच्या सहवासाने, सरावाने, आणि अतिपरिचयामुळे एखाद्या ठिकाणच्या अनुभवाला कशा मर्यादा पडतात आणि त्यातून मुक्त होण्यासाठी आपली दृष्टी सतत सावध कशी ठेवावी लागते याचेही दिशादर्शन या अनुभवकथनपर गद्यातून होते. प्रभाकर पाध्ये यांचे 'तोकोनामा' , रा.भि.जोशी यांचे 'मजल दरमजल' आणि 'धनुष्कोडी', अनंत काणेकर यांचे 'धुक्यातून लाल ताऱ्याकडे', पु.ल.देशपांडे यांच्या 'अपूर्वाई', 'पूर्वरंग', 'जावे त्यांच्या देशा' यासारख्या प्रवासवर्णनपर ललितगद्यातून प्रवास आणि त्यातून हाती लागणाऱ्या समृद्ध अशा जीवनानूभूतीचे विलक्षण आत्मीय आणि चित्रदर्शी दर्शन घडते. इंग्लंडमधील प्रवासाबद्दल लिहिताना तेथील ग्रामीण परिसराचे अतिशय चित्रमय असे दर्शन पु.ल.देशपांडे यांनी घडवले आहे. त्या लेखात ते लिहितात, " इंग्लंडची सारी शोभा या ग्रामीण इंग्लंडमध्ये आहे. छोटी छोटी वने, उपवने, ओहोळ आणि ओढ्याएवढ्याच चिमुकल्या नद्या, लहानग्या टेकड्या, त्यांतून डोकावणारी ती टुमदार इंग्लिश खेडी, आकाशात घुसणारे प्रार्थनामंदिरांचे कळस, उतरणीवर चरणारे गायींचे किंवा मेंढरांचे कळप, तारांच्या कुंपणावर बसून धावत्या गाडीला हात दाखविणारी इंग्लिश मुलेमुली, एखाद्या पाण्यात गळ टाकून बसलेला म्हातारा, मधून-मधून दृष्टीपुढून सरकणारे एखादे हिरवेगार क्रीडांगण, त्यात रंगात आलेला गावठी क्रिकेटचा सामना, टेकडीवर नागमोडी धावत पळणारे रस्त्याचे मोहक वळण,

रंगीबेरंगी लोकरी कार्डिगन्स घातलेल्या, सफरचंदी गालाच्या, सोनेरी केसांच्या तरुणींचा सायकलवरुन पिकनिकला निघालेला आणि रेल्वेच्या लेव्हल क्रॉसिंगशी अडकलेला घोळका, आगगाडीची दुमदार स्टेशने, एवढ्या एवढ्याशा घरातून डोकावून कडेवरच्या गुबगुबीत गुंड्याला आगगाडी दाखवणारी एखादी गृहिणी, खेड्यातल्या चर्चच्या दाराशी थबकलेल्या पाच-सात इंग्लिश रमाकाकू, ठमाकाकूंचा काळ्या झग्यांतला थवा, ओक वृक्षाखाली तोंडावर हॅट ओढून स्वस्थ झोपलेला एखादा म्हातारा, धिप्पाड घोड्यांची जोडी नांगराला जोडून शेतात राबणारा शेतकरी, ठिकठिकाणी दिसणारी व्हिटनेज एलची जाहिरात, गावागावांना जोडणाऱ्या रस्त्यांतून पळणारी लालभडक बस यातली एकेक दृश्ये म्हणजे कवी-चित्रकाराला आव्हान आहे."

प्रवासानुभवाचे हे अत्यंत चित्रदर्शी वर्णन त्या त्या स्थळाकडे, प्रदेशाकडे आणि तिथल्या संस्कृतीकडे पाहण्याची नवी दृष्टी देते. आपल्या सरावलेपणाला, साचेबद्ध जाणिवांना अधिकाधिक मोकळे करत आपल्या अनुभवाला एक नवा आयाम देतात.

एकूणच या काळातील प्रवासवर्णनांमधील नाविन्य अनुभवांचे अनोखे दर्शन घडवणारे आहे. एखाद्या स्थळाकडे पाहण्याची अभिनव दृष्टी आणि वेगवेगळ्या अनुभवांना सामोरे जाताना ते अनुभव सजगपणे घेण्यासाठी लागणारी अभिरुची, सौंदर्यदृष्टी वृद्धिंगत करण्याचा, आणि त्यासाठी आवश्यक अशी दृष्टी देण्याचा प्रयत्न या अनुभवकथनपर गद्यातून ठळकपणे जाणवतो.

## ब) सामाजिक वास्तवाचे दर्शन

सामाजिक वास्तवाचे अधिक विस्तृतपणे आणि नेमकेपणाने दर्शन घडवणारे लेखन साठोत्तर काळात मोठ्या प्रमाणात होताना दिसते. यामध्ये अनिल अवचट, लक्ष्मण माने, बाबा आढाव, वसुंधरा पटवर्धन, देविदास बागुल, नरेंद्र दाभोळकर, संपत देसाई अशा काही लेखकांचा उल्लेख करावा लागेल. स्वातंत्र्य, समता, बंधुत्व अशी जीवनमूल्ये त्यांनी आपल्या ललित लेखनातून प्राधान्याने व्यक्त केलेली दिसतात. समाजातील अनेक वास्तव अनुभवांना, त्यातील उग्र होत गेलेल्या सामाजिक प्रश्नांना हे लेखक आपल्या लेखनाद्वारे भिडताना दिसतात. अंधश्रद्धा, बुवाबाजी, देवदासी प्रथा, तळागाळातील मजूर, शेतकरी, कामगार, भटके विमुक्त अशा अनेक लोकांचे प्रश्न मांडण्याचे, त्याचे विविध पैलू तपासण्याचा प्रयत्न या काळातील अनुभवकथनपर गद्यातून सशक्तपणे केला आहे. आजच्या तंत्रज्ञानाच्या प्रगतीच्या शिखरावर असणाऱ्या युगातही आदिम भटक्या अवस्थेत जगणाऱ्या माणसांचे, प्रचंड सामाजिक विसंगती दर्शवणारे चित्र अनिल अवचट यांच्या 'माणसं' या लेखसंग्रहातील 'अनिकेत' या लेखातून समोर येते. या लेखातील एक अंश पाहू-

" आदिम अवस्थेपासून आजपर्यंत हजारो वर्षांच्या कालखंडात माणसाच्या जगण्याच्या पद्धतीत केवढी उलथापालथ झाली! समाजातल्या बऱ्याच मोठ्या भागाचा चेहरामोहरा संपूर्ण बदलून गेला आहे. पण आज, या घटकेलाही, भटक्यांच्या रूपाने आदिमानवाचे असंस्कृत भयग्रस्त अडाणी जीवन केविलवाणेपणे आपल्यासमोर उभे आहे. ते जीवन आदिम, भटक्या मेंढपाळ संस्कृतीच्या पुढे

सरकलेले नाही. आजही भटकी माणसे गवताच्या प्रदेशात आपली गुरेढोरे घेऊन फिरत असतात. छोट्यामोठ्या प्राण्यांच्या शिकारी करून खात असतात. अमीबा-सारखा एकपेशीय प्राणी उत्क्रांत होत होत त्यातून माणसासारखा प्रगल्भ प्राणी बनला. उत्क्रांतीच्या अगदी वरच्या पायरीवर असलेल्या माणसाच्या जगात सर्वोत खालच्या पायरीवरचा अमीबा त्याच्या सर्व वैशिष्ट्यांसह अजून टिकून आहे. तसे काहीसे या भटक्यांचे झाले आहे. ज्या शहरात आयत्या मिळणाऱ्या इमारतींच्या सुख्या भागांमुळे आठ दिवसांत अनेकमजली इमारती उभ्या राहतात, त्याच शहरातल्या डांबरी सडकांवरून, हजारो वर्षे एकाच पद्धतीने पाले बांधून राहणाऱ्या या भटक्या जमातींचे तांडे आपल्या ताडपत्र्या, गोधड्या, चटया गाढवांवर लादून पुढच्या मुक्कामाला चाललेले दिसतात. अंतराळात माणसांसह रॉकेट सोडणे, त्या माणसांनी लाखो मैल अंतरावर रॉकेटातून निर्वातात उतरणे, यानास यान जोडणे, चंद्रावर गाडीने प्रवास करणे यासारख्या नित्य नव्या गमती व धाडसे करणाऱ्यांच्या समाजात ही भटकी माणसे मरीआई, म्हसोबा यांसारख्या आदिम दैवतांना चळचळा कापतात. त्या कोपू नयेत म्हणून हजारो जनावरे दरवर्षी बळी देतात.

शेती-संस्कृती स्थिरावल्यावर या देवतांच्या उपासनांचे स्वरूप सौम्य होत गेले. निसर्गाचे अधिकाधिक ज्ञान झाले तशी संस्कृती प्रगल्भ होत गेली, धार्मिक तत्त्वज्ञाने निर्माण झाली. महाराष्ट्रात संत मंडळींनी या मातृ-पितृ-दैवतांवर कडाडून हल्ला चढवला. "नव्हे जाखाई जोखाई/ मायराणी मेसाबाई/ बलिया माझा पंढरीराव/ जो या देवांचाही देव", किंवा "वेताळे फेताळे / जळो त्याचें तोंड काळें/ तुका म्हणे चित्ती/ धरा रखुमाईचा पती" या शब्दांत त्यांनी या दैवतांची संभावना करून ‘सौम्य स्वरूपाचा भक्तिमार्ग’ आणि ‘विठोबा’ हा केवळ नामस्मरणाने जिंकता येईल असा देव रूढ केला. (डी० डी० कोसंबी यांनी तर असे मत मांडले आहे की, कोकण, घाटमाथा या अतिपावसाच्या भागातून पावसाळयाच्या सुरुवातीला जनावरांचे कळप घेऊन मोठमोठे मानवसमूह भटकत कमी पावसाच्या, गवत भरपूर असलेल्या पठारी भागात येत असत आणि पावसाळा संपल्यावर काही महिन्यांनी मूळ ठिकाणी परत जात. ही भटकी यात्रा त्यांची शेती-संस्कृती स्थिरावण्यापूर्वी हजारो वर्षे चालूच होती. संतांनी या यात्रेला वारकरी दिंडीचे स्वरूप देऊन दोन संस्कृतींचा समन्वय साधला.) मुख्य समाजात या धर्मसुधारणा झाल्याला सातआठशे वर्षे लोटली तरी भटक्या समाजात मात्र मातृ-पितृ-देवतांची पकड आजही घट्ट आहे. भटक्यांच्या काही चालीरीती तर अशा आहेत की त्या केवळ आदिमानवाच्या काळातच आचरल्या जात असतील. नुसत्या उपासनांच्या बाबतीतच नाही, तर त्यांची सगळी जीवनपद्धतीच टोळया करून राहणाऱ्या आदिमानवासारखी आहे. मात्र या जमाती आदिवासींसारख्या मुख्य समाजापासून दूर व एकत्रित स्वरूपात अस्तित्वात नाहीत. मुख्य समाजात फिरून, नाना धंदे करून वैदू, कैकाडी, वडार यांसारख्या जमाती आपले पोट भरतात. किंवा निरनिराळया प्रकारे भिक्षा मागून जोशी, चित्रकथी, वासुदेव, गोंधळी, डवरी, वैरागी इत्यादींसारख्या जमाती आपली उपजीविका करतात. कोल्हाटी, डोंबारी, माकडवाले, मदारी ह्या जमाती करमणुकीचे खेळ करून तर फासेपारधी, मारवाडी-कुंभार, कंजारभाट या जमाती चोऱ्यामाऱ्या करून आपले पोट

भरतात. आपल्यात वावरत असून, वर्षानुवर्षे या संस्कृतीची घसट असूनही, हे लोक आदिमानवाच्या संस्कृतीत आजतागायत कसे राहिले असावेत हा अवघडच प्रश्न आहे.''

भौतिक प्रगतीच्या, तंत्रज्ञानाच्या अजस्र अशा वेगात अव्याहत वाहणाऱ्या या काळातही अगदी आदिम अवस्थेत जगणाऱ्या माणसांचे अनिल अवचट यांनी घडवलेले हे वास्तववादी दर्शन आपल्या समाजाच्या विस्मयकारी गुंतागुंतीचे एक भेदक असे रूप उलगडून दाखवते. एकीकडे तंत्रज्ञान, विज्ञान आणि माध्यम क्रांतीच्या महाकाय वेगाने मानवी संस्कृतीला व्यापलेले असताना त्याच संस्कृतीच्या एका स्तरात मात्र जगण्याचे आदिम अवशेष आजही तसेच टिकून असलेले दिसतात. जगातल्या मुख्य प्रवाहातल्या तथाकथित प्रगतीचे, विकासाचे आणि तंत्रज्ञानाच्या क्रांतीचे कुठलेच कवडसे तिथे पोहोचलेले नसतात याचे अत्यंत वास्तव भान या काळातील अनुभवकथनपर गद्यातून व्यक्त झाले आहे.

एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर अनेक नव्या जाणिवांचे आविष्करण मराठी **अनुभवकथनपर गद्यातून** झाले. या काळात अरुण खोपकर, वसंत आबाजी डहाके, नंदा खरे, महेश एलकुंचवार, वसंत आबाजी डहाके, राजन गवस, इंद्रजीत भालेराव, श्रीकांत देशमुख, कविता महाजन, सिसिलिया कार्व्हालो, श्रीकांत इंगळहळीकर, कृष्णमेघ कुंटे, महावीर जोंधळे, प्रवीण बांदेकर, सदानंद देशमुख, कविता महाजन, प्रज्ञा दया पवार अशा अनेक लेखकांनी ललितगद्य हा वाङ्मयप्रकार समृद्ध केलेला दिसतो. निसर्ग आणि माणूस यांच्यातील सूक्ष्म नातेसंबंध या काळातील **अनुभवकथनपर गद्यातून** अधिक ठळकपणे व्यक्त झाले आहेत. मानवी संवेदनांचे बदलत्या भवतालाशी होणारे टकराव, त्यातून उभे राहणारे अनेकपदरी संघर्ष या लेखनातून अचूकपणे टिपले गेले आहेत. या संघर्षातून घडत जाणारे मानवी मन, समाज दर्शनाचा व्यापक पट त्यातून उलगडत गेले आहे. सामाजिक चळवळीतून आकाराला आलेल्या राजकीय, सांस्कृतिक आशयाचे व्यक्ती मनावर उमटणारे ठसे या **अनुभवकथनपर गद्यातून** नोंदवले गेले आहेत. आत्मशोधाच्या वाटेने जाणाऱ्या व्यक्तित्त्वावर पडणारा तत्त्वज्ञानात्मक विचारांचा प्रभाव, त्यातून आकाराला येणारे आधिभौतिक संवेदनांचा शोध घेऊ पाहणारे मनोविश्व या काळातील ललितगद्याचा एक वैशिष्ट्यपूर्ण असा भाग आहे. या काळातील **अनुभवकथनपर गद्यातून** कलांचा अनुभव घेताना त्यामागच्या तात्त्विक भूमिकांचा किती खोलवर परिणाम होतो याचे मर्मज्ञ विवेचन व्यक्त झाले आहे. कलानुभवांचे तात्त्विक स्वरूप उलगडताना त्यातून होणारे रूपतत्वांचे दर्शन, कलांचे सैद्धांतिक आणि सौंदर्यशास्त्रीय दर्शन कलांची व्यापकता आणि मौलिकता समजून घेण्यासाठी किती निर्णायक ठरते याचेही अत्यंत मूलभूत चिंतन या **अनुभवकथनपर गद्यातून** मांडले गेले आहे. सृष्टीकेंद्री आणि पर्यावरणस्नेही जीवनशैलीतूनच जगण्याची खरी समृद्धी हाती लागू शकते याचे लख्ख भान या काळातील **अनुभवकथनपर गद्याने** आपल्यासमोर ठेवलेले दिसते. भौतिक उन्नतीच्या रेट्यातून बोकाळला वाढत जाणारा सर्वव्यापी उपभोगवाद आणि चंगळवाद हा एका बौद्धिक, वैचारिक अधोगतीचे कारण ठरतो आहे याची परखड चिकित्सा या काळातील **अनुभवकथनपर गद्यातून** केली गेली आहे. ग्रामीण कृषिकेंद्री मूल्यव्यवस्थेची होत जाणारी पडझड, आधुनिकीकरणातून निर्माण झालेले व्यक्तिपुढचे

गुंतागुंतीचे प्रश्न, त्यातून व्यक्तीच्या मनोविश्वात निर्माण होणारे ताण, तंत्रज्ञान आणि माध्यमांच्या अतिरेकी वापरातून मानवी संवेदनांना येणारे बथ्थडपण, मानवी संवेदनहीनता अशा या काळातील महत्त्वाच्या प्रश्नांनाही मराठी **अनुभवकथनपर गद्या**ने सखोलपणे स्पर्श केला आहे.

अशा अनेक आशयसूत्रांसह नव्वदोत्तर **अनुभवकथनपर गद्या**ची वाटचाल होत गेलेली दिसते. आशयाच्या गुंतागुंतीला संवादी ठरेल असा रूपबंधही **अनुभवकथनपर गद्याने** सहजपणे घडवत नेला आहे. अनेक वाङ्मयप्रकारांच्या रूपबंधांमधून सत्त्व घेत **अनुभवकथनपर गद्याने** आपला वैशिष्ट्यपूर्ण असा रूपबंध निर्माण केला आहे. अतिशय लवचिक रूपतत्त्वीय क्षमता असणारा हा वाङ्मयप्रकार या काळात अतिशय प्रभावीपणे वापरला गेल्याचे आढळते. रूपाशयाचे अतिशय प्रयोगशील असे आविष्करण **अनुभवकथनपर** ललितगद्याचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. वाङ्मयीन कृती ही एक भाषिक घटना किंवा अभिव्यक्ती असते. या भाषिक घटनेत अनेक शैलीशास्त्रीय आणि रूपतत्त्वीय घटक समाविष्ट असतात याचे भान या **अनुभवकथनपर गद्याने** करून दिले आहे. ललितगद्यासारख्या अनेक वाङ्मयप्रकारांच्या रूपतत्त्वांना सामावून घेणाऱ्या वाङ्मयप्रकारात या रूपतत्त्वांचे एक संश्लेषित संवेदन प्रकट होताना दिसते.

## क) बदलत्या मूल्यव्यवस्थेचा वेध-

जागतिकीकरणाच्या रेट्यात ग्रामीण जीवनातील बदलती मूल्यव्यवस्था, मूल्यांचा होत असलेला ऱ्हास अनुभवकथनपर ललितगद्यातून व्यक्त होतो. तंत्रज्ञान आणि सायबरविश्वाच्या आक्रमणामुळे माणसाच्या जगण्यात होत गेलेली मानसिक उलथापालथ, त्यामधून ढासळत गेलेले व्यक्तीचे संवेदनविश्व या काळातील अनुभवकथनपर ललितगद्यातून रेखाटले गेले आहे. राजन गवस, इंद्रजित भालेराव, सदानंद देशमुख, श्रीकांत देशमुख, प्रवीण बांदेकर यांच्या लेखनातून या बदलांचे चित्रण आढळते. आधुनिकीकरणाच्या नव्या मूल्यवस्थेत हरवत चाललेल्या मूल्यांचा वेध घेण्याचा प्रयत्न अनुभवकथनपर ललितगद्यातून केला गेला आहे. ''हरवलेल्या पावसाळ्यांचा शोध' या ललितगद्य संग्रहातून प्रवीण बांदेकर यांनी मूल्यवस्थेतील बदलाचे एक चित्र रेखाटताना नोंदवलेली निरीक्षणे खूप महत्त्वाची आहेत. आपलं आजचं जगणं कुरतडणारी एक उपभोगवादी आणि नैतिकता हरवलेली व्यवस्था हळूहळू इथल्या भूमीमध्ये कशी पाय रोवत आहे याची नोंद प्रवीण बांदेकरांनी आपल्या अनुभवकथनपर लेखनातून अतिशय नेमकेपणाने घेतलेली आहे. ते लिहितात, " लहानपणी अनुभवलेलं गाव हळूहळू बदलत जातंय याची जाणीवही व्हायला लागली होती. माणसं बदलली तसा नितळ स्वच्छ पाण्याने भरून वाहणाऱ्या नदीच्या पाण्यानेही आपला रंग बदलायला सुरुवात केली. आरसपानी नितळ नदीपात्रात माडापोफळींचं पडलेलं प्रतिबिंब मिरवणाऱ्या एखाद्या बागेसारखं असलेलं हे गाव कालपरवापर्यंत आरसबागच होतं, हे आता मात्र गेल्या काही वर्षांपासून नदीचं गढूळ-प्रदूषित होत चाललेलं पाणी पाहताना काहीतरी खोटं, कल्पनारम्य वाटू लागलंय. नदीचं आणि त्यामुळे गावाचंही बदलत चाललेलं रूप पाहताना अलीकडे अस्वस्थही वाटत राहतं. सगळंच

बदलत चाललं आहे. गाव काय किंवा नदी काय, कुणीच कसं अपवाद असणार आहे? बदल हा तर दुनियेचा धर्मच आहे, हे सगळं पटतंय. पण तरीसुद्धा बदलांचं, आधुनिकीकरणाचं बोट धरून चोरपावलांनी शिरणारी, आपलं कालपरवापर्यंतचं शांत, समाधानी, भाबडं जगणं कुरतडणारी आणि मूल्ये, नैतिकता, संस्कृती अशा सगळ्याला कीड लावणारी एक नवी व्यवस्था समोर येऊ लागलीय. आपले तिच्याशी सूर जुळणं जरा कठीणच वाटतंय, हेही मला जाणवतंय."
(''हरवलेल्या पावसाळ्यांचा शोध'- प्रवीण बांदेकर)

ग्रामीण कृषी संस्कृतीलाही या बाजारू संस्कृतीने घातलेला विळखा राजन गवस यांच्या 'लोकल ते ग्लोबल' या अनुभवकथनपर ललितगद्यातील 'किड्या मुंगीने जगावं' या लेखातून अतिशय परखडपणे व्यक्त झाला आहे. आधुनिकीकरणातून अवतरलेला हा उपभोगाचा रेटा आपण थोपवू शकत नाही याची खोल हताशा आणि आपल्या भोवतीची सृष्टी आणि आपला सर्वार्थाने सजीव असा भवताल अखंड टिकून राहावा याविषयीची आत्मीय आस्था या लेखातून अतिशय प्रभावीपणे व्यक्त होते.

" हंगामानुसार या किड्यांची संगतही बदलायची. पावसाळ्यात भेटणाऱ्या मावश्या उन्हाळ्यात भेटायच्या नाहीत. पैसा किडा पावसाळा संपला की, अचानक गायब व्हायचा, घरातली गुळाची ढेप संपली की, डोंगळे-मुंगळे संपावर. मुंग्या तेवढ्याच घरात बाभळीच्या-आंब्याच्या झाडांवर, उन्हात-पावसात अशीच सतत भेटणारी, बेडावून टाकणारी मैत्रीण गोगलगाय, इवलीशी गोगलगाय कोणत्याही भाजीच्या पानावर तोऱ्यात हिंडायची. चुनखडीच्या शेतात पाठीवर सरकारची. अशा गोगलगाई शोधून जमवणं हा आमचा आवडता उद्योग. गोगलगाईला हळूच उचललं की, ती अंग आकसून शंखात बसायची. अशा पसाभर गोगलगाई गोळा करून घरातल्या सोप्यात पसरल्या की, त्यांच्यातच बाहेर जाण्याची शर्यत लागायची. शेवटी गोगलगाईच त्या. उंबराही गाठू शकायच्या नाहीत आमच्यासमोर.

सगळ्यात वेडावून टाकायचे काजवे. पेरणीच्या दिवसांत. कधी कधी अध्येमध्ये. रात्रीच्या काळोखात राखणीला चाललं की, एखादं झाड अचानक चमकायला लागायचं गडद अंधारात. काजव्यांनी भरलेलं झाड बघणं दुनियेतला अवर्णनीय क्षण! लुकलुकणारं झाड डोळ्यांत साठवत वस्तीच्या ठिकाणी पोचलं की, असे काजवे पकडून खास नेलेल्या बाटलीत भरून घराकडं आणायचे. घरातली सगळ्यात अंधारी खोली मदघर. मदघरात देव्हारा. देव्हाऱ्यावर ही बाटली ठेवली की, देव उजळायचे त्यानेच निर्माण केलेल्या प्रकाशानं !

काळ बदलला. खेड्यापाड्यांत नव्या कीटकनाशकांनी प्रवेश केला. झाडोरा वाढला, हे औषध फवारा. कीड पडली, ते औषध फवारा. चिकटा पडला, हे मारा, मावा पडला, ते फवारा. या फवाऱ्यात आणि पंपाच्या धुस्काऱ्यात शेतातल्या गोगलगाई, वाणी किडे, काळ्या मुंग्या, लाल मुंग्या हळूहळू गायब होताहेत. आता मुंगळे आणि डोंगळे औषधालाही सापडत नाहीत. डोंगळ्याची

प्रजातीच नष्ट झाली की काय कुणास ठाऊक! ट्यूबवर किंवा बल्बवर जीव देणं बरं वाटत नाही पतंगाला. नवी पिकं, नवी औषधं यांच्या माऱ्यात क्वचितच भेटतात काजवे. किड्या-मुंग्यांनी-काजव्यांनी बहरलेलं आयुष्य. किड्यानं जगावं, मुंगीनं जगावं म्हणून गुळाचा खडा अंगणात टाकणारी म्हातारी. काजवे बाटलीत भरून, 'मावशीच्या' पंखाला दोरी बांधून एखाद्या मित्राच्या शर्टात वाणी किडा टाकायचा झाला, तर आणायचा कोठून? आता त्या साऱ्याच दंतकथा. पुढे लोकसाहित्याचे अभ्यासक त्यावर पीएच. ड्या. करतील. तेवढं भाग्य जरी किडा-मुंगीला लाभलं तरी चिक्कार!"

आपल्या सर्वार्थाने कोसळणाऱ्या भवतालाचे आणि आपण गमावत चाललेल्या सृष्टीच्या समृद्ध अशा वैभवाचे नेमके भान अनुभवकथनपर गद्य लेखनातून ठळकपणे व्यक्त होते. दिवसागणिक आपण आपल्या मौलिक परंपरेचा अस्सल ठेवा गमावतो आहोत, आपल्या हातून जगण्यातली अनेक मौल्यवान गोष्टी निसटत चालल्या आहेत याची लख्ख जाणीव अनुभवकथनपर लेखनातून प्रभावीपणे व्यक्त झाली आहे.

## ड) व्यापक पर्यावरणीय भान

उपभोगवादी आणि चंगळवादी जीवनशैलीच्या हव्यासातून होत चाललेले निसर्गाचे अतोनात शोषण आणि उग्र होत जाणारे पर्यावरणाचे प्रश्न याविषयीचे अत्यंत संवेदनशील भाष्य या काळातील अनुभवकथनपर ललितगद्यातून केले गेले आहे. वाढते हवामान बदल, बिघडत जाणारे ऋतुचक्र, नामशेष होत जाणाऱ्या दुर्मीळ नैसर्गिक प्रजाती, प्रदूषण आणि नैसर्गिक संसाधनांचा विनाश याविषयीची अगतिकता आणि या सर्व अनागोंदीविरुद्ध संयतपणे दिलेला प्रतिसाद या अनुभवकथनातून व्यक्त होतो. प्रामुख्याने श्रीकांत इंगळहळीकर , परिणीता दांडेकर, शरदिनी डहाणूकर, प्रकाश गोळे, कृष्णमेघ कुंटे, सत्यजित वसंत पाटील, विद्याधर म्हैसकर या लेखकांच्या लेखनातून पर्यावरणीय आस्था असणारी दृष्टी व्यक्त होते. आपल्या भवतालातील पर्यावरण, सजीव आणि निर्जीव सृष्टीशी माणसांचे अतूटपणे जोडले गेलेले अनुबंध, निसर्गाविषयी असणारा प्रगल्भ आणि निकोप मैत्रभाव, निसर्गावर होणारे मानवी आक्रमण आणि त्याविषयी वाटणारा तीव्र कळवळा या काळातील ललित गद्यातून ठळकपणे व्यक्त झाला आहे. आपल्या भोवतीच्या जगाकडे पाहण्याची नवी दृष्टी या लेखनातून मिळते.

जगण्याचा खरा अर्थ समजण्यासाठी, आपल्या अस्तित्वाची सार्थ ओळख पटण्यासाठी आपण पुरेसे संवेदनशील आणि सजग असायला हवे याचे भान या लेखनातून व्यक्त होते. आपण आपल्या सृष्टीला किती सजगपणे, आस्थेने आणि अभ्यासपूर्ण विवेकाने समजून घेतो यावरच आपली जगण्याची खरी गुणवत्ता अवलंबून असते याची जाणीव या अनुभवकथनातून होते. 'ओकच्या झाडाची गोष्ट' या परिणीता दांडेकर यांच्या ललित लेखातून मानवी संस्कृती आणि मानवी अस्तित्त्व यांच्या व्यापक संदर्भात एका झाडाचे महत्त्व काय असते याचे अत्यंत विलक्षण दर्शन घडते. ऑस्टिन शहरातल्या एका ओकच्या झाडाला वाचवण्यासाठी तिथल्या लोकांनी दाखवलेल्या संवेदनेचे,

आपल्या भवतालाविषयीच्या आणि एकूणच सृष्टीविषयीच्या कृतज्ञतेचे कृतिशील दर्शन घडवते. माणसांनी घडवलेल्या आणि त्यामुळेच अत्यंत मानवकेंद्री बनलेल्या आजच्या आधुनिक जगण्यात झाडांना, पशुपक्ष्यांना, कीटकांना किंबहुना अवघ्या चराचर सृष्टीला अत्यंत महत्त्वाचे स्थान असायला हवे. किंबहुना त्यांचे स्थान महत्त्वाचे असतेच, त्याची समंजस जाणीव आणि आपल्या जगण्यातल्या अग्रक्रमात त्याला आस्थेने स्वीकारत जाणे गरजेचे असते. आपल्या जगण्यातून हद्दपार होत चाललेला सृष्टीविषयीचा विवेकी मैत्रभाव जपण्याचे हृद्य आवाहन या काळातील अनेक ललितगद्य लेखकांनी प्रभावीपणे केले आहे.

## १.२.४. मराठीतील अनुभवकथनपर लेखन परंपरा

फ्रेंच लेखक माँतेनच्या एसेजच्या (१५८०) प्रभावातून लिहिलेल्या 'एसे'मधून इंग्रजीमध्ये 'पर्सनल एसे' या नावाने ललितनिबंध हळूहळू विकसित होत गेला. परंतु मराठीतील ललित गद्य मात्र एकोणिसाव्या शतकात जन्माला आलेल्या मराठी 'निबंधा'मधून निर्माण झालेले नाही, तर ते इंग्रजीमधील चार्ल्स लॅम्ब, डे क्विन्सी यांसारख्या एकोणिसाव्या शतकातील आणि ए. जी. गार्डनर, इ. व्ही. ल्यूकस, रॉबर्ट लिंड यांच्यासारख्या विसाव्या शतकाच्या पहिल्या दोन-तीन दशकांतील इंग्रजी लेखकांच्या ललित निबंधलेखनाच्या प्रभावातून निर्माण झाल्याचे दिसते. १९२६ साली गुजगोष्टी (पुस्तकरूपात १९३३) या नावाने ना. सी. फडके यांनी लिहिलेले लघुनिबंध किंवा त्याच सुमारास वि. स. खांडेकर यांनी लिहिलेले लघुनिबंध यांच्यापुढे वर उल्लेख केलेल्या इंग्रजी ललित लेखकांचाच आदर्श होता. काही अंशी अनंत काणेकरांचे ललितनिबंध लेखन त्यापेक्षा थोडे वेगळे होते. फडके, खांडेकर, काणेकर यांनी लोकप्रिय केलेल्या ललित निबंधाच्या परंपरेत अनेक लेखकांनी लेखन केले. पण १९३० नंतर झपाट्याने वाचकप्रिय व लेखकप्रिय झालेला मराठी ललित निबंधाचा प्रभाव १९४०-४५ नंतर मात्र हळूहळू कमी होऊ लागला. कारण त्या लेखनात साचेबद्धता, यांत्रिकता, व्याजलालित्य (नकली किंवा खोटे लालित्य) आणि व्याजवैचारिकता ( खोटी वैचारिकता, वैचारिकतेचा केवळ आभास) निर्माण होऊ लागली. १९४५ नंतरच्या काळात मात्र मराठी ललित निबंधाने एक नवी भरारी घेतलेली दिसते. या काळातील समर्थ लेखकांनी ललित निबंधाचे रूप पूर्णपणे बदलून मराठी ललित गद्याचा मजबूत पाया घातला. गो. वि. (विंदा) करंदीकर, दुर्गा भागवत, माधव आचवल, इरावती कर्वे, श्रीनिवास विनायक कुळकर्णी, विजय तेंडुलकर, रा.भि.जोशी, महेश एलकुंचवार, ग्रेस, अनिल अवचट यांचे लेखन ललित गद्याच्या कक्षा विस्तारणारे ठरले. ललित गद्यासंबंधीच्या पारंपरिक, रूढ आणि चाकोरीबद्ध कल्पनांना दूर करून या लेखकांनी या साहित्यप्रकाराला नवी सशक्त संरचना देण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या लेखनातून विचार, भावना आणि संवेदना यांच्याशी जोडल्या गेलेल्या विविध अनुभूतींचे लालित्यपूर्ण असे सौंदर्य प्रकट होते. या लेखनामधील गद्याला सामर्थ्य देणारी चिंतनगर्भ वैचारिकता त्यातील लालित्यालाही पोषक ठरत गेल्याचे दिसते. ललित निबंध या नावाने न लिहिले जाणारे प्रवासवर्णनात्मक, स्थलवर्णनात्मक, व्यक्तिचित्रणात्मक असे लेखन पुढच्या

काळात इतके ललित गद्यस्वरूप होत गेले की या प्रकारच्या सर्व लेखनाचा विचार एकत्रच केला जावा आणि त्यांना ‘ललित निबंध’ या संज्ञेऐवजी ‘ललितगद्य’ अशा अधिक व्यापक आणि समावेशक नावाने ओळखले जावे असे मत साहित्य अभ्यासकांनी व्यक्त केले. मराठीतील ललित गद्य लेखनातील एक महत्वाचा उपप्रकार म्हणून अनुभव कथन पर लेखनप्रकाराचा उल्लेख करता येतो. या लेखनप्रकारात महत्त्वाचे योगदान देणाऱ्या काही महत्त्वाच्या लेखकांचा आपण इथे प्रातिनिधिक स्वरूपात आढावा घेणार आहोत.

१) **रा.भि.जोशी**

१९५०-५५ सालापासून मराठीत प्रवासलेखनाच्या रूढ साच्यात फार मोठे बदल झाले. प्रवासलेखनाच्या पारंपरिक स्वरूपात आणि प्रयोजनात फार मोठे परिवर्तन करणाऱ्या लेखकांमध्ये रा. भि. जोशी यांचे नाव अग्रस्थानी आहे. प्रवासलेखनाची आपली 'वाटचाल' त्यांनी रुळलेल्या वाटेने केलेली नाही. काही अनोखे, नवे मार्ग आणि सौंदर्यशोधनाच्या नव्या दिशा चोखाळण्याचा प्रयत्न त्यांनी केलेला दिसतो. रा.भिं.जोशींचे ललितलेखन एका अर्थाने आत्मनिवेदनपर आहे. आत्मनिवेदनपर लेखनात प्रत्यक्षाचा, माहितीचा आणि केवळ वस्तुनिष्ठ दर्शनाचा भाग अधिक असणे हे स्वाभाविक असते. हा भाग तसा अललितच म्हणावा लागेल. परंतु अशा अललित वर्णनामध्येही लालित्य निर्माण करण्याची क्षमता रा. भि. जोशींच्या व्यक्तिमत्वात आहे. कारण त्यांच्या प्रवासलेखनात केवळ वर्णन किंवा नुसते निवेदन येत नाही, तर त्यामध्ये एक प्रकारची नवनिर्मितीही असते. ही नवनिर्मिती त्यांच्या अनुभवाचा समृद्धतेतून साकार झालेली असते. प्रवासवर्णनाच्या निमित्ताने लेखक ज्या स्थळाचे वर्णन आपल्या लेखात करतो, ते स्थळ कदाचित वाचकांनी आधीच पाहिलेले असले तरीही रा. भिं.जोशी यांच्यासारख्या प्रतिभावंत लेखकाने घडविलेल्या त्याच स्थळाच्या पुनर्दर्शनात एक संपूर्णपणे नवी अनुभूती देण्याचे सामर्थ्य असते. कारण स्थळ एकच असले तरी त्याचे दर्शन हा व्यक्तिपरत्वे वेगळा अनुभव ठरत असतो. ती प्रत्येकाची एक वेगळी आणि स्वतंत्र जाणीव असते. त्यामुळे अशा स्थळांचे वर्णन नव्याने वाचताना दर्शनाचा आनंद पुन्हा नव्याने मिळत असतो. या सर्व अनुभवाचे वैशिष्ट्य म्हणजे आपण पूर्वी पाहिलेल्या स्थळाचेच लेखकाने घडविलेले हे दर्शन घटना, नोंदी, त्यांचा इतिहास, पौराणिक कथा, दंतकथा, आख्यायिका आदी पार्श्वभूमींसह अधिकच समृद्ध बनते. या बाबी आपल्याला कशा दिसल्या नाहीत, याचेही आश्चर्य वाचकांना वाटत राहते. आपल्या अनुभवाच्या आनंदाचे अत्तर वाचकांच्याही हाताला लावावे आणि आपल्यासारखे त्यांनाही आनंदित करावे असे त्यांच्यातील लेखकाला सहजपणे वाटते. या स्वाभाविक प्रवृत्तीतूनच त्यांचे प्रवासलेखन अवतरते. मात्र त्यासाठी प्रवासलेखक स्वतः रसिक निरीक्षक हवा. लोकजीवनाचे नवे दर्शन व्हावे याविषयीची ओढ त्याला वाटली पाहिजे. निसर्ग सौंदर्याचा नित्य नवा प्रत्यय त्याला आला पाहिजे. मानवसृष्टी आणि निसर्गसृष्टी यांतील वेचक अनुभवांचा सहजसुंदर आविष्कार करणारी रससिद्ध शैली त्याच्याजवळ असली पाहिजे. रा.भि. जोशी यांच्या व्यक्तिमत्त्वात हे सारे गुण एकवटलेले असल्यामुळे त्यांचे ललित लेखन वाचकांना एका समृद्ध अनुभवविश्वाची सफर घडवते. एक 'अजायबघर' (वाटचाल), अंबा मनोहर नगरी' (मजल

दरमजल ), 'जिथे उथव येतो' (उथव), 'पार्वतीचे क्रीडांगण' (घाटशिळेवरी उभी), 'दिवाकर कृष्ण' (सोन्याचा उंबरठा) यासारख्या त्यांच्या उल्लेखनीय लेखांमधून या सकस अनुभवविश्वाचा प्रत्यय येतो. रा. भि. जोशींचे प्रवासलेखन त्यांच्या एकूण वाङ्मयाचे एक सरस आणि अभिरूचीसंपन्न असे अंग आहे. या प्रवासचित्राची एकच एक शैली किंवा प्रकार नाही. यात कधी ते स्थलचित्रे रेखाटतात, तर कधी त्या स्थळांशी संबंध असलेल्या भाववृत्तीचे चित्रण करतात. धर्मप्रवणता (वाई, गाणगापूर, पंढरपूर, औदुंबर इत्यादी), वाङ्मयीन कुतूहल (पैठण, ऋद्धिपूर, एलिचपूर, अंबेजोगाई इत्यादी) ऐतिहासिक आकर्षक स्थळे (लाहोर, दिल्ली, आग्रा, देवगिरी इत्यादी), निसर्ग-शोभा (गोमंतक, गोकर्ण, धनुष्कोडी, कारवार इत्यादी) अशा विविध प्रेरणांमधून शब्दबद्ध झालेले हे सर्व प्रवासलेख मुळात लेखकाच्या प्रसन्न जीवनदृष्टीच्या एका महत्त्वाच्या जीवनसूत्रात गुंफलेले आहेत. म्हणूनच त्यांचे सारे प्रवासलेखन एका अर्थाने जीवनाची वाटचाल करताना आलेल्या अनुभवांचे चित्रण ठरते. मराठीतील प्रवासवर्णनपर लेखनात किंबहुना एकूणच ललित गद्यात रा.भि. जोशी यांचे योगदान अनन्यसाधारण असे आहे.

## २. अनिल अवचट

अनिल अवचट हे मुक्त स्वरूपाचे ललित गद्यलेखन करणारे एक महत्त्वाचे लेखक आहेत. १९७४ ते २००० या पंचवीस वर्षांच्या काळात प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या ललितगद्य लेखनातून सामाजिक प्रश्नांचे, बदलांचे, नवनिर्माणाचे अत्यंत समृद्ध असे अनुभवविश्व रेखाटले गेले आहे. बहुपेडी वृत्तान्तकथन (रिपोर्ताज) आणि वस्तुनिष्ठ तरीही लालित्याच्या अंगाने केले गेलेले सामाजिक निरीक्षण अशा स्वरूपात त्यांच्या या समग्र ललितलेखनाचे स्थूलमानाने वर्णन आणि वर्गीकरण करता येऊ शकेल. पण अनिल अवचट यांचे एकूण लिखाणाचा विचार करता हे वर्गीकरण काहीसे अपूर्ण स्वरूपाचे ठरते. कारण अवचटांचे स्फुटलेखन एकाच प्रकारचे नाही. त्यात शैली, आशयविषय, आकृतिबंध अशा दृष्टीने बरेचसे वैविध्य आढळते. प्रारंभीच्या 'वेध' (१९७४) या सदरलेखनातून सिद्ध झालेल्या पुस्तकानंतर अवचट यांच्या लेखनाला अनेक आश्वासक अशा दिशा मिळत गेल्या. त्यातल्या वैशिष्ट्यानुसार आणि काळानुसार 'माणसं', 'मोर', 'कार्यरत', 'आप्त', 'स्वतःविषयी', 'अमेरिका', 'छंदांविषयी' अशा पुस्तकांच्या स्वरूपात काही टप्पे नोंदवता येतील. अवचट यांचे काही लेखन वृत्तान्तपर आहे. अशा वृत्तान्तवजा लेखसंग्रहातील एक महत्त्वाचा संग्रह म्हणजे 'माणसं' हे त्यांचे पुस्तक होय. वस्तुनिष्ठ निरीक्षणे, समाजजीवनाविषयीची, माणसांविषयीची सखोल अशी आस्था, संदर्भबहुलता आणि व्यापक सामाजिक भान ही त्यांच्या ललित लेखनाची वैशिष्ट्ये ‘माणसं’ या ललित लेखनातून प्रभावीपणे व्यक्त होतात. विश्लेषणाला लालित्याची डूब मिळाल्याने या लेखनाला एक प्रकारचा संवादीपणा प्राप्त होतो. विभिन्न क्षेत्रांत भेटलेल्या माणसांचे विलक्षण अनुभव, स्वतःचा अंतर्मुख होऊन घेतलेला शोध, एखाद्या सामाजिक कार्यकर्त्याच्या कार्याचा दीर्घ असा परिचय करून देणे, प्रवासातील अनुभवाचे निवेदन करणे असे त्यांच्या लेखनातील कथनाचे वेगवेगळे प्रकार आहेत. 'मोर'सारख्या संग्रहातील आत्मपर लेखात आत्मनिष्ठा आणि कलात्मकता

यांचा समन्वय झाला आहे. 'मोर'मधील काही लेखांत मनाच्या विश्रब्ध अवस्थेतील मनन-चिंतन आहे; तर 'स्वतःविषयी' या पुस्तकात त्यांनी आपल्या जीवनातील वैयक्तिक स्वरूपाच्या अनुभवांचे प्रांजळ निवेदन केले आहे. 'छंदांविषयी 'मध्ये त्यांनी स्वतःच्या छंद जोपासनेचा सहजसाध्या शैलीत परिचय करून दिला आहे. एकूणच, अवचट यांच्या लेखनातील 'मी' त्यांच्या लेखनाच्या वेगवेगळया दिशा वेळोवेळी निश्चित करीत गेला आहे. सामाजिक स्थितिगतीचा सहानुभूतीने 'वेध' घेणाऱ्या अवचट यांना सामाजिक विषमता, श्रमजीवी, गोरगरीब, पददलित स्त्री-पुरुषांचे समाजात चाललेले शोषण, त्यांच्यावर होणारे अन्याय इत्यादींबद्दल खंत वाटते; काही वेळा त्यांच्या मनात अपराधीपणाची जाणीवही निर्माण होते. सहानुभूतिपूर्ण, प्रत्ययकारी लेखन करणाऱ्या अवचट यांच्या शैलीत विषयवस्तुबद्दलची जिज्ञासा आणि अपार कुतूहल दिसून येते. वर्ण्यविषयाबद्दलची आत्मीयता आणि सहृदयता यांमुळे त्यांचे लेखन कृत्रिम होत नाही; ते सर्व थरांतल्या वाचकांना विचारप्रवृत्त करते. अत्यंत सातत्याने , वैविध्यपूर्ण, प्रदीर्घ आणि अभ्यासू लेखन करून अवचट यांनी गेल्या वीस वर्षांत मराठी ललितगद्य लेखनाच्या अनेक वाटा मोकळया केल्या आहेत. सामाजिक पार्श्वभूमी असणाऱ्या आत्मपर लेखनाच्या कलात्मक शक्यता वाढवण्याचे त्यांचे प्रयत्न अत्यंत भरीव स्वरूपाचे आणि लक्षणीय आहेत.

**३. राजन गवस**

बदलती कृषीनिष्ठ ग्रामसंस्कृती, जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत बदलत चाललेली गाव-खेड्यातील सांस्कृतिक मूल्यव्यवस्था याविषयी वस्तुनिष्ठपणे आणि संवेदनशीलतेने केलेले भेदक असे भाष्य हे राजन गवस यांच्या ललित गद्याचे एक प्रमुख आशयसूत्र आहे. *काचाकवड्या* (२००६), *कैफियत* (२०१०) आणि *लोकल ते ग्लोबल* (२०१९) या तीन ललितलेखसंग्रहातून राजन गवस यांच्या प्रगल्भ अशा मूल्यभानाचा एक प्रवास ठळकपणे अधोरेखित होतो. जागतिकीकरण, खाजगीकरण आणि उदारीकरण यांच्या प्रभावातून वाढत गेलेल्या बाजारु मूल्यव्यवस्थेमुळे समृद्ध अशी कृषीनिष्ठ ग्रामसंस्कृती कशी पोखरत गेली याचे अस्वस्थ करणारे चित्र त्यांच्या ललितलेखनातून व्यक्त होते. आपली पारंपरिक ग्रामीण व्यवस्था कृषीकेंद्रित होती. पशुपक्षी, झाडे, वेली, नद्या इतकेच नव्हे तर इथले किडा-मुंगीदेखील आपल्या जगण्याचा, सहजीवनाचा अविभाज्य भाग होता. आर्थिक सुबत्ता नसली तरी पर्यावरणाच्या, निसर्गाच्या समृद्ध भवतालात मानवी जगण्याला एका निरामय आनंदाचा ठहराव होता. माणसांमध्ये निर्मळ प्रेमाचा एक आस्थाभाव टिकून होता. निसर्गाशी अभिन्नपणे जोडल्या गेलेल्या माणसांजवळ रोजच्या अनुभवातून, कष्टातून आणि संघर्षातून उमललेले साधे तरीही सत्त्वयुक्त शहाणपण होते. शेतीशी निगडित अनेक विषयांमधले प्रत्यक्ष अनुभवसिद्ध असे ज्ञान हा ग्रामीण समाजव्यवस्थेचा एक अनमोल ठेवा होता. पण बदलत्या उपभोगवादी आणि बाजारू व्यवस्थेच्या आगमनामुळे तिथली ही पारंपरिक मूल्यव्यवस्था कशी उखडून टाकली जात आहे याचे एक अस्वस्थ करणारे चित्र राजन गवस यांच्या ललितगद्यातून उभे राहते. त्यांच्या लेखांची शीर्षकेही हा आशय सहजपणे पोहोचवणारी आहेत. 'तयार खेळण्यांचं

रेडिमेड बालपण', 'डांगर ते बर्गर', 'हलगी ते डॉल्बी' 'किडा-मुंगीने जगावं', 'नोटा छापण्याचे मशीन' अशा बोलक्या शीर्षकांमधून या सर्व आशयसूत्रांचे अर्थवाही सूचन होते. संवेदनशीलता आणि परखडपणा, आस्था आणि चिकित्सा, साधेपणा आणि नेटकेपणा यांच्यातील अचूक समतोल साधणारी वाङ्मयीन दृष्टी हे राजन गवस यांच्या अनुभवकथनपर गद्याचे लक्षणीय असे वैशिष्ट्य आहे.

### ४) अरुण खोपकर

'चित्रव्यूह', 'चलतचित्रव्यूह', 'अनुनाद' , 'कालकल्लोळ' आणि 'प्राक-सिनेमा' अशा पाच पुस्तकांमधून अरुण खोपकर यांचे मुक्तचिंतनात्मक ललित गद्यलेखन प्रसिद्ध झाले आहे. या सर्वच लेखनातून जाणवणारे एक समान सूत्र म्हणजे त्यांचे कलाविषयक चिंतन होय. चित्रपट आणि साहित्य हे त्यांचे खास आस्थेचे विषय आहेत. या दोन्ही कलांमधील विविध पैलूंचा वेध त्यांनी आपल्या ललितगद्यातून प्रभावीपणे घेतला आहे. जगभरच्या कला-व्यवहाराचे चौफेर भान असणाऱ्या एका प्रगल्भ कलादृष्टी लाभलेल्या व्यक्तिमत्त्वाचे समृद्ध अनुभवविश्व या लेखनातून प्रकट होते. चित्रपटकलेमध्ये सहभागी असणाऱ्या परंतु बऱ्याचदा पार्श्वभूमीलाच राहणाऱ्या अनेक घटकांचे, तंत्र आणि तंत्रज्ञानाविषयीचे मूलभूत असे चिंतन या लेखनातून व्यक्त होते. लेखकाला भेटलेले अनेक लेखक, कलावंत, दिग्दर्शक, त्यांचे कलाविषयक दृष्टिकोन या लेखनातून प्रभावीपणे व्यक्त झाले आहेत. पु. ल. देशपांडे, मामा वरेरकरांसारख्या साहित्यिकांपासून ते बारा भाषा येणाऱ्या पानवाल्यापर्यंत आणि जहागीर सबावाला, भूपेन खक्कर अशा मोठ्या चित्रकारांपासून ऋत्विक घटक, गुरुदत्त यांच्यासारख्या चित्रपटकर्त्यांपर्यंत अनेक प्रकारच्या कलावंतांचे जाणिवविश्व या लेखनातून उलगडत जाते. एखादा कलावंत किंवा अभ्यासक विशिष्ट विषयात अभ्यास करत, प्रवास करत खोल-खोल जात राहतो तेव्हा त्याला त्या कलेतील काही मूलभूत आणि व्यापक असे भान हाती लागते. संत तुकारामांच्या भाषेत कलेतले 'बीजमूळ' सापडत जाते. याचे उत्तम उदाहरण म्हणून अरुण खोपकरांच्या ललित गद्यलेखनाकडे निर्देश करता येईल. अरुण खोपकर आपल्या लेखनातून विविध कलांची मूलभूत तत्त्वे कशी एकमेकांशी जोडली गेली आहेत हे नेमकेपणाने उलगडून दाखवतात. वेगवेगळ्या ज्ञानशाखा एकमेकींना किती पूरक ठरतात, त्या ज्ञानशाखांचा परस्परांशी किती जवळचा संबंध असतो हे सांगतात. त्यामुळे कलावंताने आणि आस्वादक अभ्यासकानेही केवळ एकाच साच्यात, एकाच विचारधारेत अडकणे किती धोक्याचे असते हे ते सहजपणे लक्षात आणून देतात. कलांच्या आस्वाद, आकलनात विविध ज्ञानशाखांमधील विचाराचा किती मोलाचा सहभाग असतो हे या लेखनातून स्पष्ट करतात. आणि अशा समतोल आकलनामधूनच कलावंताला कलेविषयीची एक व्यापक अशी दृष्टी प्राप्त होऊ शकते याची लख्ख जाणीव करून देतात. खोपकरांची भाषा कुठेही कृत्रिम होत नाही. केवळ परिभाषेतल्या क्लिष्टतेत अडकून पडत नाही. देश विदेशातल्या विविध विषयांच्या संदर्भांची रेलचेल असूनही त्यातली भाषेची आंतरिक लय आणि डौल टिकवून ते टिकवून ठेवतात. मराठी भाषेच्या अभिजात सौष्ठवाची जाणीव करून देताना ते

वर्तमान काळातल्या मराठी संस्कृतीची परखडपणे चिकित्साही करतात. कलेतल्या वैश्विकतेचे, त्यातून समृद्ध होत जाणाऱ्या एका कलासाधकाचे अभिजात मुक्तचिंतन म्हणून अरुण खोपकरांचे अनुभवकथनपर गद्य लेखन अत्यंत महत्त्वाचे ठरते.

**५) वसंत आबाजी डहाके**

'यात्रा-अंतर्यात्रा' या प्रवासवर्णनपर ललित गद्यसंग्रहामधून वसंत आबाजी डहाके यांच्या वाङ्मयीन व्यक्तित्वाची जडणघडण कशी होत गेली याचे हृद्य असे दर्शन घडते. लेखकाच्या लिहिण्याचा आणि त्याच्या आंतरिक आणि बाह्य प्रवासाचा नेमका काय संबंध असतो याचा शोध घेण्याचा प्रयत्न या लेखनातून केला गेला आहे. आपण अनुभवतो ती स्थळे, प्रदेश, अवकाश आपल्या भावविश्वावर, सर्जनशीलतेवर आणि जीवनदृष्टीवर नेमका काय परिणाम करतात याविषयीचे चिंतनशील भाष्य या लेखनामधून व्यक्त होते. लेखकाच्या घडण्यात व्यक्तिगत वर्तनापासून ते आपण ज्या सामाजिक पर्यावरणात वाढतो त्यातील गुंतागुंतीपर्यंत अनेक पैलूंचा असणारा सहभाग यात नोंदवला गेला आहे. डहाके यांच्या 'गोष्ट : न सांगता येण्याविषयीची' या ललित लेखसंग्रहातून मानवी संस्कृतीमधल्या दडपल्या गेलेल्या, बाहेर न येऊ शकलेल्या अनेक मूक संवेदनांना, 'आतल्या गोष्टींना' अत्यंत आत्मीयतेने शब्दरूप दिले गेले आहे. समाजाकडून सतत दाबल्या गेलेल्या, कोंडलेल्या आणि बंदिस्त झालेल्या गोष्टी सांगण्यासाठी एक मुक्त अवकाश असला पाहिजे अशी आस्था या लेखनातून व्यक्त होते. अशा अव्यक्त गोष्टी सांगण्यातच आयुष्याचे सार्थक आहे म्हणूनच 'लिहिणं' हे एक प्रकारे सूक्ष्मरूपाने 'सार्थपणे जगणंच आहे' असा जगण्याचा नवा सर्जनशील अन्वयार्थ ते या ललित द्यातून वाचकांसमोर ठेवतात. आपल्या विवेकदृष्टीला अनेक कारणांमुळे आलेले आंधळेपण नष्ट व्हावे, त्यासाठी भवतालातल्या काळोखाचे नवे भान आपल्याला यायला हवे याची सखोल आणि मर्मग्राही मांडणी करतात. जगण्यातल्या वेगवेगळया रूपातल्या या काळोखाच्या खऱ्या भानातूनच अंधार आणि उजेड यांचा खरा अर्थ आपल्याला सापडू शकेल असा विश्वास त्यांच्या लेखनातून व्यक्त झाला आहे. आपल्या जगण्याचा आणि कलांचा अतूट संबंध त्यांच्या लेखनातून ठळकपणे उलगडत जातो. 'पाहणं' हेही एक प्रकारचे वाचनच असते अशा शब्दात त्यांनी दोन कलानुभवांच्या परस्परांशी असणाऱ्या एकसंध नात्याचा सार्थ शोध अत्यंत प्रभावीपणे घेतला आहे. एका अर्थाने सर्वच कलांचा शोध हा 'मूर्त शब्दरूपाकडून अमूर्त अर्थरुपाकडे' कसा झेपावत राहतो याचे अत्यंत मूलगामी आणि चिंतनशील असे दर्शन त्यांच्या ललित लेखनातून होत राहते. लिहिणे ही केवळ एक भाषिक कृती एवढेच नसून जीवनाच्या बहुपेडी रूपाचा एक कलात्मक शोध असतो याचे नेमके चित्र डहाके यांच्या ललितगद्यातून प्रकट होते. जगणे म्हणजे नुसते जीवन व्यतीत करणे नसून जीवनाला सर्जनशील आकार देत राहणे असते याचे प्रगल्भ असे भान त्यांच्या ललितगद्यातून व्यक्त होते. डहाके यांच्या व्यक्तिमत्त्वातील चिंतनशीलता, काव्यात्मक दृष्टी, संयत

आणि समंजस अशी जीवनदृष्टी आणि जीवनाच्या प्रगाढ सखोलतेचे भान ही वैशिष्ट्ये त्यांच्या अनुभव कथनपर गद्यातूनही ठळकपणे प्रकट होतात.

**६) कृष्णमेघ कुंटे**

'एका रानवेड्याची शोधायात्रा' हे कृष्णमेघ कुंटे यांचे ललितगद्य लेखन म्हणजे रुळलेले, रूढ असे हमरस्ते नाकारून समृद्ध अनुभवाच्या नव्या पायवाटा शोधू पाहणाऱ्या एका संवेदनशील तरुणाचे अनुभवकथन आहे. महाविद्यालयात रसायनशास्त्राच्या परीक्षेत नापास झाल्यामुळे वाट्याला आलेल्या रिकाम्या वेळेचा लेखकाने केलेल्या सर्जनशील उपयोगाचे वर्णन या लेखनातून केले गेले आहे. त्याने या फावल्या वेळेत केलेल्या मदुमलाईच्या जंगलाच्या सफरीची ही विलक्षण अशी गोष्ट आहे. परीक्षेतल्या अपयशाने खचून न जाता जंगलात प्राणीनिरीक्षणासाठी जाण्याचा निर्णय कृष्णमेघला एक नवी दृष्टी देतो. या सर्व जंगलप्रवासाचे थरारक आणि रोमांचक आणि सुंदर अनुभवांनी भरलेले हे अनुभवकथन एक विलक्षण असा रोमांचक आणि समृद्ध करणारा अनुभव देते. जंगलातले हत्ती, रानगवे, रानकुत्री यांच्यासह साऱ्या जंगल अनुभवांचे केवळ वस्तुनिष्ठ आणि तटस्थ चित्रण यात येत नाही तर त्यांच्यासोबत आस्थेने केलेल्या सोबतीचे, सहप्रवासाचे संवेदनशील दर्शन या लेखनातून घडते. मदुमलाईच्या जंगलाचे, त्यातल्या वनस्पती, पशुपक्षी आणि इतर जीवांचे, निसर्गाच्या रौद्ररूपाचे, गूढ अशा अरण्यविश्वाचे हे प्रत्ययकारी दर्शन आपली जीवनाविषयीची समज वाढवणारे आहे.

**७) सदानंद देशमुख**

सदानंद देशमुख यांच्या अनुभवकथनपर गद्य लेखनातून जगण्यातील सर्जनशीलतेपुढील दुहेरी आव्हानांचे अत्यंत मनस्वी असे चिंतन व्यक्त होते. आधुनिकीकरणाच्या रेट्यात होत असलेल्या खेड्यातील कृषीनिष्ठ संस्कृतीच्या ऱ्हासाचे अस्वस्थ चित्र त्यांच्या लेखनातून व्यक्त होते. त्यांच्या ललित गद्यातून शेती आणि सर्जनशीलतेचा एक घनिष्ठ असा संबंध प्रभावीपणे व्यक्त होतो. माती हे सर्जनाचे, नवनिर्मितीचे प्रतीक आहे. मातीची नवनिर्मितीची क्षमता ही मानवी जगण्यातली एक मौलिक गोष्ट असते. आधुनिकतेच्या रेट्यात कृषीनिष्ठ अशा ग्रामीण संस्कृतीत 'हाराकी' म्हणजेच 'हायब्रीड ,रासायनिक खते आणि कीटकनाशके' यांचा प्रवेश झाला आणि त्यातूनच मातीची ही सर्जनशीलता धोक्यात आली. आधुनिकतेच्या नावाखाली चंगळवादाची चटक खेड्यापाड्यात शेताबांधावर पोहोचली. 'हाराकी'च्या विषारी व्यवस्थेने आपली समृद्ध अशी सर्जनशील भूमी नासवली याचे विषन्न करणारे दर्शन सदानंद देशमुख यांच्या 'भुईरिंगणी' या ललितगद्यसंग्रहातून घडते. सिमेंट काँक्रीटच्या बांधकामापेक्षाही मजबूत अशी मातीने बांधलेली गावातील शंभर फुटी गढी, ट्रॅक्टर-ट्रॉलीने अगदी सहजपणे भुईसपाट करता येते याची हताश जाणीव लेखक व्यक्त करतो. हे भीषण आधुनिक वर्तमान माणसाच्या संहारशक्तीचे अतिशय भयावह असे रूप दाखवते. मनात आणलं तर माणूस काहीही नष्ट करू शकतो हे भीषण वास्तव सदानंद देशमुख यांच्या ललितगद्यातून

व्यक्त होते. 'कातरकळा', 'जीवकाचणी', 'कापूसकाळ', 'उतरकरी', 'दुखणकरी', या त्यांच्या लेखांच्या शीर्षकांमधूनदेखील ही अगतिकता प्रभावीपणे प्रकट होते.

## ८) श्रीकांत देशमुख

श्रीकांत देशमुख यांच्या 'पडझड वाऱ्याच्या भिंती' या ललितगद्य संग्रहातून ग्रामीण, कृषिनिष्ठ अशा माणसांचे, त्यांच्या चैतन्यमय भावविश्वाचे एक हृद्य असे दर्शन घडते. ग्रामीण संस्कृतीशी अतूटपणे जोडल्या गेलेल्या माणसांचे विलक्षण जग या लेखनातून उलगडत जाते. 'पहाटपाळणा', 'बापू', 'मामाचा गाव' आणि 'गोविंदबाग' यासारख्या ललितलेखांमधून लेखकाची कौटुंबिक जडणघडण आणि कौटुंबिक पार्श्वभूमीचा लेखकाच्या भावजीवनावर पडलेला प्रभाव व्यक्त झाला आहे. या लेखनाचे स्वरूप वरवर काव्यात्मक आणि संवेदनशील व्यक्तीचित्रणाचे असले तरी लेखकाची व्यापक सामाजिक जाण, वैचारिक बैठक आणि मानवतावादी दृष्टी या लेखनाला एक प्रगल्भ जीवनचिंतनाच्या स्तरावर घेऊन जाते. या लेखनातून सर्वच पातळ्यांवर होत चाललेली मानवी संवेदनांची, निसर्गसाखळीची, आधुनिकतेच्या अतिरेकातून संकोचत चाललेल्या सांस्कृतिक मूल्यांची पडझड लेखकाने आंतरिक तळमळीतून व्यक्त केलेली आहे. लेखकाचे व्यक्तिगत भावजीवन, आसपासच्या मायाळू कष्टकरी माणसांशी जोडलेले त्याचे नातेबंध आणि एकूणच माणसांचे परस्परांशी असणारे आपुलकीचे आस्थेचे आणि स्नेहाचे बंध एका आंतरिक तरलतेतून लेखकाने व्यक्त केले आहेत.

## ९) प्रवीण बांदेकर

प्रवीण दशरथ बांदेकर हे आजच्या काळातील अत्यंत सखोल अशी जीवनदृष्टी असणारे लेखक आहेत. समकालीन जगण्यात  निर्माण झालेल्या, अनेक कंगोरे असणाऱ्या प्रश्नांना विस्तृत अवकाश असणाऱ्या कथात्मक वाङ्मयप्रकारातून त्यांनी समर्थपणे अभिव्यक्त केले आहे. कादंबरीप्रमाणेच ललितगद्यासारख्या आत्मनिष्ठ वाङ्मयप्रकारातूनही त्यांनी आजच्या काळाविषयीचे चिंतनशील भाष्य नोंदवणारे अत्यंत महत्त्वाचे लेखन केले आहे. 'घुंगुरकाठी' , 'हरवलेल्या पावसाळ्यांचा शोध' यासारखे ललितगद्य आणि 'अरते ना परते' या लेखसंग्रहातून त्यांनी केलेले गद्यलेखन ललितगद्य या वाङ्मयप्रकाराच्या नव्या शक्यता आणि सामर्थ्यस्थळे शोधणारे आहे. आपल्या भवतालातील मूल्यांचा होत जाणारा ऱ्हास, या मूल्यऱ्हासामुळे संवेदनशील माणसांची आणि सर्जनशील कलावंतांची होणारी कोंडी या ललित गद्य लेखनातून आंतरिक कळवळयातून टिपली गेली आहे. एका बाजूला बदलत्या सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक परिस्थितीचे अत्यंत सूक्ष्म असे भान या लेखनातून व्यक्त होते, तर दुसरीकडे या परिस्थितीत संवेदनशील माणसाच्या नितळ जाणिवा कशा पणाला लागतात याचे हृद्य चित्रण त्यांच्या ललित गद्यातून केले गेले आहे. आपल्या भूमीविषयीचा अपार आस्थाभाव त्यांच्या ललितगद्यातून ठळकपणे व्यक्त होतो. आजच्या काळात होत चाललेले निसर्गाचे अपरिमित असे शोषण आणि त्यातून उभे राहणारे व्यापक

पर्यावरणीय प्रश्न बांदेकरांच्या अनुभवकथनपर ललितगद्यलेखनातून अतिशय भेदकपणे मांडले गेले आहेत.

### १०) श्रीकांत इंगळहळीकर

'आसमंत' आणि 'नवा-आसमंत' या ललितगद्यसंग्रहांमधून श्रीकांत इंगळहळीकर आपल्या सृष्टीकडे, निसर्गातील समृद्ध अशा विश्वाकडे पाहण्याची एक नवी दृष्टी वाचकाला देतात. निसर्गातील अनेक आविष्कारांचा, सृष्टीचक्रातल्या बदलांचा वेध या लेखनातून अत्यंत आत्मीयतेने घेतला गेला आहे. निसर्गातील अनोख्या वनस्पतीविश्वाचे आणि त्यातल्या विलक्षण अशा वैविध्यपूर्ण अनुभवाचे वेधक दर्शन इंगळहळीकरांच्या ललित लेखनातून घडते. निसर्गाबद्दलचे अपार कुतूहल , सृष्टीतील अज्ञाताचा वेध घेण्याची अखंड जिज्ञासा आणि त्यातील बारकावे टिपण्याची दृष्टी यामुळे हे ललित लेखन आपल्या भवतालातील अपरिचित अशा अद्भुत जगाचे विलक्षण दर्शन घडवते. निसर्गातील बदलांकडे अधिक निकोपपणे आणि पूर्वग्रहरहित विवेकाने पाहण्याचा नम्र आग्रह या लेखनातून व्यक्त होत राहतो. आपल्या संकुचित मानवकेंद्री अशा दृष्टीला इंगळहळीकर अधिक विस्तारीत अशा सृष्टीकेंद्री विश्वाचे समंजस भान आणून देतात. मराठी साहित्यातील अनुभवकथनपर गद्यलेखनाला श्रीकांत इंगळहळीकर यांनी दिलेले योगदान अत्यंत मूलगामी आणि अभूतपूर्व असे आहे.

### ११) डॉ.आ.ह.साळुंखे

डॉ. आ.ह.साळुंखे यांची महाराष्ट्रातील महत्त्वाचे प्रागतिक विचारवंत, संशोधक आणि लेखक म्हणून स्वतंत्र आणि ठळक अशी अशी ओळख आहे. वैचारिक आणि संशोधनात्मक लेखनाबरोबरच त्यांनी अतिशय मौलिक, चिंतनशील ललितगद्य लिहिले आहे. व्यक्ती आणि समष्टी यांच्या बौद्धिक, मानसिक, भावनिक अंगांचे विवेकी परिवर्तन व्हावे याची तीव्र तळमळ त्यांच्या अनुभव कथनपर ललितगद्यातून व्यक्त होते. आशयाला अनुकूल ठरतील असे पत्रात्मक, चिंतनात्मक, काव्यात्मक आणि संवादरूप अशा प्रकारांचा लवचिक असा वापर त्यांच्या ललितगद्य लेखनातून प्रभावीपणे केलेला दिसतो. 'तुझ्यासह आणि तुझ्याविना', 'चांदण्यात भिजायचं राहून जाऊ नये, म्हणून!', 'त्यांना सावलीत वाढवू नका !', 'शंभर कोटी मेंदू, दोनशे कोटी हात', 'मन निरभ्र व्हावं' 'मित्रांना शत्रू करू नका !' अशा पुस्तकांमधून आणि त्यांच्या लक्षणीय अशा शीर्षकांमधूनही त्यांच्या ललितगद्याच्या शैली आणि आशयाची दिशा सूचित होते. आ.ह.साळुंखे यांच्या ललितगद्यातून व्यक्ती आणि समाजातील अनेक स्तरात जगणारी सामान्य माणसे म्हणजेच व्यष्टी आणि समष्टी यांच्या समग्र परिवर्तनाची संवेदनशील अशी तळमळ व्यक्त होते. जगण्यातल्या संघर्षाला सामोरे जाण्यासाठी समाजातील सर्वच स्तरातील सामान्य माणसांना ऊर्जा मिळावी आणि जगण्यातल्या निरामय आनंदाचे क्षण त्याला अनुभवता यावेत याची तळमळ त्यांच्या लेखनातून व्यक्त होते.

जीवनाकडे बघण्याच्या निर्मळ आणि निकोप दृष्टीचे दर्शन या लेखनातून घडते. त्यांच्या ललित लेखनातून कुठल्यातरी पारलौकिक, खोट्या विश्वाचे भाबडे स्वप्न दाखवले जात नाही. वास्तव जीवनाची निरर्थकता दाखवणारी निराशावादी भूमिका किंवा खोटे सांत्वनही त्यातून केले जात नाही. तर माणसाचे रोजचे जगणे अधिकाधिक प्रगल्भ आणि उन्नत होण्यासाठी हवी असलेली दिशा त्यांच्या ललित गद्यातून अचूकपणे दर्शवली जाते. त्यांच्या समग्र ललित गद्यातून इहवादी आणि लौकिक जीवनदृष्टीचा आग्रह व्यक्त होतो. विवेकी आणि विज्ञानवादी दृष्टीने जीवनाला सामोरे गेल्यास आपण आपले आणि इतरांचेही जीवन खऱ्या अर्थाने सुंदर आणि अर्थपूर्ण करू शकतो याचा विश्वास त्यांच्या ललितगद्यातून सार्थपणे प्रकट होतो. जीवनातल्या प्रत्येक क्षणामधली मौलिकता आणि सौंदर्य लक्षात आले तरच जगण्याचा अर्थ आपल्याला कळू शकेल अन्यथा 'जीवन कळायला लागतं, तेव्हा ते संपत आलेलं असतं!' अशा अतिशय कठोर वास्तवाला सामोरे जावे लागते याचे नेमके भान त्यांच्या ललित लेखनातून व्यक्त होते. तरल संवेदनशीलता, सामाजिक उत्थानाची तीव्र आकांक्षा, आणि जगण्यातले सौंदर्य आणि निरागसतेची उत्कट ओढ यामुळे हे ललितगद्य एक चिंतनशील, काव्यात्मक तरीही अत्यंत प्रखर असा वैचारिक दृष्टिकोन वाचकाला देते.

## १२) सत्यजित पाटील

सत्यजित वसंत पाटील यांचे ‘कुब्र’ हे अनुभवकथनपर गद्यलेखन म्हणजे अरण्य अनुभवाच्या चिंतनशील अशा नोंदी आहेत. ‘एका शुष्क पानझडी जंगलातल्या नोंदी’ अशा उपशीर्षकातून लेखकाने या लेखनाचे स्वरूप स्पष्ट केले आहे. जंगलातल्या अनेक ऋतूंमधल्या निरीक्षणांमधून हे लेखन आकाराला येते. जंगलातले बिबटे, तरस, वाघ, रानकुत्री, अजगर त्याचप्रमाणे फुलपाखरे, मुंग्या अशा अनेक सजीवांबद्दलचे अनुभव या लेखनातून नोंदवले गेले आहेत. जंगल हे अनेक जीवांच्या , वनस्पतींच्या आणि प्राकृतिक आविष्कारांच्या परस्परसंबंधातून निर्माण झालेली एक समृद्ध परिसंस्था असते. या परिसंस्थेमध्ये दिवसेंदिवस मानवी हस्तक्षेप वाढतच चालला आहे. त्याचे दुष्परिणाम ग्लोबल वॉर्मिंग, वाढते प्रदूषण, अवर्षण आणि इतर पर्यावरणीय समस्यांमधून आज आपण अनुभवतोच आहोत. हा मानवी हस्तक्षेप असाच वाढत राहिला तर संपूर्ण सृष्टीवर त्याचे खूपच गंभीर असे दुष्परिणाम होऊ शकतात. त्यामुळे जंगल आणि एकूणच निसर्गाचे समृद्ध वैभव जपण्याचे आवाहन या लेखनातून व्यक्त होते. अरण्याच्या समृद्ध अनुभवातून सृष्टीने आपल्याला दिलेल्या वैभवाचे मोल किती मोठे आहे याची जाणीव होते. आणि मानवाच्या हव्यासामुळे, वाढत्या उपभोगवादी जीवनशैली मुळे, चंगळवादामुळे नष्ट होत चाललेले हे वैभव जपण्याची तीव्र गरज अधोरेखित होते.

## १.२.५. संपत देसाई : सामाजिक कार्य आणि लेखन

संपत देसाई हे सामाजिक चळवळीतील एक कृतिशील कार्यकर्ते आहेत. समाजातील शोषित, कष्टकरी, कामगार आणि दुर्लक्षित समाज समाज घटकांच्या प्रश्नासाठी काम करणारे सामाजिक कार्यकर्ते आणि लेखक अशी त्यांची ओळख आहे. संपत देसाई यांच्या व्यक्तित्व आणि लेखन यातून त्यांचे  स्थानिक इतिहास, प्रादेशिक , सामाजिक सांस्कृतिक परंपरेचे भान अत्यंत नेमकेपणाने व्यक्त होताना दिसते. सामाजिक, सांस्कृतिक विकासाविषयीची तीव्र आस्था त्यांच्या लेखनातून प्रकट होते. लोकचळवळी, परिवर्तनवादी सामाजिक लढे यांच्याशी त्यांचे एक अभिन्न असे नाते असलेले जाणवते. त्यांनी शिवाजी विद्यापीठातून मराठी विषयातून पदव्युत्तर (एम.ए.) शिक्षण घेतले आहे. या शिक्षणक्रमाच्या काळात शिवाजी विद्यापीठातील शैक्षणिक, सांस्कृतिक वातावरणात त्यांची बौद्धिक बैठक आकाराला येत गेली. एम.ए. झाल्यानंतर गावाकडील मित्रांना सोबत घेऊन त्यांनी 'आजरा युवा मंच'ची स्थापना केली. डाव्या चळवळीशी जोडलेल्या अभ्यासकांची व्याख्याने आयोजित करण्यापासून वेगवेगळया प्रकारचे सामाजिक, सांस्कृतिक आणि प्रबोधनपर कार्यक्रम हाती घेतले. अशाच एका कार्यक्रमादरम्यान घडलेला एक प्रसंग संपत देसाई यांच्या एकूणच व्यक्तिगत आणि सामाजिक वाटचालीसाठी कलाटणी देणारा ठरला. त्या कार्यक्रमात ज्येष्ठ कम्युनिस्ट नेते कॉ. गोविंद पानसरे यांनी संपत देसाईंना एक प्रश्न विचारला, "अरे, किती दिवस अशा केवळ जयंत्याच साजऱ्या करीत राहणार ? या परिसरात श्रमिक कष्टकऱ्यांचे काही प्रश्न आहेत की नाहीत ? इथे काही तरी श्रमिक कष्टकऱ्यांचा लढा उभा राहिल्याशिवाय मला परत आजऱ्यात बोलावू नका." कॉ. गोविंद पानसरे यांचे हे वाक्य या परिसरातील सामाजिक चळवळीसाठी एक नवी संजीवनी देणारे ठरले. त्यांच्या या दिशादर्शक प्रश्नातून पुढील सामाजिक चळवळीचे जणू एक बीजच पेरले गेले. त्यानंतर संपत देसाई यांच्या पुढाकारातून साहित्य संमेलन, सामाजिक न्याय हक्क परिषद, पर्यायी विकासनीतीवर युवक-युवतींची शिबिरे, शिवाय कॉ. धनाजी गुरव यांच्यासारखे अभ्यासक पाहुणे निमंत्रित करून त्यांच्या मार्गदर्शनाने लहान-मोठ्या उपक्रमांना सुरुवात झाली. पुढे अल्पावधीतच या चळवळीच्या कक्षा रुंदावत गेल्या. स्वतःची गरिबी आणि पोटापाण्याच्या प्रश्नाची तमा न बाळगता संपत देसाई यांनी धरणग्रस्तांच्या प्रश्नांना वाहून घेतले. या प्रश्नासाठी त्यांनी स्वतःला पूर्णवेळ वाहून घेतल्यामुळे कामांची काटेकोर आखणी आणि अंमलबजावणी होत गेली. पुढील काळात संपत देसाई यांनी धरणग्रस्तांसाठी आमदारकीची निवडणूकही लढवली आणि पूर्णवेळ कार्यकर्ता म्हणून या चळवळीत स्वतःला झोकून दिले. धरणग्रस्त, डंगे धनगर, मुस्लिम व इतर अल्पसंख्याक, अपंग, विधवा व परित्यक्त्या स्त्रिया ,पूरग्रस्त शेतकरी अशा समाजातील शोषित वर्गासाठी रस्त्यावरचे लढे लढणारे कॉम्रेड अशी संपत देसाई यांची ठळक ओळख बनली. रस्त्यावरच्या लढ्याबरोबरच वैचारिक मंथन घडवण्यासाठी त्यांनी विविध परिवर्तनवादी चळवळीशी त्यांनी स्वतःला जोडून घेतले आहे. विद्रोही साहित्य संमेलन, महिला साहित्य संमेलन व अपंग साहित्य संमेलन या साहित्य संमेलनाच्या तसेच धर्मनिरपेक्षतेची मूल्ये रुजविण्यासाठी विविध सलोखा परिषदांच्या आयोजनातही

त्यांचा महत्त्वाचा सहभाग राहिला आहे. डॉ.भारत पाटणकर यांच्या श्रमिक मुक्ती दल या संघटनेचे ते राज्य संघटक आहेत. चित्री धरणग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी त्यांनी दिलेल्या अभूतपूर्व अशा लढ्याचे अत्यंत प्रत्ययकारी आणि प्रभावी चित्रण त्यांनी आपल्या 'एका लोकलढ्याची यशोगाथा' या अनुभवकथनपर पुस्तकातून केले आहे.

## १.३ समारोप

माणसाच्या मनात निर्माण होणारा कोणताही विचार त्याला येणाऱ्या विविध अनुभवांवरून सुचतो. सुचलेल्या विचारांना मिळतीजुळती अशी अनेक उदाहरणे तो आपल्या तसेच इतरांच्या जीवनातून किंवा पुस्तकांमधून शोधतो. स्वतःला नंतर येणारे अनुभव त्या विचारांशी ताडून पाहतो. त्यातूनच तो जीवनात काही आडाखे, नियम बांधून जीवन सुकर, सुंदर, आणि समृद्ध करतो. म्हणजेच मनात आलेले विचार हे अनुभव, उदाहरणे, दृष्टांत, पुरावे देऊन मांडण्याची प्रवृत्ती साहित्यात प्राचीन काळापासून आढळते. ती एकूण वैचारिक आणि ललित वाङ्मयात स्पष्ट-संदिग्ध, स्थूल-सूक्ष्म, प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष आणि प्रतीकात्मक स्वरूपात तसेच अनुभव, माहिती, वर्णन, शोध यांच्या स्वरूपात सर्वत्र दिसते. ललित वाङ्मयाच्या सर्व प्रकारांमध्ये ती दाखविता येते. महानुभावांचे दृष्टांतपाठ, ज्ञानेश्वरीतील दृष्टांत ही त्याचीच उदाहरणे आहेत. निबंध हा त्यातीलच एक तर्कनिष्ठ आणि विचारांना महत्त्व देणारा प्रकार आहे. अनुभवकथनपर लेखनप्रकार स्वातंत्र्योत्तर काळात अधिक ठळकपणे विकसित झालेला दिसत असला तरी त्याचे मूळ प्राचीन मराठी गद्य परंपरा आणि त्यानंतर अलीकडच्या काळातील 'निबंध', 'लघुनिबंध' यामध्ये सापडते. निबंध, लघुनिबंधाचेच अधिक विकसित रूप म्हणजे आजचे ललित गद्य होय. आणि ललित गद्यातीलच एक महत्त्वाचा प्रकार म्हणजे अनुभवकथन होय. अनुभवकथनपर गद्य हे बाह्य स्वरूपावरून निबंधात्मक वाटले, तरी अंतर्गत वैशिष्ट्यांमुळे निबंधापेक्षा वेगळे ठरते. आत्मपरता, अनौपचारिकता हे त्याचे विशेष असले, तरी त्यामध्ये चिंतनशीलता आणि वैचारिकता आणि वस्तुनिष्ठ अशी वास्तवदर्शी शैली यांचे प्रतिबिंब दिसून येते. हे लेखन एखाद्या अनुभवाच्या किंवा विषयाच्या निमित्ताने झालेले असते. एखादी विशिष्ट घटना, व्यक्तिगत अनुभव अथवा सामाजिक वास्तव टिपणारा घटनाक्रम, एखादा प्रवासाचा अनुभव किंवा निसर्गानुभव, एखाद्या स्थळाचे दर्शन, एखाद्या कलाकृतीचा अनुभव, एखादा संवेदनानुभव, भावानुभव किंवा विचारानुभव यांचे निमित्त अशा लेखनाला पोषक ठरते. त्या अनुभवाचे सर्वांगाने दर्शन घडवण्याच्या, तो अनुभव अनुभूतीच्या पातळीवर भावजीवनाचा भाग बनवण्याचा प्रयत्न अनुभवपर गद्य लेखनातून केला जातो. अनुभवातील संवेदना, भावना, विचार यांच्याशी जोडले गेलेले विविध प्रकारचे पैलू त्या अनुभवाचे बारीकसारीक कंगोरे आणि तपशील नोंदवण्याचा प्रयत्न अनुभवकथनपर लेखनातून केला जातो. त्यातूनच सूक्ष्म सामाजिक निरीक्षणे, जीवनातील गुंतागुंतीचे दर्शन अनुभव कथनातून घडताना दिसते. सामाजिक वास्तवाचे चित्रण घडवताना अटळपणे अवतरणारी वैचारिकताही या लेखनात येऊ शकते. वरवर पाहता अनुभवकथनपर लेखन निरीक्षण, विश्लेषण, तर्क-अनुमान, प्रमाण अशा गोष्टींचा

आधार घेत लिहिले जाते असे वाटते पण त्याची संरचना शास्त्रीय लेखनाच्या मांडणीप्रमाणे तर्काधिष्ठित नसते. अनुभवकथनाची संरचना त्या-त्या अनुभवाचा पोत सांभाळून केली जाते. अनुभव कथनाची एकूण शैली ही त्या अनुभवाचे जगण्याशी असणारे अतूट असे नाते प्रभावीपणे उलगडून दाखवणारी असते. तो अनुभव भाषेतून मांडण्यासाठी कथनाच्या अनेक पद्धतींचा वापर अनुभव कथनातून केला जातो. अनुभव, सामाजिक सांस्कृतिक चिंतन, आणि वैचारिकता यांचा वाचकाला एकाच वेळी एकत्रित असा प्रत्यय देणारी एक संरचना निर्माण करण्याचा प्रयत्न अनुभव कथनातून केला जातो.

## १.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

**१. रूपबंध**- लेखक एखादे पुस्तक लिहिताना (संहिता) विचारांची, कल्पनेची जी विशिष्ट अशी रचना किंवा मांडणी करतो त्याला साहित्यकृतीचा रूपबंध असे म्हणतात. रूपबंधालाच आकृतिबंध किंवा घाट असेही म्हटले जाते. रूपबंधात संहितेचे भाषिक रचना, लेखनाची शैली यांना महत्त्व असते.

**२. ’मी’त्त्व**- व्यक्ती किंवा लेखक यांच्या जडणघडणीतून तयार झालेली त्याची मते, भावना, कल्पना, विचार यांमधून त्याचा जो व्यक्तिगत दृष्टीकोण निर्माण होतो त्याला ’मी’त्त्व असे म्हणतात.

## १.५ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न आणि उत्तरे

**१.** इंग्रजीतील कोणत्या समीक्षकाने साहित्याची ‘व्हेअर साउंड अँड मीनिंग आर वन’ अशी व्याख्या केली आहे.

अ) रॉबर्ट फ्रौस्ट    ब) ए. सी. ब्रॅडली

क) विल्यम गोल्डिंग    ड) जॉन पॉल सार्त्र

**२.** 'एका रानवेड्याची शोधायात्रा' हे अनुभवकथनपर लेखनाचे पुस्तक कोणी लिहिले आहे?

अ) सत्यजित पाटील     ब) श्रीकांत इंगळहळीकर

क) कृष्णमेघ कुंटे    ड) संपत देसाई

**३.** हे अनुभवकथनपर पुस्तक अनिल अवचट यांनी लिहिलेले आहे.

अ) हरवलेल्या पावसाचा शोध  ब) लोकल ते ग्लोबल

क) आसमंत  ड) माणसं

**४.** ‘यात्रा-अंतर्यात्रा’ या अनुभवकथनपर ललित गद्याचे लेखक कोण आहेत?

अ) राजन गवस  ब) रा.भि.जोशी

क) वसंत आबाजी डहाके  ड) अरुण खोपकर

**५.** ‘चांदण्यात भिजायचं राहून जाऊ नये म्हणून’ या अनुभवकथनपर ललित गद्याचे लेखक कोण आहेत?

अ) आ.ह.साळुंखे  ब) पु.ल. देशपांडे

क) संपत देसाई  ड) नरेंद्र दाभोळकर

**उत्तरे :** १.(ब) ए. सी. ब्रॅडली  २. (क) कृष्णमेघ कुंटे  ३. (ड) माणसं

४. (क) वसंत आबाजी डहाके  ५. (अ) आ.ह.साळुंखे

१.६ **लघुत्तरी प्रश्न**

(१) ललित आणि ललितेतर साहित्य म्हणजे काय ?

(२) साहित्याची वर्गीकरण व्यवस्था म्हणजे काय?

(३)

## १.७. दीर्घोत्तरी प्रश्न

(१) अनुभवकथनपर लेखनाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

(२) अनुभवकथनपर लेखन करणाऱ्या मराठीतील महत्त्वाच्या लेखकांच्या योगदानाची चर्चा करा.

(३) अनुभवकथनपर लेखनाची संकल्पना व स्वरूप स्पष्ट करा.

**१.८. टीपा लिहा.**

१) अनिल अवचट यांचे अनुभवकथनपर लेखन.
२) संपत देसाई यांचे सामाजिक आणि लेखन कार्य.
३) अनुभवकथनपर लेखनाचे स्वरूप
४) डॉ.आ.ह.साळुंखे यांचे अनुभवकथनपर लेखन

**१.९ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ / पुस्तके**

१. साहित्यः अध्यापन आणि प्रकार (प्रा. वा.ल. कुलकर्णी गौरव ग्रंथ), संपादक : श्री.पु.भागवत, सुधीर रसाळ, मंगेश पाडगावकर, शिल्पा तेंडुलकर,अंजली कीर्तने

२. ललित गद्याचे तात्त्विक स्वरूप आणि मराठी लघुनिबंधाचा इतिहास- आनंद यादव

## २. 'एका लोकलढ्याची यशोगाथा' मधील आशयसूत्रे, सामाजिक प्रश्न व चळवळ

### २.१ उद्दिष्टे (Objectives) :

'एका लोकलढ्याची यशोगाथा' हे पुस्तक अभ्यासल्यानंतर आपणास

१. विकास प्रकल्पांची वास्तविकता समजून येईल.

२. विकास प्रकल्पांमध्ये विस्थापित होणाऱ्या लोकसमूहांचे प्रश्न समजतील.

३. धरण प्रकल्पामुळे ऱ्हास होणारी पर्यावरणीय व नैसर्गिक संसाधने याबाबत सजगता निर्माण होईल.

४. सामाजिक प्रश्नांवर लोकचळवळी कशा उभ्या राहतात व कसे लढे लढविले जातात, याची माहिती होईल.

५. सामाजिक चळवळी, विकास धोरणे, विस्थापन आणि वाङ्मय यांच्यातील सहसंबंध समजून येतील.

### २.२ प्रास्ताविक (Introduction) :

'एका लोकलढ्याची यशोगाथा' हे संपत देसाई यांनी लिहिलेले अनुभवकथन आहे. आजऱ्या जवळ पाच-सहा किलोमीटरवर असणारे पेरणोली हे संपत देसाई यांचे मूळ गाव आहे. ते विद्यार्थीदशेत असल्यापासूनच विविध सामाजिक चळवळींमध्ये सक्रिय होते. ग्रामीण भागातील विद्यार्थी व शेतकरी यांच्या प्रश्नांसाठी लढण्याची त्यांची भूमिका होती. १९९० च्या दरम्यान गडहिंग्लज व परिसराला पाणीटंचाईच्या समस्येला तोंड द्यावे लागत होते. त्यामुळे जनतेतून धरण बांधण्याची मागणी सुरू झाली होती. त्यानुसार प्रारंभी आजाऱ्यातील रामतीर्थावर धरण बांधायचे निश्चित झाले होते. परंतु तिथे मोठे धरण बांधले तर २२-२३ गावे पाण्याखाली जाणार होती. तसेच जंगलाचा मोठा भागही पाण्याखाली जाण्याची शक्यता होती. त्यामुळे मोठ्या धरणा ऐवजी चित्री, उचंगी अशी छोटी धरणे बांधावीत, असे ठरले. यादरम्यानच दांडोबा व इतर डोंगरांमध्ये बॉक्साईट खाणी सुरू करण्यास शासनाने परवानगी दिली होती. त्यामुळे पर्यावरणाचा मोठा ऱ्हास सुरू झाला होता. चित्री धरणामुळे रायवाडा, गावठाणवाडी, अवंडी ही तीन गावे विस्थापित होणार होती. त्यामुळे तेथील लोकांनी शासनाविरुद्ध संघर्ष सुरू केला. 'आधी पुनर्वसन, मग धरण', अशी घोषणा दिली. या तीन गावातील प्रकल्पग्रस्तांना जोपर्यंत राहण्यासाठी पर्यायी जागा व कसण्यासाठी पर्यायी शेती दिली जात नाही, तोपर्यंत मूळ गाव सोडायचे नाही व धरण बांधण्याला विरोध करायचा, असे ठरवून लढा उभा करण्यात आला. त्या लोकलढ्याची कहाणी म्हणजे प्रस्तुत पुस्तक होय.

## २.३ विषय विवेचन (Presentation of Subject Matter) :

**'एका लोकलढ्याची यशोगाथा' मधील आशयसूत्रे**

१. चित्री नदी खोऱ्यातील समृद्ध पर्यावरण व जनजीवन

२. चित्री नदीवरील धरणामुळे निर्माण झालेला विस्थापितांचा प्रश्न

३. योग्य पुनर्वसनासाठी धरणग्रस्तांचा संघर्ष

४. धरणग्रस्तांसाठी श्रमिक मुक्ती दलाने अभ्यासपूर्वक केलेली विधायक चळवळ

५. आजरा परिसरातील इतर सामाजिक चळवळी

६. पुनर्वसनानंतर नव्या गावात उभे राहिलेले प्रश्न

प्रस्तुत पुस्तकात वरील प्रमाणे आशयसूत्रे आलेली आहेत.

**१. चित्री नदी खोऱ्यातील समृद्ध पर्यावरण व जनजीवन**

कोल्हापूर जिल्ह्यातील आजरा तालुक्यातील हिरण्यकेशी नदीची एक उपनदी म्हणजे चित्री आहे. कोल्हापूर सिंधुदुर्ग या दोन जिल्ह्यांच्या सरहद्दीवर नांगरतासच्या घनदाट जंगलात उगम पावणारी ही नदी घनदाट जंगलातून वाट काढत पुढे आजऱ्या जवळ हिरण्यकेशी नदीला येऊन मिळते. तिचा प्रवास जेमतेम २५-३० मैलांचा आहे.

चित्री नदीचे खोरे म्हणजे एक समृद्ध पर्यावरणीय वारसा होता. ही नदी घनदाट व जिवंत जंगलामधून वाहते. अनेक बारमाही वाहणारे ओहळ या नदीला मिळतात. बारमाही पाणी उपलब्ध असल्यामुळे शेकडो प्रकारचे वृक्ष, दुर्मीळ पशुपक्षी या जंगलात पहावयास मिळतात. वड, पिंपळ, ऐन, किंजळ, बहावा, पळस, खैर, हिरडा, आवळा, नाना, जांभूळ, सावर, पांगिरा, सिसम शिकेकाई, साग या अशा सदाबहार डेरेदार वृक्षांबरोबरच बकरा, कारवी, नरक्या अशी वनौषधी आणि तमालपत्री, मिरी हे मसाल्याचे पदार्थ येथे मिळतात. येथील जंगलात चितळ, गवे, रानडुक्कर, हरण, सांबर, अस्वल, ससे, शेकरू, तसेच बिबट्या, वाघ, काळा चित्ता यांचे दर्शन घडते.

चित्री नदीच्या काठाकाठाने वस्ती करून राहणाऱ्या लोकांची येथील निसर्गाशी घट्ट मैत्री आहे. विशेषतः घनदाट जंगलात राहणारे गाई म्हशी पाळणारे डंगे धनगर खऱ्या अर्थाने निसर्गपुत्र आहेत.

येथे राहणाऱ्या कुणबी व धनगर लोकांनी निसर्गामध्ये मैत्रीपूर्ण हस्तक्षेप केला. कमीत कमी पर्यावरण हानी होईल याची काळजी घेतली. त्यांच्या वाढवडिलांनी शेती करण्यासाठी झाडे झुडपे तोडून साफसफाई करून शेती

विकसित केली होती. नंतरच्या पिढ्यांनी शेतीपर्यंत नैसर्गिकरित्या पाणी आणले आणि बागायती शेती केली. दरवर्षी आडव्या पाटाची छोटी छोटी धरणे बांधली.

येथील लोक निसर्गपूरक सण व उत्सव साजरा करतात. डंगे गवळी धनगर घटाचा उत्सव म्हणजे दसरा साजरा करतात, तर कुणबी शिमगा सण साजरा करतात. दरवर्षी एका धनगरवाड्याची निवड करून सर्वांना निमंत्रण दिले जाते. घट उठविण्याचा दिवशी दूरवरून डंगे गवळी धनगर स्त्री-पुरुष पारंपरिक वेशभूषित गज्जो नृत्य करीत एकत्र येतात. जंगलातच एखाद्या मोकळ्या जागी रात्रभर जागर करतात. हलगी, पितळी, कडे ही पारंपरिक वाद्ये वाजवतात. त्यांच्यासाठी निसर्ग हाच देव असल्याने कोणतीही मूर्तिपूजा नसते. मोकळ्या माळावरच मांड मांडतात. त्या भोवती दह्यादुधाने भरलेली गाडगी मडकी ठेवतात. रात्रभर गाऊन नाचून दुसऱ्या दिवशी सकाळी आणलेल्या नैवेद्याचा काला करून सगळे एकत्र जेवण करतात. त्यानंतर सामूहिक गज्जो नृत्य केले जाते. उत्साहात त्यांचा खेळ रंगतो.

या भागातील कुणबी शिमगा सण साजरा करतात. होळी पुनवे पासून अमावसेपर्यंत त्यांचा सण रंगत जातो. विविध देवदेवतांची रूपे घेऊन कलावंतांची पथके गावोगाव फिरू लागतात. गावागावाच्या चौकात फेर धरून खेळ रंगू लागतात. शिमग्याच्या सणात गावाच्या चव्हाट्यावर रोंबाट रंगात येते. त्यामध्ये गावात वर्षभरात घडलेल्या बऱ्या वाईट घटनांचा जाहीर पंचनामा केला जातो. त्यामुळे नेकीने जगण्याची रीत हे लोक सांभाळतात.

येथील धनगर व कुणबी परस्परांना मदत करतात. धनगर कुणब्यांना दूध दुभते, मध, लाकूड फाटा, औषधी वनस्पती, जनावरे देतात. तर कुणबी धनगरांना धान्य देतात, असा चित्रीचा समृद्ध वारसा असतो.

## २. चित्री नदीवरील धरणामुळे निर्माण झालेला विस्थापितांचा प्रश्न

हे या पुस्तकातील दुसरे आशयसूत्र आहे. चित्री नदीच्या उगमाकडील जिवंत जंगल एका खाजगी कंपनीला बॉक्साईट उत्खनन करण्यासाठी म्हणजेच खाणकाम करण्यासाठी दिले गेले होते. त्यामुळे चित्री नदीच्या उगमाकडील जंगल भुईसपाट होऊ लागले भूसरुंगासाठी वापरलेल्या रसायनामुळे तेथील पाणी प्रदूषित झाले. त्याचा पहिला फटका डंगे धनगरांना बसला. त्यांची जीवनशैली बदलून गेली. हिरवा चारा न मिळाल्यामुळे दूध दह्याचा व्यवसाय बंद पडला. तेथील धनगर बॉक्साईट खाण, जंगल खाते येथे रोजंदारीवर जाऊ लागले. काही लोकांनी स्थलांतर केले. या दरम्यानच गडहिंग्लज विभागात पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाल्यामुळे धरण बांधण्याची मागणी होऊ लागली. मोठे धरण बांधण्या ऐवजी चित्री व उचंगी अशी मध्यम सिंचन प्रकल्प उभे करण्याची मागणी पुढे आली. चित्री धरणामुळे रायवाडा, गावठाणवाडी, अवंडी ही तीन गावे विस्थापित होणार होती.

रायवाडा ही शेतमजूर कुणब्यांची वस्ती होती. ती इटे गावचीच छोटी वस्ती होती. पूर्वीच्या ब्राह्मण वतनदारांच्या शेतात मजूर म्हणून कामाला आलेले लोक नंतर स्थायिक झाले. त्यांना थोडीफार शेती मिळाली. परंतु गांधीजींच्या हत्येनंतर ब्राह्मणांची घरे जाळल्याचा आळ त्यांच्यावर आला. त्यामुळे त्यांनी मूळ गावठाणाच्या वरच्या बाजूस चाळोबाच्या डोंगरात एका सपाट जागी नवी वस्ती वसवली. कोणाचीही हुजरेगिरी न करता स्वाभिमानाने जगणारा गाव अशी त्यांनी स्वतःची ओळख निर्माण केली होती.

गावठाणवाडी ही लाटगाव या गावाची छोटी वाडी होती. इनामदारांच्या शेतात राबणारे मजूर किंवा कुळ अशी यांची ओळख होती. गाई म्हशी शेळ्या पाळून त्यांचा उदरनिर्वाह चालत असे. घरटी एक माणूस मुंबईला असे. हे ९५% भूमिहीन लोकांचे गाव होते. गावच्या इनामदारांची अदृश्य दहशत या लोकांवर होती.

अवंडी हे खालच्या धनगरवाड्याजवळ जंगलात व उंचावर वसलेले गाव होते. या गावात वतनदार लिंगायत होते. तर इतर लोक कुणबी व धनगर होते. गावात ग्रामदैवत रामलिंगाचं कौलारू मंदिर होते. तिथेच थोडी देवराई होती. गाव उंचावर होते. परंतु शेतजमीन चित्री नदीच्या काठावर होती. येथील शेतकऱ्यांनी चित्री नदीला आडव्या पाटाचं धरण बांधून पाटाने पाणी वळवत वळवत शेती बागायती केली होती. ही तीनही गावे धरणाखाली बुडणार होती. गावठाण व शेती पाण्याखाली जात असल्यामुळे ही गावे येथून उठवणे व त्यांचे दुसरीकडे पुनर्वसन करणे शासनाने ठरविले होते. परंतु प्रत्यक्ष पुनर्वसन पहिल्यांदा न करता धरणाचे काम सुरू केले गेले होते. त्यामुळे येथील लोकांच्या राहण्याचा तसेच उपजीविकेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला होता. स्वतःच्या मालकीचे हक्काचे घरदार व शेतजमीन धरणाखाली जाणार. त्या मोबदल्यात दुसरीकडे घरासाठी जागा व शेतजमीन मिळणार का? हे होत असताना नुकसान भरपाई मिळणार का? नव्या पुनर्वसनात नागरी सुविधा कधी आणि कशा मिळणार? असे अनेक प्रश्न धरण प्रकल्पामुळे निर्माण झालेले होते. त्यामुळे या तीनही गावातील लोक भयभीत झाले होते. ते एकत्र येऊन शासकीय अधिकारी व नेते यांना निवेदन देणे, मोर्चा काढणे, असे जे सुचेल ते प्रयत्न करत होते.

### ३. योग्य पुनर्वसनासाठी धरणग्रस्तांचा संघर्ष

प्रस्तुत पुस्तकातील मध्यवर्ती संघर्ष हा धरणग्रस्तांचा आहे. जे शासनाच्या विकास प्रकल्पामुळे बाधित होतात त्यांना योग्य ती भरपाई देणे हे शासनाचे कर्तव्य असते. परंतु योग्य भरपाई वेळेत दिली जात नाही. तसेच पुनर्वसन देखील वेळेत होत नाही. म्हणून या लोकांना संघर्ष करावा लागतो. चित्री धरणग्रस्तांनी देखील असा संघर्ष उभा केला होता. धरण होणार या बातमीनेच या परिसरातील माणसे पूर्ण हादरून गेली. तीन गावातील लोकांना नेमके काय करावे ते सुचेना. कोणीतरी असे सुचविले की आमदारांची भेट घ्यावी. तेव्हा मुकुंद लाड आणि दोरुगड्याचा म्हातारा आमदारांना भेटण्यासाठी गेले. परंतु भेट झाली नाही. त्यानंतर गावठाणवाडीचे विठ्ठल चौगुले, रायवाड्याचे मुकुंद लाड, अवंडीचे एस. के. पाटील, लाटगावचे सयाजी देसाई असे वेगवेगळे लोक एकत्र जमले. त्यांनी गावागावात फिरून माणसे जमा केली आणि धरणाच्या विरोधात धरण कृती समितीच्या नेतृत्वाखाली आजरा तहसील

कार्यालयावर मोर्चा काढण्याचा निर्णय झाला. गावागावात सभा बैठका सुरू झाल्या. धरणाच्या भीतीने हबकलेली माणसे घराबाहेर पडली. आजऱ्यातील बाबुराव कुंभार यांच्या नेतृत्वाखाली मोर्चा निघाला. तुमचं धरण आमचं मरण, अशा घोषणा देत मोर्चा तहसीलदार कार्यालयावर गेला. त्यानंतर जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका झाल्या. सत्ताधाऱ्यांच्या विरोधात लोकांनी मतदान केले. जमिनीच्या संपादनापूर्वीच धरणाचे काम सुरू झाले. गावपुढाऱ्यांना हाताशी धरून सरकारी अधिकारी व ठेकेदार गावातील लोकांचे संमती पत्र घेऊ लागले. धरणग्रस्त गावातील लोकच धरणाच्या कामावर जाऊ लागले. पाच वर्षे असे काम चालले. शेवटी धरणाची भिंत रायवाडा गावाला येऊन थटली. हे गाव उठवल्याशिवाय पुढील काम सुरू करता येणार नव्हते. त्यामुळे गावकऱ्यांना गाव रिकामे करण्याची नोटीस देण्यात आली. त्यामुळे गावकरी भयभीत झाले. एकत्र येऊन वेगवेगळ्या प्रकारे संघर्ष सुरू झाला.

### ४. उचंगी व चित्री धरणग्रस्तांसाठी श्रमिक मुक्ती दलाने अभ्यासपूर्वक केलेली विधायक चळवळ

चित्री प्रकल्पातील धरणग्रस्त लोक संघर्ष करत होते. त्यादरम्यानच आजऱ्यामध्ये संपत देसाई, वंदन जाधव, रवी शेंडे, संभाजी बापट, कवी रणजीत कालेकर या तरुणांनी प्रा. सुनील गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली आजरा युवा मंच या संघटनेची स्थापना केली होती. त्यांनी उद्घाटनाचा मोठा कार्यक्रम घेतला होता. त्यावेळी डॉ. अशोक चौसाळकर प्रमुख पाहुणे होते. या कार्यक्रमाच्या निमित्ताने राजाभाऊ शिरगुप्पे आणि कॉम्रेड धनाजी गुरव यांचा परिचय झाला. राजाभाऊ हे निर्मिती ज्ञानपीठ नावाची एनजीओ चालवत होते, तर धनाजी गुरव श्रमिक मुक्ती दलाचे काम करत होते. धनाजी गुरव यांनी लेखकासमोर पर्यायी विकास निती या विषयावर तरुणांचे शिबिर घेण्याची कल्पना मांडली. डॉ. भारत पाटणकर यांनी लिहिलेली 'पर्यायी विकास निती' ही पुस्तिका वाचण्यात आली. त्यातूनच धरणग्रस्तांच्या लढ्याला शास्त्रीय पाया मिळू शकतो, ही गोष्ट पुढे आली. उचंगी धरणग्रस्तांचा संघर्ष याच आधारे सुरू होता. डॉ. भारत पाटणकर यांच्या नेतृत्वाखाली आणि श्रमिक मुक्ती दलाच्या मार्गदर्शनाखाली उचंगी संघर्षाचा लढा चालवायचा, असे ठरले. त्यासोबतच चित्री, आंबेओहोळ, एरंडोल येथील धरणग्रस्तांचा लढा देखील उभा करायचा ठरले. यादरम्यान हा सगळा संघर्ष एकत्रित करण्यासाठी पूर्ण वेळ कार्यकर्ता आवश्यक आहे, अशी कल्पना पुढे आली आणि त्यासाठी सर्वांनी संपत देसाई यांचेच नाव सुचविले. सगळ्यांनी शेवटपर्यंत मदत करण्याचा शब्द दिल्यामुळे संपत देसाई यांनी पूर्णवेळ कार्यकर्ता होण्यास तयारी दर्शवली.

चित्री धरणग्रस्तातील कोणीही प्रतिनिधी पर्यायी विकास नीतीच्या शिबिरात आलेले नव्हते. त्यामुळे तेथील गावकऱ्यांशी बोलून संघर्षाची दिशा ठरविण्याचे निश्चित झाले. त्यानुसार लेखक स्वतः, रवी शेंडे व पांडुरंग सुकवे हे सगळे रायवाड्याच्या शांताराम लाड यांच्याकडे गेले. रायवाडा हे ३२ कुटुंबांचे आणि शंभर दीडशे लोकवस्तीचे गाव होते. गावातील पुरुष माणसे रोजगारासाठी मुंबईला गेलेली होती. गावात स्त्रिया, वृद्ध व मुले राहत असत. तेथे एक मीटिंग होऊन संपत देसाई व इतर सांगतील त्याप्रमाणे संघर्ष करायचा ठरले. तशाच पद्धतीने

गावठाणवाडीतील राजाराम चौगुलेच्या घरी बैठक झाली. तिथेही लोकांनी संघटनेच्या माध्यमातून संघर्ष करायचे ठरविले. आवंडी गावात मात्र ग्रामपंचायत निवडणुकांचे वातावरण होते. तेथून संमिश्र प्रसिद्ध प्रतिसाद मिळाला.

आजरा परिसरातील चित्री, उचंगी, चिकोत्रा, आंबेओहोळ, एरंडोल या छोट्या प्रकल्पातील धरणग्रस्तांची परिषद २२ नोव्हेंबर १९९७ रोजी आजरा येथील बाजार मैदानावर घेण्याचे ठरले. या दरम्यानच उचंगी धरणाच्या सर्वेक्षणाची नोटीस चाफवडे गावात लागली होती. या उचंगी प्रकल्पाच्या विरोधात चाफवडे, जेऊर येथील कष्टकरी स्त्री-पुरुषांनी जोरदार संघर्ष केलेला होता. आता त्याला श्रमिक मुक्ती दल व आजरा युवा मंचाची साथ मिळाली. त्यामुळे उचंगीच्या माळावर पोलीस बंदोबस्तात आलेले तहसीलदार लोकांचे आक्रमक वर्तन पाहून माघारी गेले. त्यानंतर आजऱ्यातील धरणग्रस्तांची परिषद झाली. सर्व प्रकल्पातील हजारो धरणग्रस्त स्त्री-पुरुष जमले. क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी डॉ. भारत पाटणकर, कॉम्रेड नाना शेटे, कॉम्रेड जिवंतराव सावंत असे मान्यवर मंचावर होते. प्रत्येक धरण बाधित क्षेत्रातील कार्यकर्ते आपापल्या व्यथा मांडू लागले. चित्री, एरंडोल, आंबेओहोळ, उचंगी येथील धरणग्रस्तांनी आपल्या व्यथा मांडल्या. यादरम्यानच तहसीलदार दोन-तीन पोलीस घेऊन व्हिडिओ चित्रीकरणासाठी आले. डॉ. भारत पाटणकर यांनी त्यांना बाहेर घालवा, असे सांगितले. कार्यकर्त्यांनी त्या सर्वांनाच बाहेर घालविले. स्थानिक राजकीय कार्यकर्ते या परिषदेतील नेतृत्व करणाऱ्यांना उपरे परके असे म्हणत होते. त्यामुळे भाषण करताना भारत पाटणकर यांनी असे म्हटले की, जो माणूस कष्ट करतो त्याची व आमची भावकी एक आहे. कष्टकऱ्यांच्या न्याय हक्कांच्या लढ्यात आम्ही त्यांच्यासोबत आहोत. याच परिषदेत असे ठरविण्यात आले की, जोपर्यंत उचंगी धरणाला कष्टकरी जनतेने दिलेल्या पर्यायावर निर्णायक चर्चा होत नाही, तोपर्यंत शासकीय अधिकाऱ्यांना गावबंदी. तसेच चित्री, चिकोत्रा धरण धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम जोपर्यंत धरणाच्या कामाच्या तुलनेत पुढे येत नाही, तोपर्यंत तेथील धरणाचे काम देखील बंद. अशा पद्धतीने मोठी परिषद झाली व धरणाचे काम बंद पाडून पुनर्वसनाचे काम प्राधान्याने करून घ्यायचे, असे धोरण ठरविण्यात आले. तत्पूर्वी शासकीय अधिकारी व धरणग्रस्तांचे नेतृत्व यांनी एकत्र बसून चर्चा करून निर्णय घ्यायचा, असेही ठरविण्यात आले. त्यानुसार पुढे आजऱ्याचे तहसीलदार, कोल्हापूरचे जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात बैठका होऊ लागल्या. पाटबंधारे विभाग धरणाचे काम लवकर सुरू करू द्यावे, अशी आग्रही मागणी करत होता. जिल्हाधिकारी मनुकुमार श्रीवास्तव यांच्या अध्यक्षतेखाली बैठक होत होती. ज्या वेगात धरणाचे काम सुरू आहे, त्या वेगात पुनर्वसनाचे सुरू नाही, याकडे लक्ष वेधले जात होते.

कार्यकर्त्यांना अनेक पातळ्यांवर संघर्ष करावा लागत होता. गाव शिवारांचे नकाशे, जमिनीची प्रतवारी, पिकांची माहिती, दुबार पीक कोठे घेतले जाते, कोठे शेतीला पाणी मिळते किंवा मिळत नाही, अशी अनेक प्रकारची माहिती कार्यकर्ते जमा करत होते. त्या आधारे के. आर. दाते, सुहास परांजपे, के. जे. जॉय, दत्ता देसाई असे राष्ट्रीय स्तरावरील अभ्यासक नियोजन करत होते. पुनर्वसनासाठी शास्त्रशुद्ध अभ्यास आणि योग्य नियोजन याची गरज होती. ती या माध्यमातून पूर्ण केली जात होती. पावसाळ्यात धरण बांधणीचे काम बंद पडत होते. त्यामुळे पावसाळ्यापूर्वी वेगवान हालचाली होत होत्या. धरणाचे काम म्हणजे ठेकेदार, शासकीय अधिकारी, पुढारी यांना

आर्थिक लाभ. त्यामुळे ते गडबड करून कसलेही नियोजन न करता धरणग्रस्तांना पुरेसा मोबदला व जमीन दिली, असे दाखवू इच्छित होते. याउलट संघटना धरणग्रस्तांच्या दीर्घकालीन वास्तव्याचा विचार करून नियोजन करू पाहत होती. त्यामुळे हा लढा संघटनेच्या माध्यमातून पुढे गेलेला दिसून येतो. त्याचा परिणाम म्हणून येथील प्रकल्पग्रस्तांचे अगोदर योग्य पुनर्वसन झाले. नंतरच धरणाचे काम पूर्ण झाले.

## ५. आजरा परिसरातील इतर सामाजिक चळवळी

'एका लोकलढ्याची यशोगाथा' पुस्तकात ज्या पद्धतीने धरणग्रस्तांची चळवळ आलेली आहे, त्याबरोबरच संपत देसाई व इतर कार्यकर्त्यांनी आजरा परिसरात चालवलेल्या इतरही चळवळींचा आढावा आलेला आहे. त्यामधील पहिली महत्त्वाची चळवळ म्हणजे आरोग्य चळवळ होय. आजरा परिसरात अनेक छोटी गावे, वाड्या व वस्त्या या डोंगराळ भागात होत्या. अशा अनेक छोट्या छोट्या गावांमधून आरोग्य सुविधा नव्हती. आजरा, उत्तुर, भादवण, मलीग्रे ही गावे सोडली तर इतर सगळीकडे उपचाराची कोणतीच सोय नव्हती. अशावेळी डॉ. अनंत फडके, डॉ. अभय शुक्ला यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य प्रबोधन, आरोग्य हक्कासाठी संघर्ष आणि आरोग्य सेवेचा एक लोकाभिमुख पर्याय अशा तीन स्तरांवर आरोग्य चळवळ उभी करायचे ठरले. त्यासाठी आरोग्य साथी असा उपक्रम जन आरोग्य समितीच्या वतीने राबवायचा ठरला. परिसरातील सोळा गावांमधील स्त्रियांना तीन-चार दिवसांचे चार वेळेला प्रशिक्षण देण्यात आले. त्यांनी सेवाभावी वृत्तीने आपल्या गावात वाडी वस्तीवर प्राथमिक आरोग्य सुविधा पुरवावी, यासाठी त्यांना प्रशिक्षित करण्यात आले. त्यासोबतच आरोग्य साक्षरता वाढविण्यात आली. आरोग्य हा आमचा हक्क आहे, अशी भूमिका घेऊन आरोग्य परिषद घेण्यात आली. त्यासाठी हजारो स्त्री-पुरुष जमा झाले. या परिषदेनंतर गुजरात मधील लो कॉस्ट या औषध कंपनीने अत्यंत कमी दरात औषधांचा पुरवठा करण्याचे मान्य केले. त्यामुळे देशातील पहिले स्वस्त औषध दुकान आजरा येथे सुरू झाले.

## डंगे गवळी धनगरांची चळवळ

चित्री नदीच्या खोऱ्यात घनदाट जंगलात धनगरांच्या तीन वस्त्या होत्या. त्यातील दोन वस्त्यांवर आठ दहा घरे होती, तर चित्री नदीच्या उगमाकडे सर्वात उंचावर असलेल्या वस्तीवर ३०-४० कुटुंबे होती. त्यांना वीज, पाणी, रस्ता अशा सुविधा नव्हत्या. तेथे प्राथमिक शाळा होती, पण शिक्षक नव्हते. त्यांना जंगलातून हाकलून देण्याचे प्रयत्न सुरू होते. म्हणूनच मूलभूत सुविधा दिल्या नव्हत्या. अशा धनगरांना पर्यायी जमिनी मिळाव्यात, यासाठी डॉ. भारत पाटणकर यांच्या नेतृत्वाखाली आजरा तहसील कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. जंगल विभागात असलेल्या सगळ्या धनगरवाड्यांना भेट देऊन त्यांना संघटित करण्याचे प्रयत्न संपत देसाई व त्यांच्या कार्यकर्त्यांनी केले. जरी हे धनगर जंगलात राहात असले व जंगलातील वनौषधी, मध, मिरी-दालचिनी सारखे मसाल्याचे पदार्थ

यावर स्वतःची उपजीविका करत असले, तरी त्यांनी जंगल सुरक्षित राखले होते. वन्यजीव, पशुपक्षी व वृक्षसंपदा यांच्याशी त्यांचे जैविक नाते होते. ते तेथील जमिनीवर पोटापुरती शेती करत होते. याउलट बॉक्साईट खाणी व धरण बांधणे यासारख्या प्रकल्पामुळे जंगलाचा ऱ्हास होत होता. या धनगरांचा उत्पादन साधनांवर असणारा हक्क प्रस्थापित करण्यासाठी चळवळ सुरू केली गेली. चितळे, पेरणोली, किटवडे, मोरेवाडी, अवंडी या गावांच्या परिसरात असणाऱ्या धनगरवाड्यांमधील स्त्रीपुरुषांचा पहिलाच मोर्चा तहसीलदार कचेरीवर निघाला. नंतर शासकीय अधिकाऱ्यांबरोबर बैठका झाल्या. त्यातूनच पुढे वनाधिकार कायदा तयार झाला. धनगरांच्या वाड्यांपर्यंत वीज, रस्ते, पाणी पोहोचले. त्यांच्या वनजमिनींच्या हक्कांचे दावे तयार होऊन त्यांना पर्यायी जमिनी मिळण्याची प्रक्रिया सुरू झाली. अशाप्रकारे ही चळवळ यशस्वी झाली.

### ६. पुनर्वसनानंतर नव्या गावात उभे राहिलेले प्रश्न

महाराष्ट्र राज्य धरण व प्रकल्पग्रस्त शेतकरी परिषद यांच्या नेतृत्वाखाली आजरा तालुक्यातील धरणग्रस्तांची चळवळ उभी राहिली असली तरी त्यामध्ये मुख्य भूमिका श्रमिक मुक्ती दलाची होती त्यांनी अत्यंत अभ्यासपूर्वक ही चळवळ लढवली त्यामुळे चित्री प्रकल्पातील धरणग्रस्तांना घरे बांधण्यासाठी पर्यायी जागा योग्य तो मोबदला व शेतजमीन देण्यात आली म्हणजेच त्यांचे पुनर्वसन करण्यात आले जुन्या तीन गावांच्या तीन नवीन वसाहती झाल्या रायवाडा गावातील धरणग्रस्तांना खानापूरच्या गायरान जमिनीत तर गावठाणवाडीच्या धरणग्रस्तांना बुरुड्याच्या माळावर जमीन मिळाली  पुनर्वसनात राहणारे लोक गावासाठी उपरे म्हणजे परके असतात गावाच्या मालकीची किंवा इतर कोणा वैयक्तिक मालकीची जमीन त्यांना मिळालेली असते त्यामुळे नव्याने तेथे आलेल्या या लोकांना मूळचे गावकरी सहकार्य करत नाहीत भांडण तंटा करतात त्यामध्ये राजकारण देखील असते गावातले विविध गट पुनर्वसनातील लोकांना स्वतःच्या बाजूने खेचण्याचा प्रयत्न करतात तर काही लोक गावात शेतमजूर मिळाले असा विचार करतात संघटनेच्या दबावामुळे पुनर्वसन कायदा धनर धरणग्रस्तांच्या बाजूने करण्यात आला नवीन पुनर्वसनात मिळालेली जमीन कसण्यास विरोध करणारे मूळ मालक व इतरांना दोन महिने कारावास किंवा दररोज एक हजार रुपये दंड अशी तरतूद करण्यात आली असे असले तरी काही ठिकाणी मूळच्या मालकांचा त्रास होताच कारण त्यांची जमीन शासनाने काढून घेऊन दुसऱ्याला दिलेली होती चित्रा नगरचे जानबा मिसाळ शंकर लाड आणि रायवाड्याचा चंद्र भागवत यांना नवीन ठिकाणी जोरदार संघर्ष स्वीकारावा लागला जानबा मिसाळला बोलकेवाडीच्या रानात जमीन मिळाली होती शंकर लाडला मेंढोलीत तर चंद्र भागवतला देऊळवाडीत जमीन मिळाली होती अशाप्रसंगी पोलिसांची व कायद्याची मदत घेऊन तर कधी संघटनेची मदत घेऊन भांडण मिटवावे लागत होते एकदा चित्रा नगर वसाहतीतील तुकाराम लाड यांचे वडील वारले परंतु बोरुडे गावातील लोकांनी त्यांना स्मशानात अंत्यविधी करू देण्यास नकार दिला तिथेही हे प्रकरण तहसीलदारापर्यंत गेले आणि संघर्ष करून स्मशानात अंत्यसंस्कार करावी लागले नव्या ठिकाणी शाळा बांधणे देऊळ बांधणे अशा गोष्टी करत असताना देखील विरोध होत होता आणि संघर्षातून काही मार्ग काढावा लागत होता पुनर्वसन होत असताना घरे बांधणीसाठी मिळालेली चांगली जमीन रस्ते गटार पाणी वीज अशा

सुविधा पाहून गावातील लोकांना वाईट वाटत होते व ते पुनर्वसनातील लोकांची अडवणूक करण्याचा प्रयत्न करत होते अशाप्रकारे नव्या ठिकाणी देखील धरणग्रस्तांना विविध प्रकारच्या छोट्या मोठ्या संघर्षांना तोंड द्यावे लागत होते

**'एका लोकलढ्याची यशोगाथा' मधील सामाजिक प्रश्न**

'एका लोकलढ्याची यशोगाथा' या पुस्तकामध्ये अनेक प्रकारचे सामाजिक प्रश्न आलेले आहेत. मुळात आजरा परिसरातील डोंगरांमध्ये वसलेली छोटी गावे, वाड्या, वस्त्या यांना नवीन धरण प्रकल्पामुळे बाधा पोहोचत होती. त्यामुळे त्यांचे पुनर्वसन आवश्यक होते. हे पुनर्वसन योग्य पद्धतीने, योग्य मोबदला देऊन केले जावे यासाठी धरणग्रस्तांची चळवळ उभी राहिली. व त्याला यश मिळाले. पुढे २००६ साली 'आधी पुनर्वसन, मग प्रकल्प', असा कायदाच झाला. त्याची मुळे येथील संघर्षात आहेत.

हा संघर्ष जल जंगल जमीन यांच्या अधिकाराचा होता. पिढ्यानपिढ्या जंगलाच्या आश्रयाने राहणाऱ्या लोकांचा जंगलातील साधन संपत्तीवर परंपरागत हक्क असतो. त्यामुळे तो हक्क काढून घेत असताना त्यांना योग्य तो मोबदला मिळणे आवश्यक असते. तसेच धरण बांधल्यानंतर ज्यांना लाभ होतो ते धरणापासून खाली वाहणाऱ्या नदीकाठी राहणारे लोक असतात. तर प्रत्यक्ष ज्या जागेवर धरण बांधले जाते व जेथे धरणाचे पाणी मोठ्या प्रमाणात साठवले जाते, तेथील गावे उठवली जातात. त्यामुळे या लोकांना स्वतःच्या हक्काच्या जमिनीतून उठवून दुसरीकडे दुसऱ्या गावाच्या माळरानांवर जमिनी दिल्या जातात. तेथे सामाजिक धार्मिक परंपरांच्या संदर्भात बदल घडतो. तो सगळा या पुस्तकामध्ये चित्रित झाला आहे.

शासन प्रशासन या बलाढ्य यंत्रणा असतात. त्यांच्याशी संघर्ष करणे सोपे नसते. गरीब सामान्य माणसे ते करू शकत नाहीत. त्यांना कायद्याचे ज्ञान नसते. शासनाचे हक्क अधिकार माहिती नसतात. अशावेळी जाणत्या सामाजिक कार्यकर्त्यांनी अन्यायग्रस्त लोकांच्या बाजूने सहभाग घेतला नाही, तर धरणग्रस्तांवर मोठा अन्याय होण्याची शक्यता असते. राहण्यासाठी पर्यायी जमीन मिळणे, रस्ते, पाणी, वीज या नागरी सुविधा मिळणे, समाजमंदिर, शाळा अशा गरजा पूर्ण होणे, उपजीविकेसाठी शेतजमीन मिळणे, असे अनेक धरणग्रस्तांचे प्रश्न असतात. ते संघटित प्रयत्नाने चळवळ केल्याने पूर्ण होऊ शकतात.

या पुस्तकाबद्दल प्रा. एकनाथ पाटील लिहितात, "कोल्हापूर जिल्ह्याच्या एका दुर्गम टोकाला असलेल्या आजरा तालुक्याच्या अतिदुर्गम भागात होऊ घातलेल्या चित्री धरणाची पार्श्वभूमी या पुस्तकाला आहे. 'आधी पुनर्वसन मगच धरण' हे सूत्र नजरेसमोर ठेवून तिथल्या विस्थापित होणाऱ्या फाटक्यातुटक्या माणसांनी एकत्र येऊन व्यवस्थेच्या विरोधात निकराने दिलेला लढा हा या पुस्तकाचा मुख्य गाभा आहे."

या परिसरात वाड्या वस्त्यांवर वैद्यकीय सुविधा नसल्यामुळे आरोग्याचे प्रश्न गंभीर होते. त्यामुळे आरोग्य जनजागृती, प्रशिक्षण शिबिर, स्वस्त औषधे देणारे दुकान उभे करणे, या माध्यमातून आरोग्याबाबत चळवळ चालवण्यात आली. वेगवेगळ्या गावातील स्त्रियांना प्रशिक्षण देऊन आरोग्य साथी बनविण्यात आले. अंधश्रद्धा बाजूला सारून उपचार घेण्यास प्रवृत्त केले गेले. या परिसरात बोगस डॉक्टरांचा सुळसुळाट होता. तो कमी करण्यात आला.

डंगे धनगरांची चळवळ उभी केली गेली. त्यामुळे या रानावनात भटकणाऱ्या अज्ञानी लोकांना संघटित होणे, संघर्ष करणे, हक्क अधिकारांसाठी भांडणे, या गोष्टी कळाल्या. रानावनात फक्त लंगोट लाऊन फिरणारे लोक हळूहळू जागे झाले. नागर समाज व शासन प्रशासन यांच्या कडून त्यांची योग्य ती दखल घेतली जाऊ लागली.

श्रमुदच्या पुढाकाराने समन्यायी पाणी वाटपाची चळवळ सुरू केली. त्या माध्यमातून पाण्यावर त्या परिसरातील नागरिकांचा हक्क आहे याची जाणीव लोकांना झाली. शासनाचे धोरण पैसेवाल्यांना पाणी असे होते. त्या ऐवजी धरणाच्या लाभक्षेत्रातील गरीब शेतकरी आणि विस्थापित केलेले प्रकल्पग्रस्त यांनाही पाणी मिळाले पाहिजे, यासाठी ही चळवळ महत्त्वाची ठरली. या चळवळीमुळे परिसरातील नदीच्या पाण्यावर सर्व नागरिकांचा समान हक्क असतो, हा मुद्दा अधोरेखित झाला.

आजरा परिसरात जातिभेद मोठ्या प्रमाणात होता. लाटगाव येथे दलित वस्ती मोठ्या प्रमाणात होती. परंतु तेथील सगळे दलित हे गावातील उच्च जातीय देसाई इनामदार यांना घाबरून होते. या वस्तीत लोकांना डॉ. आंबेडकरांचा पुतळा बसवायचा होता. परंतु गावातील इतर लोक काय म्हणतील अशी भीती वाटत होती. अशावेळी लेखक संपत देसाई, दत्ता गुरव यांनी पुढाकार घेऊन त्या वस्तीत बैठक घेतली आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती दिवशी डॉ. भारत पाटणकर यांच्या हस्ते पुतळा अनावरण व समाजमंदिराचे उद्घाटन असा संयुक्त कार्यक्रम ठरविला. या कार्यक्रमात इतर जातीतील धरणग्रस्त व दलितेतर समाजही मोठ्या संख्येने उपस्थित राहिला. त्यामुळे समाजामध्ये चांगले वातावरण निर्माण झाले. पुढे आजरा येथे एक जातिअंताची परिषद घेण्यात आली. त्यानंतर आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाह करणाऱ्या जोडप्यांचा जाहीर सत्कार करण्याचा कार्यक्रम ठरविला. अशा प्रकारे जातिभेदाच्या विघातक रूढी पासून स्वाभिमानाच्या चळवळीपर्यंत प्रवास झालेला दिसून येतो.

**'एका लोकलढ्याची यशोगाथा' मधील लोकचळवळ**

प्रस्तुत पुस्तकामध्ये अनेक प्रकारच्या लोक चळवळी आल्या आहेत. प्रकल्पग्रस्त लोकांनी प्रारंभी उभी केलेली धरण विरोधी चळवळ आणि नंतर योग्य पुनर्वसन व्हावे यासाठी दिलेला लढा हा या पुस्तकाचा मुख्य गाभा आहे. आजरा परिसरातील उचंगी, चिकोत्रा, चित्री, आंबेओहळ अशा सर्व धरणांमुळे बाधित झालेले जनता एकत्र

आली आणि त्यांनी शासन प्रशासन यांच्या विरोधात संघर्ष केला. तत्पूर्वी असे लढे कधीच उभे राहिलेले नव्हते आणि न्यायही मिळालेला नव्हता. परंतु निस्वार्थी हुशार अभ्यासू कार्यकर्त्यांनी चळवळीचे नेतृत्व केल्यामुळे लोकांच्या चळवळीला यश मिळाले.

डंगे धनगरांची चळवळ ही देखील अशीच लोक चळवळ आहे. अशिक्षित, अज्ञानी, गरीब व रानावनात लंगोटी लावून फिरणारे धनगर अनेक छोट्या छोट्या वस्त्यांमध्ये विभागलेले होते. त्या सगळ्या धनगरवाड्यातील लोक एकत्र आले आणि त्यांनी जल जंगल जमीन वरील आपला हक्क सांगितला. त्यातूनच त्यांना पर्यायी जमिनी मिळाल्या. त्यांचे प्रश्न सुटले. चित्री नदीच्या उगमाकडे असणाऱ्या ३०-३५ घरांच्या धनगर वाड्याकडे जाण्याला रस्ताच नव्हता. तो रस्ता चळवळीच्या माध्यमातून मंजूर झाला. बांधला गेला.

याशिवाय आरोग्य चळवळ, जातीअंताची चळवळ, समन्यायी पाणी वाटपाची चळवळ यादेखील लोक चळवळीच होत्या. आजरा युवा मंचच्या वतीने सामाजिक समता परिषद, साहित्य संमेलन असे उपक्रम राबविले गेले. पुढे पेरणोली गावात सार्वजनिक घटोत्सव साजरा करण्यात आला. प्रारंभी एकलव्य ग्रुपने सुरू केलेला हा उत्सव संपूर्ण गावाचा उत्सव झाला. तसेच याच गावात वारकरी परिषद घेण्यात आली होती. या सगळ्या उपक्रमांमध्ये मोठ्या प्रमाणात शेतकरी, कष्टकरी व दलित सहभागी होत होते. या उपक्रमांना लोक चळवळीचे स्वरूप मिळालेले दिसून येते. प्रारंभी लाजरी बुजरी असणारी अशिक्षित, अल्पशिक्षित माणसे पुढे जाऊन हिमतीने बोलू लागली. भांडू लागली. पोलीस, प्रांत, तहसीलदार, कलेक्टर यांना देखील घाबरेनाशी झाली. सभेत बोलू लागली. प्रसंगी तुरुंगवास भोगावा लागला तरी मागे हटली नाहीत. त्यामुळेच त्यांना न्याय मिळाला.

## २.५ समारोप (Summary) :

थोडक्यात प्रस्तुत पुस्तक म्हणजे धरणग्रस्तांच्या चळवळीचा दस्तऐवज आहे. आजरा हे तळ कोकण आणि घाटमाथा याच्या दरम्यान असणारे गाव. समृद्ध निसर्ग, भरपूर पाऊस आणि कष्टकरी चिवट माणसे हे या भागाचे वैशिष्ट्य! तरीही बदलत्या काळात या परिसरात पाणीटंचाईचा प्रश्न पुढे येतो. त्या पाठोपाठ धरणाची मागणी होते. मग छोटे छोटे मध्यम सिंचनाचे प्रकल्प मंजूर होतात. त्यामुळे धरणाखाली किंवा धरणाने अडवलेल्या जलसाठ्याखाली जाणाऱ्या गावांच्या पुनर्वसनाचा प्रश्न पुढे येतो. छोट्या छोट्या वाड्या वस्त्यांवर राहणारी भोळीभाबडी अल्पशिक्षित माणसे या अचानक उद्भवलेल्या संकटाने गोंधळून जातात. एकत्र येतात. लढू पाहतात. त्यांच्या लढाईला ध्येयवादी अभ्यासू सामाजिक कार्यकर्त्यांची साथ मिळते. कॉ. संपत देसाई, डॉ. भारत पाटणकर, कॉम्रेड धनाजी गुरव असे लोकचळवळी चालवणारे निस्वार्थी नेतृत्व लाभते. त्यातूनच चित्री धरणग्रस्तांची चिवट संघर्ष गाथा उभी राहते. ही चळवळ कुठेही हिंसक होत नाही. समाज विघातक होत नाही. संविधानाच्या चौकटीत हा संघर्ष चालतो. काही वेळेला शासनाचे आदेश धुडकवले जातात. शासकीय कामात अडथळे आणले जातात. जमावबंदीचा हुकूम मोडून

मोर्चे, धरणे, आंदोलन अशा गोष्टी करतात. परंतु त्याचा मुख्य उद्देश पीडित जनतेला न्याय मिळवून देणे, हाच असतो. ही फाटकी माणसे निधड्या छातीने लढतात. कारण त्यांच्याजवळ नैतिकतेचे आत्मबळ आहे. तत्त्वनिष्ठा व ध्येयनिष्ठा आहे. वैयक्तिक स्वार्थाच्या पलीकडे जाऊन सामूहिक हिताचे निर्णय घेण्याची पद्धत आहे. आधुनिक काळात लोकहितांसाठी शासन प्रशासनाशी कसा संघर्ष करावा व गोरगरिबांना कसा न्याय मिळवून द्यावा, याचा आदर्श वस्तुपाठ या पुस्तकांमधून मिळतो. जनता गरीब व अज्ञानी आहे, म्हणून त्यांच्यावर अन्याय करणे लोकशाही देशात मान्य करता येण्यासारखे नाही. उलट सर्वांना सन्मानाचे जगणे बहाल करता आले पाहिजे. त्यामुळेच चित्री नदीच्या समृद्ध वारशापासून सुरू झालेला हा प्रवास शेवटी पुनर्वसनात नव्याने उभारलेल्या विठ्ठल मंदिराच्या यथासांग उद्घाटनापर्यंत पोहोचतो. हे इथल्या मातीतील संघर्षाचे आणि सुसंस्काराचे प्रतीक आहे.

या पुस्तकाबद्दल प्रा. एकनाथ पाटील असे लिहितात की, "सर्वार्थाने फाटकी माणसं नैतिकता आणि आत्मविश्वासाच्या बळावर शासनासारख्या सर्वशक्तिमान अशा बलाढ्य व्यवस्थेला कशी नामोहरम करु शकतात, आपल्या न्याय्य मागण्यांसाठी संविधानाच्या चाकोरीत राहून सूत्रबद्ध आणि रचनात्मक संघर्ष कसा उभारु शकतात याचे संयत दर्शन या पुस्तकातून घडते. आपली बाजू न्याय्य असेल आणि समोरची व्यवस्था कितीही मुजोर असेल, तर अशावेळी परस्परविश्वासाने आणि लोकशाही मार्गाने लढा कसा उभारावा आणि विश्वासाच्या बळावर तो कसा यशस्वी करावा, याचे शास्त्र संपत देसाई यांनी या पुस्तकातून उलगडून सांगितले आहे."

## २.६ वाचनीय उतारा (Terms to Remember)

मातीनं लिंपलेल्या कारवीच्या कुडाच्या भिंती, वर गवती छप्पर असलेला लांबलचक मांगोर म्हणजेच डंगे गवळी धनगरांचं घर. मांगोराच्या सभोवताली लाकडी कुंपण. त्यात गाई-म्हशी मोकळेपणानं हिंडणाऱ्या. झडीच्या पावसात कायम ढणढणणारी, माणसासह गुरा-ढोरांनाही उब देणारी, तिथंच एका कोपऱ्यात लावलेली चूल. कोणताही डामडौल नाही की उधळपट्टी नाही. घर म्हणजे उन, पाऊस, वारा आणि थंडीपासून संरक्षण इतकाच काय तो घराचा अर्थ. गुरं, ढोरं, पोरं आणि माणसं सगळीच एकत्र. निसर्गाचा इतका माफक आणि गरजेपुरता वापर थक्कच करणारा. निसर्गाच्या सोबतीनं राहताना घरांची रचनासुद्धा निसर्गाला कमीत कमी इजा होईल अशा रीतीनंच केलेली. त्यांची ही घरं म्हणजे नैसर्गिक एअरकूलरच. झडीच्या पावसात आणि हिवाळ्यात उब देणारी तर तापणाऱ्या उन्हातही गारवा देणारी.

डंगे गवळी धनगरही अगदी इथल्या निसर्गासारखाच उदार, एकदा एखाद्याला आपलं मानलं की मुक्त हस्ते त्याच्यावर प्रेमाची उधळण करणारा. अनोळखी माणूस आला तरी खोपटातला दह्या-दुधानं भरलेला मोगा रिकामा करायला मागंपुढं न बघणारा. गुराढोरांमागनं रानभर हिंडून रापलेल्या चेहऱ्याची ही माणसं मनानं मात्र फारच निर्मळ. (पृ० १७)

उचंगीच्या पर्यायाच्या लढ्याने टोक गाठलेले. सततच्या सभा, मेळावे, मोर्चे, आंदोलनांनी उचंगीचा लढा केवळ जिल्ह्यातच नव्हे तर संपूर्ण राज्यभर गेलेला राज्यशासनाच्या धोरणालाच आव्हान देत तिथली कष्टकरी जनता श्रमिक मुक्ती दलाच्या नेतृत्वाखाली लढू लागलेली. लाभक्षेत्रातील लोकांनीही धरणाचं काम लवकर सुरु व्हावं म्हणून प्रतिआंदोलन सुरू केलेलं.

आम्ही आता उचंगीच्या लाभक्षेत्रात सभा बैठका घ्यायच्या ठरविल्या. आमचा चरणाला विरोध नाही; पण धरण बांधण्याच्या पद्धतीला विरोध आहे हे सांगायचे ठरविलं माणसं न बुडविता धरण बांधता येतं, पाणी तुंबविता येतं. हे लोकांच्यापर्यंत पोहोचवायचं होतं. सरकारचं पाणी धोरण कोणाच्या बाजूचं, आणि ह्या धरणातून कोणाला लाभ मिळणार हाय, हे गरीब शेतकऱ्यांना सांगायचं होतं. वाटंगी या लाभक्षेत्रातल्या मोठ्या गावी सभा लावली. (पृ० ६८)

सभेची सुरुवात मी केली. आमची उचंगी धरणाबद्दलची भूमिका तुमच्यासमोर मांडायला आलोय हे सांगितलं. ह्या बिनपाटाच्या धरणाऐवजी पाटाचं धरण झालं पाहिजे, शेतीवर जगणाऱ्या सर्व कुटुंबांना समन्यायी पद्धतीने पाणी मिळालं पाहिजे, पाण्याचा धंदा करून चौथाईच्या मार्गाने नवी पाणीदारी निर्माण करण्याला आमचा विरोध आहे आणि या विरोधात आमचा लढा चालू आहे, असं सांगितलं. सुरुवातीला जरा कुरबुर होती पण थोड्या वेळानं लोक ऐकू लागले. (पृ० ६९)

मुळात डंगे धनगर म्हणजे डंगात राहणारा धनगर, डंग म्हणजे घनदाट आणि किर जंगल, सह्याद्रीच्या डोंगरकपारीत यांच्या हजारो वस्त्या घनदाट जंगल, विस्तीर्ण पसरलेले सडे, मुबलक बारा, बारमाही वाहणाऱ्या जिवंत ओहळी, यामुळे गुरं पाळण्याच पारंपरिक व्यवसाय पिढ्यानपिढ्या जपलेला. प्रत्येक कुटुंबामागे खंडो-दोन खंडी जनवर अवंडी, मोरेवाडी, चितळे, किटवडे, पेरणोली या गावांशेजारी चनगरांच्या आठ दहा वस्त्या. गाई-म्हैशी आणि दह्या-दुधानं समृद्ध असणारे धनगरवाडे आता ओस पडत चाललेले. कुठेतरी एखादंदुसरं जनावर तग धरून राहिलेलं.

अवंडीच्या शेजारी बॉक्साईटचं उत्खनन सुरू झालेलं. शेकडो एकर जंगल तुटल गेलं. जैवविविधतेने संपन्न असलेले सडे ओसाड बनले. त्यातच भरीस भर म्हणून जंगल खात्याने अँकेशिया आणि नीलगिरी या झाडांची हजारो एकर जंगलजमिनीवर लागवड केली. वड, पिंपळ, पायर, आवळा, ऐन, किजळ, हेळा, पांगिरा, पळस यांसारखी पारंपरिक झाडं संपत चालली. अँकेशिया, निलगिरी या परदेशी झाडांच्या लागवडीने इथली जीवसाखळी उद्ध्वस्त झाली. या झाडांखाली गवत उगवत नाही की पाखरं घरटं बांधत नाहीत. चारा संपला, पाण्याचे स्रोत नाहीसे झाले, जंगले हिरवी दिसत असली तरी त्यांचा जिवंतपणा संपून गेला. डंगे धनगरांचा दूध-दुभत्याचा पारंपरिक धंदा संपला. विपुल सापडणाऱ्या इथल्या वनौषधी नामशेष होऊ लागल्या. सपुष्प वनस्पती संपल्याने मध गोळा करण्याचा व्यवसायही अडचणीत आला. जांभ्या खडकावरची वरी, नाचणी पिकणारी जमीन तेवढीच काय ती हातात राहिलेली.

जगायचं कसं असा प्रश्न साऱ्याच धनगर वस्त्यांनापडला. इथली काही कुटुंब कर्नाटकच्या दिशेने घनदाट जंगलात जगण्यासाठी निघून गेली. गेल्या कित्येक पिढ्या ते या परिसरात राहिलेले. पिढ्यान्पिढ्या जंगलात राहून राहते झोपडेही साधे त्यांच्या नावावर नव्हते. जंगलाचा कायदा होण्यापूर्वीपासूनचं त्यांचं जंगलाशी नातं. हजारो वर्षे जंगलाशी दोस्ती करून त्यांनी जंगले जीवापाड जपलेली. मात्र त्यांनाच अतिक्रमित ठरवून जंगलातून हाकलण्याचा प्रयत्न चालला होता. वीज, पाणी, रस्ता यांसारख्या सुविधांपासून त्यांना वंचित ठेवण्यात आलं.

अवंडीसारखीच तालुक्यातील इतर धनगरवाड्यांची अवस्था मालकीचं घर नाही की स्वतःची जमीन नाही. कुठल्याच वाड्यावर वीज, पाणी, रस्ता या सारख्या साध्या सुविधाही नाहीत. आम्ही आता सगळ्यांनाच संघटित करण्याचे ठरवले. त्याचीही जोरदार चर्चा श्रमिक मुक्ती दलाच्या सुसूत्रता समितीत झाली. डंगे धनगरांची चळवळ म्हणजे सुविधा मागणारी चळवळ, सुधारणावादी चळवळ. त्यात काय क्रांतिकारक राजकारण? असा सवाल काही विचारवंतांनी उपस्थित केला. (पृ० ९६)

२२ एप्रिलला गुढीपाडवा लोकांनी आपल्या गावात शेवटचा साजरा केला. दुसऱ्या दिवशी आवराआवर केली आणि २४ एप्रिलला रायवाड्यातील एक एक घर निखन्द लागलं. तसं बरंचसं सामान लोकांनी पूर्वीच हलवलेलं. घरावरच्या खापऱ्या आणि काय असेल ते लाकूडसामान एवढंच शिल्लक राहिलेलं. कायद्याप्रमाणे एका कुटुंबाला पसारा हलवाय तीन वाहनांची सोय पाटबंधारे खात्याने तीही केलेली. लोकांनी जुन्या घराचं सामान, जनावरांची वैरण, जळण जे काही किङ्कमिडूक होतं ते सगळ भरून रायवाडा सोडला.

सामान भरतानाच गळ्याशी आलेला हुंदका बायांनी कसातरी आवरून धरलेला. सामान भरलं, गाड्या हलल्या अन् बायांचा बांध फुटला. एकमेकीच्या गळयात गळा घालून त्या ओक्साबोक्शी रडू लागल्या. आपल्या आयाबहिणी का रडतात ते लहान पोरांना कळेना. ती गोंधळलेली. नव्या गावाची नव्या घराची ओढ त्यांना लागलेली. इतकी वर्षे या परिसरातल्या निसर्गाशी, इथल्या मातीशी, नदीनाल्यांशी, चाळोबाच्या बारीशी जपलेलं नातं आता कायमचं संपणार होतं. मुळापासून उन्मळून पडलेल्या झाडासारखी अवस्था आज रायवाड्याची झालेली. पुरुष गडी स्वतःला सावरत डोळ्यांत पाणी न आणता आतल्या आत रडू लागलेले.

छप्पर काढलेल्या भिती बोडक्या दिसत होत्या. त्याही आता मातीखाली गाडल्या जाणार होत्या. गाड्या हलल्या. जुना गाव सोडून नव्या गावाच्या दिशेने माणसं निघाली. गाव नजरेआड होईपर्यंत पुन्हा पुन्हा मागे वळून पाहत होती. जुना गाव, परिसर, निसर्ग डोळ्यांत जेवढा साठवून घेता येईल तेवढा साठवत होती. नव्या गावात येईपर्यंत बायांचे डोळे अखंड वाहत होते. नवं गाव आलं, बायांनी स्वतःला सावरलं. भराभरा गाड्यांच्यामधलं साहित्य उतरून घेतलं. जुना रायवाडा कायमचा मातीआड गेला. लोकांनी नवा रायवाडा खानापूरच्या गायरानात नव्या हिंमतीनं उभा केला. (पृ० १३०)

२.७ शब्दार्थ व स्पष्टीकरण :

रोंबाट = आजरा परिसरातील गावांमध्ये शिमग्याच्या सणात गावातील मुख्य चौकात वर्षभर घडलेल्या बऱ्या वाईट घटनांची जाहीर चर्चा केली जाते. त्याला रोंबाट म्हणतात.

कुणबी = कोरडवाहू शेती करणारे लोक

डंगे धनगर = घनदाट जंगलात राहणारे धनगर

घळभरणी = नदीचे पाणी अडवून साठविण्यासाठी घातलेले घातलेले मातीचे बांध

देवराई = देवाच्या नावाने राखून ठेवलेले जंगल

२.८ स्वाध्याय :

अ) दीर्घोत्तरी प्रश्न (१५ गुण)

१. चित्री धरणामुळे विस्थापित होणाऱ्या तीन गावांची मूळची स्थिती वर्णन करा.

२. आजरा परिसरात तरुणांनी निर्माण केलेल्या सामाजिक संघटनेचा व तिच्या कार्याचा परिचय करून द्या.

३. चित्री प्रकल्पामुळे विस्थापित होणाऱ्या धरणग्रस्तांनी पुनर्वसन संदर्भात केलेल्या संघर्षाचा परिचय करून द्या.

४. आजरा तालुक्यात तरुणांनी उभ्या केलेल्या विविध नव्या चळवळींचा परिचय करून द्या.

ब) लघुत्तरी प्रश्न (१० गुण)

१. चित्री नदी खोऱ्याचा समृद्ध वारसा कसा होता, ते स्पष्ट करा.

२. आजरा गावाचे भौगोलिक, सामाजिक व राजकीय स्वरूप संपत देसाई यांनी कसे चित्रित केले आहे, ते लिहा.

३. चित्री प्रकल्पग्रस्त विस्थापितांना नव्या गावामध्ये कोणत्या समस्यांना तोंड द्यावे लागले, ते स्पष्ट करा.

४. लेखक संपत देसाई यांच्या लग्नाची गोष्ट विशद करा.

क) टीपा (१० गुण)

१. आजरेकर फड

२. धरणग्रस्तांची लढा परिषद

३. राजाभाऊ शिरगुप्पे

४. धनगरवाड्याचा रस्त्यासाठी संघर्ष

५. चव्हाटा, शिमगा आणि रोंबाट

२.९ संदर्भ ग्रंथ

१. पानसरे, मेघा; मोरे, नंदकुमार (संपा) : महाराष्ट्र : काही प्रश्न आणि आंदोलने, श्रमिक प्रतिष्ठान, कोल्हापूर, २०२४.

२. भोळे, भा.ल.; बेडकीहाळ, किशोर (संपा) : बदलता महाराष्ट्र, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अकादमी, सातारा.

३. मोकाशी, सयाजीराजे (संपा) : महाराष्ट्रातील लोकचळवळी, नागनालंदा प्रकाशन, इस्लामपूर २०१८.

घटक ३

# एका लोकलढ्याची यशोगाथा

## व्यक्तिरेखा, समाज, संस्कृती, पर्यावरण, लेखकाची नैतिकता व दृष्टीकोन

३.१ उद्दिष्टे

३.२ प्रास्ताविक

३.३ विषय विवेचन

३.४ व्यक्तिरेखा

३.४.१ कॉ. संपत देसाई

३.४.२ डॉ. भारत पाटणकर

३.४.३ कॉ.धनाजी गुरव

३.४.४ राजाभाऊ शिरगुप्पे

३.४.५ चित्री लढ्याचे शिलेदार

३.५ समाज

३.६ संस्कृती

३.७ पर्यावरण

३.८ नैतिकता आणि दृष्टीकोन

**३.१ उद्दिष्टे (Objectives) :**

'एका लोकलढ्याची यशोगाथा' हे पुस्तक अभ्यासल्यानंतर आपणास

१. या पुस्तकातील व्यक्तिरेखांचे स्वरूप लक्षात येईल.

२. या पुस्तकाची चित्रित झालेला समाजाचे स्वरूप समजेल.

३. या पुस्तकातून आलेल्या संस्कृतीचे वेगळेपण लक्षात येईल.

४. या पुस्तकात चित्रित झालेले पर्यावरण लक्षात येईल.

५. लेखकाची नैतिकता आणि दृष्टकोन समजून येईल.

**३.२ प्रास्ताविक**

‘एका लोकलढ्याची यशोगाथा’ हे संपत देसाई यांचे पुस्तक म्हणजे धरणग्रस्तांच्या चळवळीवर बेतलेले अनुभवकथन आहे. एका धरणप्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या धरणग्रस्तांच्या लढ्याचे कथन म्हणजे हे पुस्तक आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील चित्री मध्यम प्रकल्पातील विस्तापित लोकांच्या लढ्याची गोष्ट तर आहेच शिवाय

संपत देसाई यांनी चळवळीला दिलेल्या योगदानाच्या संघर्षाची कहाणी आहे. प्रत्येक कालाकृतीच्या कथाविश्वात घटना-प्रसंग, व्यक्तिरेखा यांना एक विशिष्ट पार्श्वभूमी उभी करताना लेखक लेखक स्थळ, काळ आणि परिस्थितीची उभारणी करत असतो. या पुस्तकाच्या बाबतीतही आपल्याला तेच म्हणता येते. लेखकाने आपल्या अनुभवकथनातून उभारलेल्या घटना-प्रसंगातून एक विशिष्ट असा काळाअवकाश उभा केला आहे. अनुभवकथनामधील घटना-प्रसंग हे व्यक्तिरेखांच्या माध्यमातून घडत असल्या तरी त्या विशिष्ट समाज, संस्कृती आणि पर्यावरणाच्या काळावकाशात घडत असतात. त्यामुळे आपसूकच त्या  त्या समाज संस्कृतीव्यवहारातील विविध गोष्टी लेखनात येतात. यामुळे लेखकाने केलेले अनुभव हे व्यक्तिरेखांसह जिवंत, सजीव वाटतात. विद्यार्थी मित्रहो या पार्श्वभूमीवर 'एका लोकलढ्याची यशोगाथा' या संपत देसाई यांचे पुस्तकातील व्यक्तिरेखा, समाज, संस्कृती, पर्यावरण, लेखकाची नैतिकता आणि दृष्टीकोन याचे स्वरूप आपल्या ध्यानात येईल.

### ३.३ विषय विवेचन

'एका लोकलढ्याची यशोगाथा' या संपत देसाई यांच्या अनुभवकथनातील व्यक्तिरेखांमुळे एक अनोखे वास्तव विश्व वाचकांच्यासमोर उभे राहीले आहे. या व्यक्तिरेखांच्या माध्यमातून भोवतालच्या समाजाची, पर्यावरणाची आणि लोकलढ्याची कहाणी लेखकाने या अनुभवकथनामधून सांगितली आहे. या अनुभवकथनामधून धरणग्रस्तांच्या चळवळीच्या अनुषंगाने घडणारे घटनाप्रसंग या व्यक्तीरेखांच्या माध्यमातून घडताना दिसतात. सर्व घटना प्रसंग अनुभवकथनात आलेल्या व्यक्तिरेखांशी संबंधित असतात. व्यक्तिरेखांच्या कृतीउक्तीतूनच घटना प्रसंगाचा उदय होत असतो. अनुभवकथनाला एक प्रकारची गतीमानता प्राप्त करून देण्याचे काम या व्यक्तीरेखांच्या माध्यमातून होते. या पुस्तकातील व्यक्तिरेखांबाबतचा विचार प्रस्तुत ठिकाणी करावयाचा आहे.

### ३.४ व्यक्तिरेखा

या पुस्तकामध्ये प्रामुख्याने स्वतः लेखक संपत देसाई, कॉ. भारत पाटणकर, कॉ. धनाजी, राजाभाऊ शिरगुप्पे, चळवळीतील कार्यकर्ते, परिसरातील व्यक्ती या व्यक्तिरेखांच्या माध्यमातून वाचकांसमोर येतात. त्याचा आढावा आणि व्यक्तिरेखांचे स्वरूप समाजावून घेऊ.

#### ३.४.१ लेखक कॉ. संपत देसाई

'एका लोकलढ्याची यशोगाथा' मधील केंद्रवर्ती पात्र म्हणजे या पुस्तकाचे लेखक संपत देसाई आहे. या पुस्तकाचा सूत्रधार म्हणून लेखकाकडे पाहिले पाहिजे. कारण धरणग्रस्तांच्या लोकलढ्याची कहाणी लेखक सांगतो आहे. मुळात हे पुस्तक अनुभवकथन असल्यामुळे पात्रांची रेलचेल दिसून येत नाही. पण जी काही चळवळीच्या निमित्ताने पात्रे येतात, त्यामुळे पुस्तकाला आकार प्राप्त झालेला दिसतो. या पुस्तकातील केंद्रवर्ती व्यक्ती म्हणजे लेखक स्वतः संपत देसाई हे आहेत. जरी लेखक केंद्रवर्ती पात्र असले तरी लेखक या अनुभवकथनात स्वतःविषयी फारसे भाष्य करत नाहीत. स्वतःच्या आयुष्यातील मोजक्या घटना प्रसंगाचा उल्लेख लेखक करतो. पण संपूर्ण पुस्तकात लेखक सर्व ठिकाणी व्यापून राहिलेला आहे.

या अनुभवकथनातून येणाऱ्या लोकलढ्याचे बिनीचे शिलेदार लेखक संपत देसाई आहेत. आजरा परिसरातील गरीब अशिक्षित लोकांना त्यांनी चळवळीसाठी उभे केले. त्यांच्या न्याय हक्कांसाठी देसाईंनी

आपल्या आयुष्यातील उमेदीची सारी वर्षे खर्ची घातली. स्वतः पेरणोलीसारख्या गरीब शेतकरी कुटुंबात लहानाचे मोठे झाल्याने त्यांना गरीब विस्थापित होत आहेत, जीवनातून उठताहेत म्हणून त्यांच्या मदतीसाठी ते धावून जातात. प्रारंभी चळवळीचा गंधही नसलेले देसाई एका उदात्त हेतूने चळवळीकडे ओढले जातात. डॉ. भारत पाटणकर, कॉ. धनाजी गुरव, प्रा. सुनील गुरव यांच्या संपर्कातून आणि मार्गदर्शनातून त्यांचे व्यक्तिमत्त्व अधिक उन्नत होत गेले. ते अनेकांच्या जीवनाची धुळधान थोपवू शकले, सर्वसामान्य गरीबांच्या जीवनाला अर्थ देऊ शकले. संघर्षाची, चळवळीची महत्ता काय असते याचा वस्तुपाठ देऊ शकले. चित्री मध्यम प्रकल्पातील धरणग्रस्तांच्या आंदोलनाचे कॉ. संपत देसाई हे मुख्य संघटक. लोकांना संघटीत करून त्यांना लढ्यासाठी तयार करण्याचे काम त्यांनी केले. लढा उभारण्यात कशाचीही पर्वा न करता पुढाकार घेतला. दूर जंगलात राहून आपले जीवन कंठणाऱ्या अज्ञानी गावकऱ्यांमध्ये त्यांनी लढण्याचे बीज पेरले. धरणाची भिंत सुमारे आठ वर्षे थोपवून धरली.

संपत देसाई हे आजरा महाविद्यालयाचे विद्यार्थी प्रा. सुनील गुरव, प्रा. नवनाथ शिंदे अशा चळवळीच्या प्राध्यापकांच्यामुळे त्यांच्या विचारांची बैठक अधिक पक्की होत गेली. पुढे मराठी विषय घेऊन शिवाजी विद्यापीठात त्यांनी एम.ए पूर्ण केले. एम.ए. झाल्यानंतर गावाकडील मित्रांना सोबत घेऊन त्यांनी 'आजरा युवा मंच'ची स्थापना केली. डाव्या चळवळीशी जोडलेल्या अभ्यासकांना बोलवून व्याख्याने आयोजित करण्यापासून ते जयंत्यामयंत्याचे कार्यक्रम सुरू केले. यातूनच पुढे धरणग्रस्तांचा लढा उभा केला. पुनर्वसनाच्या लढ्याबरोबरच लेखकाने परिसरामध्ये आरोग्यजागृतीचे काम, डंगे धनगरांचे प्रश्न, समन्यायी पाणीवाटपाचे आंदोलन, सांस्कृतिक चळवळीअंतर्गत साहित्यसंमेलनांचे आयोजन, आतिअंताच्या संदर्भातील काम, धनगरवाड्यातील रस्त्यांचे प्रश्न अशा अनेक प्रश्नांवर लेखक चळवळीच्या माध्यमातून निःस्पृह वृत्तीने काम करत राहिले. पुनर्वसन झालेल्या नव्या वस्तीवर प्रकल्पग्रस्तांच्या मुलांसाठी शाळा सुरू करून त्यांना मुक्त शिक्षण देण्याचे कार्य देसाई यांनी केले. लोकलढ्याची कथा लिहिताना त्यांचे अस्सल कार्यकर्तेपण शब्दाशब्दातून प्रतिबिंबित होत राहते. त्यांच्या ठिकाणी कधी कधी संयम तर कधी आक्रमकपणाही दिसून येतो. ज्यावेळी आंदोलनाला संघर्षाचे स्वरूप प्राप्त होते त्यावेळी एका प्रसंग लेखक पोलिसांच्या समोर आक्रमकपणे बोलतो की, ''आमच्या जनावारांनाही आता चांगलंच माहिती झालंय कोणावर शिंगं रोखायची ती. आमच्या नादाला लागल तर याद राखा. आमची जनावारंच तुमची...... काढल्याशिवाय राहणार नाहीत.'' तसेच ज्यावेळी जानबा जमीन बदलून मागत होता. जानबाचे हे वागणे लेखकाला पटत नाही. त्यावेळी लेखक जानबाला खडे बोल सुनावतात. ''आज तू जमीन बदलून मागशील, उद्या तुझं बघून दुसराही उठंल, म्हातारी मेल्याचं दुःख नाही काळ सोकावंल. आपणच असा धीर सोडला तर लाभक्षेत्रातल्या लोकांना आयती संधी मिळंल. आधीच ते संधी शोधतायत. काय वाट्टेल ते झालं तरी जमीन बदलून घ्यायची नाही आणि तुला जर घ्यायची असेल तर संघटनेचा आणि तुझा इथून पुढे काहीही संबंध नाही.'' अशी भूमिका घेऊन संघटना टिकवून ठेवून ती अधिक मजबूत करण्याचे काम देसाई यांनी केले. यातून लेखकाच्या ठिकाणी असाणारं कार्यकर्तेपण वाचकांच्या समोर येतं.

एकीकडे लोकलढ्याच्या चळवळीचे काम करत असताना स्वतःकडे आणि कुटुंबाकडे लेखकाचे पूर्णपणे दुर्लक्ष होते. वयैक्तिक आयुष्याची पुरती आबाळ होते. उमेदीचा काळ आणि लग्नाचे वय चळवळीत निघून जाते. चळवळीत असल्यामुळे आणि कमावतेपण नसल्याने लग्नासाठी कोणी मुलगी देत नव्हते आणि मुलगीही तयार होत नव्हती. याची खंतही लेखकाला होती. पण पुढे डॉ. भारत पाटणकर यांच्या मातोश्री स्वातंत्र्यसेनानी इंदूताई पाटणकर आणि उषा निकम यांच्या पुढाकारातून कॉम्रेड मनीषा यांच्याशी कॉम्रेड सत्यशोधक पद्धतीने विवाहबद्ध

झाले. लोकांसाठी लढणाऱ्या कार्यकर्त्याचे लोकांनी लावून दिलेले हे तालुक्यातील पहिलेच लग्न. लेखक म्हणतात, ' या व्यवस्थेने ज्यांचं सर्वस्व काढून घेतलं त्या उध्वस्त माणसांनी संघर्षातून स्वतःचा संसार तर उभा केलाच पण आपल्या बरोबरीने लढणाऱ्या कफल्लक कार्यकर्त्याची झोळी त्याला पेलणार नाही इतक्या प्रेमाने भरून टाकली...' अशा अनेक घटना प्रसंगामधून लेखकाची व्यक्तिरेखा वाचकांसमोर प्रतिबिंबीत होते. धरणग्रस्तांसाठी उभारलेला लढा कसा जिकांयचा, त्यासाठी कसे नियोजन करावयाचे याचे कौशल्य देसाई यांच्या ठिकाणी दिसून येतात. काही प्रसंगी रात्री अपरात्री धनगवाड्यांवर जाऊन लोकांच्या सभा, मिटींग, बैठका घेणे या सर्व गोष्टी करताना लेखकाकडे असलेली एक प्रकारची शीस्त आणि संयम दिसून येतो. आपल्या परिसराविषयी, लोकांविषयी असणारा जिव्हाळा, प्रेम लेखकाच्या ठिकाणी दिसून येते. एक नेतृत्व कसे असावे, त्या नेतृत्वाकडे संयम, प्रसंगावधान, निःस्पृहता, निर्णयक्षमता कशी असावी याचे उदाहरण म्हणून लेखक संपत देसाई यांच्या व्यक्तिरेखेमध्ये दिसून येते. एक प्रेरणादायी चळवळीतील कार्यकर्त्याची लढावू वृत्ती प्रस्तुत अनुभवकथनामधून वाचकांच्यासमोर उभी राहते.

### ३.४.२ डॉ. भारत पाटणकर

डॉ. भारत पाटणकर हे श्रमिक मुक्ती दलाच्या डाव्या पक्षाचे आणि महाराष्ट्रातील शेतकरी, कष्टकरी चळवळीचे प्रमुख कार्यकर्ते म्हणून त्यांची ओळख सर्वदूर आहे. शेतकरी, धरणग्रस्तांची चळवळ, श्रमिकांचे प्रश्न, दुष्काळ निर्मुलन चळवळ, महिला मुक्ती चळवळ अशा चळवळींमध्ये काम करणारे कार्यकर्ते आहेत. ‘एका लोकलढ्याची यशोगाथा’ या संपद देसाई यांच्या अनुभवकथनामधील एक महत्त्वाची व्यक्तिरेखा. धरणग्रस्तांच्या लढाईला एक निश्चित दिशा देण्याचे काम श्रमिक मुक्ती दलाला आहे तसेच डॉ. भारत पाटणकरांनाही आहे. पाटणकरांच्या वैचारिक आणि प्रगल्भ नेतृत्वाने लढ्याला योग्य अशी दिशा मिळाली. या लढ्याला अधिक टोकदार आणि यशस्वी करण्यात पाटणकरांचा प्रदीर्घ अनुभव आणि प्रश्न सोडविण्याचे कौशल्य महत्त्वाचे ठरले. संपत देसाई यांनी पाटणकरांची महत्त्वपूर्ण अशी व्यक्तिरेखा विविध प्रसंगामधून आपल्या पुस्तकात रेखाटली आहे.

ज्यावेळी लाभक्षेत्रातले काही पुढारी चळवळीमधील कार्यकर्त्यांना 'उपरे' असे म्हणतात, त्यावेळी डॉ. भारत पाटणकरांनी स्थानिक पुढाऱ्यांना सडकून खडे बोल सुनावतात. ते म्हणतात, "जो माणूस कष्ट करतो, ज्याच्या हातावर घट्टा आहे त्याची आणि आमची जात एक आहे. त्याची आणि आमची भावकी एक आहे. त्यामुळे या देशात कष्टकरी माणसं न्याय्य हक्कासाठी जिथं जिथं लढायला उभी राहतात तिथं तिथं आम्ही जाणार. कारण ती आमची परंपरा आहे. या देशाच्या स्वातंत्र्यासाठी ज्यांनी रक्त सांडलं त्यांचे आम्ही वारसदार आहोत. त्यांचाच वसा पुढे घेऊन जात आहोत."असे म्हणत ज्या डिसोझा या पुढाऱ्यानं टीका केली होती त्यांना उद्देशून डॉक्टर पुढे म्हणतात, "अहो डिसोझा, आम्हांला उपरं म्हणताना आमचं आडनाव बघा. ते या मातीतलं हाय पण तुमचं आडनावही परदेशातून आयात केलेलं हाय. निदान याचं तरी भान ठेवा." अशा प्रकारे चळवळीची जाण आणि भान असणारा कार्यकर्ता पुस्तकामधून पहावयास मिळतो. गंभीर आणि मुद्देसूद मांडणी त्यांच्या भाषणातून दिसून येते. वेगवेगळ्या बैठकांधून पाटणकरांचे व्यक्तिमत्व वाचकांसमोर येते. चित्री आणि उचंगीसंदर्भात कोल्हापूर जिल्हाधिकरी कार्यालयात बैठक असते. प्रकल्पग्रस्तांसह सर्वजन तेथे येतात. डॉ. भारत पाटणकर, कॉम्रेड नाना शेटे, कॉम्रेड जीवनराव सावंत, कॉमेड धनाजी गुरव हे उपस्थित असतात . त्यावेळी बैठकीस आलेल्या रायवाडेकरांच्या लोकांना भाकरी खाताना पाटणकर एकाला जवळ बोलावतात, त्याला काय कळत नाही, भाकरीच्या कपड्याला हात पुसत तो डॉक्टरांजवळ जातो. त्यावेळी डॉक्टर म्हणतात, "रिकामा न्हवं भाकरी घेऊन ये. आम्हीपण उपाशीच हाय." त्यावेळी डॉक्टरांच्या बोलण्यानं तो फारच खजील होतो. स्वतःला सावरत

तो म्हणतो, "आम्हाला वाटलं तुम्ही आमच्यातली भाकरी कशी खाणार? म्हणून नाय विचारलं." त्यावेळी डॉक्टर त्याला म्हणतात,

"तुम्ही आणि आम्ही काय वेगळं हाय व्हय? आण त्यातली भाकरी इकडं..." डॉक्टरांनी असे म्हणताच तो बघतच राहतो. त्याची भाकरी तर खाऊन संपवलेली असते. गडी ओशाळतो. त्याची अडचण डॉक्टरांच्या लक्षात येते. ते म्हणतात, "राहू दे घे आम्ही जेवलोय, परतच्या वेळी खाऊ तुझी भाकरी." असे सर्वसामान्य कष्टकरी, श्रमिकांच्यामध्ये, धरणग्रस्तांच्यामध्ये रमणारे, त्यांच्यातले एक असणारे व्यक्तिमत्व देसाई यांनी यशोगाथा मधून रेखाटले आहे.

### ३.४.३ कॉ.धनाजी गुरव

या पुस्तकातील ही महत्त्वाची व्यक्तिरेखा. कॉम्रेड धनाजी हा चळवळीतला कार्यकर्ता. त्यांची आणि लेखकाची पहिली भेट साहित्य संमेलनाच्या तयारीसाठी वाळवा येथे बैठकीला गेल्यावर होते. कॉ. धनाजी श्रमिक मुक्ती दलाचा पूर्ण वेळ कार्यकर्ता. कागल तालुक्यातील जैन्याळ हे त्यांचे मूळ गाव. धनाजीचे वडील स्वातंत्र्यसैनिक, त्यामुळं सामाजिक-राजकीय चळवळीचा वारसा त्यांच्याकडे परंपरेने आलेला. धनाजीही निर्मिती ग्रूपमधलाच, तंबाखू आंदोलनातला आघाडीचा कार्यकर्ता. पट्टीचा वक्ता आणि कुशल संघटक, वकिली पूर्ण करून सनद न घेताच पूर्णवेळ कार्यकर्ता झालेला असतो. पुढे कॉ.भारत पाटणकरांच्या संपर्कात आल्यानंतर श्रमिक मुक्ती दलाचा पूर्णवेळ कार्यकर्ता बनतो. शहाद्याच्या चळवळीत सातपुड्याच्या डोंगरकपारीत सहा-सात वर्षे काम करून पश्चिम महाराष्ट्रातल्या चळवळीत अग्रक्रमाने सक्रिय होतो. लेखक संपत देसाई धनाजीच्या पहिल्या भेटीचे वर्णन असे करतो की, ‘तिथं धनाजीची आणि आमची पहिली भेट झाली. विस्कटलेले केस केस, दाढी वाढलेली, अंगात तपकिरी रंगाचा विटलेला शर्ट, तसा अवतार गबाळाच. पण डोळयात मात्र जबरदस्त आत्मविश्वास. बोलणंही तेवढेच ठाम. का? काय की,पहिल्याच भेटीत धनाजीनं आम्हाला आपलं करून टाकलं.’

कॉम्रेड धनाजी तसा भलताच चिकट. माणसाची पारख करण्यातही पटाईत. कोणाची किती कुवत आहे हे चटकन् ओळखायचा. कुणाच्या क्षमतांचा कसा उपयोग करून घ्यायचा यामध्ये वाकबगार, अधूनमधून तो राजाभाऊकडे यायचा. लेखक आणि मित्रांच्या कामाविषयी त्यांना तेथेच कळले आणि कामाची कुवत त्याच्या लक्षात येते. त्यातूनच पुढे लेखकाबरोबर धनाजी काम करण्याचे ठरवितो. यावर धनाजी बोलतो की, "राजाभाऊचं सोड आपल्याला तर व्यवस्था बदलाची लढाई उभी करायची हाय... इथं तुमचा ग्रूप चांगला हाय. त्यात तुम्ही तरुण आहात. तुम्ही ठरवा. तुमची तयारी असेल तर मी हाय तुमच्यासोबत. कधीही हाक मारा."

धनाजीला लोकांच्या भाषेत बोलण्याची कला अवगत होती. त्यामुळे त्याची रांगडी भाषा आणि भाषण लोकांना खूप आवडे. परिषदा, सभा, मोर्चा या ठिकाणी धनाजी आपल्या भाषणाने लोकांना प्रोत्साहित करत असे. ज्यावेळी तहसिलदार आणि अधिकारी उचंगीच्या धरणावर सर्व्हेसाठी आले असताना 'मी माझ्या बायकोचं कुंकू पुसून आलोय' असं काय काय तहसीलदार बडबडतात. तो मुद्दा घेऊन कॉम्रेड धनाजी परिषदेला जेवढे पुरुष त्याच्या दुपटीनं स्त्रिया होत्या. त्यांच्याकडे पाहत धनाजी म्हणतात की, तहसीलदारसाहेब "तुम्ही तुमच्या बायकोचं कुंकू पुसून आलाय पण आम्ही आमचं कुंकू तर सोबतच घेऊन आलोय." धनाजीच्या या वाक्यानं सारा परिसर घोषणाबाजीन गरजून जातो. एका प्रसंगी आंदोलकांना आवाहन करतात. सर्व लोकांना थांबवतात. कॉम्रेड धनाजीने माईक हातात घेवून जणू आदेशच सोडल्यासारखा धनाजी ओरडतात, 'थांबा' कोणालाच काही कळत नाही. जिल्हाधिकाऱ्यासह पोलीसही जागीच थांबतात. सगळीकडे एकदम शांतता पसरते. धनाजी पुढे म्हणतात, "जिल्हाधिकारी आता आमचे पाहुणे आहेत त्यांच्या संरक्षणाची जबाबदारी आमची. त्यांच्या केसालाही धक्का लागणार नाही याची खात्री आम्ही देतो. पोलिसांनी तिथेच थांबावे." त्यावेळी सर्व आंदोलक थांबतात. पोलिसांना

आणि अधिकाऱ्यांना जाऊ देतात. असे रांगडे व्यक्तिचित्रण अडचणीच्या काळात राजाभाऊंसारख्या मित्रांच्या पाठीशी राहताना दिसते. त्यामुळे वाचकांच्या मनात अधिक काळ राहते.

### ३.४.४ राजाभाऊ शिरगुप्पे

'एका लोकलढ्याची यशोगाथा' या अनुभव कथनातील महत्त्वाची व्यक्तीरेखा. चळवळीच्या सभा मीटिंगच्या वेळी लेखक आणि राजाभाऊ यांच्या निमित्ताने झालेल्या भेटीविषयी चित्रण करतो, आणि त्यातून राजाभाऊंची व्यक्तिरेखा उभी राहते. राजाभाऊ हे महाराष्ट्रातील आघाडीचे साहित्यिक आणि फिरस्ती लेखक म्हणून सर्वांना परिचित आहेत. राजाभाऊंनी आजऱ्यासारख्या दुर्गम भागात ग्रामीण विकासाचा प्रकल्प 'निर्मिती ज्ञानपीठ' (एन जी ओ) या नावाने सुरू केला होता. लेखकाबरोबर राजाभाऊ पुढे कॉ.भारत पाटणकर यांच्या श्रमिक मुक्ती दल संघटनेत सामील होतात. राजाभाऊंचा स्वभाव फटकळ होता. बऱ्याचदा काही मुद्द्यांवरून राजाभाऊ आणि लेखकांमध्ये वादावादी होत असे.  याबरोबरच राजाभाऊ एनजीओं ग्रामीण विकासाची कामे करत. त्याला परदेशी मदत मिळायची. पाणलोट क्षेत्र विकास आणि माता-बालसंगोपनाचे दोन प्रकल्प त्यांनी चालविलेले. गडहिंग्लजला मेडिकल कॉलेज सुरू केले होते. त्यांनी संस्थात्मक कामात चांगलंच बस्तान बसविले होते. त्यांच्याकडे संस्थेची आता चारचाकी गाडी होती. संस्थेचं ऑफिस मोठ्या इमारतीत होतं. राजाभाऊ कवी मनाचा आणि निसर्गप्रेमी होता. इथला निसर्गावर जगणाऱ्या माणसांवार व्यवस्था अन्याय करते. व्यवस्थेने केलेल्या अन्यायावर राजाभाऊ रागाने बोलत असे, "या साल्यांना गोळ्याच घातल्या पाहिजेत. किती क्रूर वागताहेत हे लोक. निसर्गाला जपल्याची, त्याच्याशी मैत्री केल्याची शिक्षाच देताहेत ते इथल्या लोकांना." तसा राजाभाऊ दिलदार मनाचा माणूस. चळवळीच्या कामासाठी स्वतःची M 80 गाडी वापरायला देत असे. लेखक आणि त्याचे मित्र बऱ्याचदा त्यांची गाडी वापरून वाड्यावस्त्यांवर फिरले आहेत.

पुढे मेडिकल कॉलेजमध्ये माजी विद्यार्थ्यांच्यामध्ये दोन गट पडतात. तसेच विश्वस्त मंडळातही दोन गट पडतात. सीसीएचची मान्यता मिळाल्याने अनेकांच्या महत्त्वाकांक्षा बळावलेल्या. राजाभाऊच्या विरोधात गडहिंग्लजमध्ये वातावरण चांगलंच तापतं. विद्यार्थ्याला मारहाण केल्याचा आरोप राजाभाऊवर ठेवला जातो. काही विश्वस्त राजाभाऊच्या बाजूने तर काही जण विरोधात जातात. त्यामुळे राजाभाऊचं मेडिकल कॉलेज अडचणीत येते. साऱ्या धावपळीत आजऱ्यातल्या सामाजिक संस्थेकडे राजाभाऊचं दुर्लक्ष होतं. आणि राजाभाऊची संस्था खूपच अडचणीत येते. संस्थांना मिळणारं परदेशी फंडिंग बंद होते. त्यामुळे त्यांचे सगळेच प्रकल्प थांबतात. संस्थेतल्या कर्मचाऱ्यांचं मानधनही देणं मुश्कील होतं. संस्था अडचणीत आल्याने निर्मितीमधल्या कार्यकर्त्यांची अवस्था नाजूक बनते. राजाभाऊच्या  अडचणीत काळात धनाजी आणि लेखक त्यांच्या पाठीशी खंबीर उभे राहतात. अशी छोटेखानी स्वरूपाची व्यक्तिरेखा प्रस्तुत अनुभवकथनात येते.

### ३.४.५ चित्री लढ्याचे शिलेदार

संतत देसाई यांनी 'एका लोकलढ्याची यशोगाथा' या आपल्या अनुभवकथनामध्ये प्रमुख व्यक्तिरेखांबरोबर लोकलढा यशस्वी करणाऱ्या कार्यकर्त्यांविषयी चित्रण केले आहे. अशा काही व्यक्तिरेखांचा आपण थोडक्यात विचार करू. त्यामध्ये राजाराम, जानबा मिसाळ, बंडा मिसाळ, बाबू येडगे, अशोक बांदेकर, अर्जुन मांगले सारखे कार्यकर्त्यांचा समावेश होतो. हे सर्व कार्यकर्ते चळवळीच्या अनुषंगाने पुस्तकामध्ये येतात. अशा व्यक्तिरेखांचा थोडक्यात विचार करू

लेखक संपत देसाई आपल्या अनुभवकथनात अशा कार्यकर्त्यांसदर्भात म्हणतात, कोणतेही आंदोलन, कोणतीही चळवळ यशस्वी व्हायची असेल तर त्यासाठी प्रामाणिक आणि लढाऊ कार्यकर्त्यांची फळी सोबत असावी लागते. चित्रीच्या आंदोलनामागे श्रमुदची वैचारिक भूमिका घेऊन लढाऊ आणि प्रामाणिक कार्यकर्त्यांची भक्कम फळी उभी राहिली. स्वतःची म्हणून त्यांची एक वेगळी ओळख होती. कोणी अतिशय प्रामाणिक होता तर कोणाकडे व्यावहारिक शहाणपण होतं तर कोणी कुशल संघटक होता. त्यांच्या या कौशल्याचा उपयोग चळवळीला चांगलाच होत होता.

**राजाराम चौगले** हा लाटगाव आणि गावठाण या ग्रूप ग्रामपंचायतीचा उपसरपंच. राजाराम तसा भूमिहीन शेतमजुराचा पोरगा. घरची परिस्थिती बेताचीच. तरीही पुनर्वसनाच्या लढाईत स्वतःचा वेळ, पैसा घालून राजाराम गावासाठी लढत होता. मोर्चा, आंदोलनात आघाडीवर राहत होता. संघटनेने दिलेली जबाबदारी आपल्या परीने पार पाडत होता. पहिल्यांदा तो रायवाड्यात शांताराम लाडांच्या दारात भेटतो. तो सुकवे गुरुजींसोबत आलेला. खांद्यापर्यंत रुळणारे लांबलचक केस, दाढी मिशी गुळगुळीत केलेली, अंगात ठिपक्या ठिपक्यांचा शर्ट घातलेला राजाराम त्याच्या ह्या वेगळ्या वेशभूषेमुळे सगळ्यांचेच लक्ष वेधून घेत होता. तो सोंगी भजनात स्त्री पात्र करायचा. पुढे त्याने आपला हा पेहराव बदलला. राजाराम तसा प्रामाणिक, गावातल्या अडल्यानडल्याच्या सतत उपयोगी पडणारा. कोणी हाक मारली की स्वतःचं काम बाजूला ठेवून त्याच्या कामासाठी धावत जात असे. वेळप्रसंगी स्वतःच्याच खिशातले पैसे दुसऱ्याच्या कामासाठी खर्च करायला हा मागेपुढे पाहायचा नाही.

सामाजिक कामाचा वसा त्याला त्याच्या वडिलांकडूनच मिळाला होता. चित्रीच्या धरणग्रस्तांना संघटित करण्यात त्याच्या वडिलांनी बरेच प्रयत्न केलेले. गावठाणच्या सर्वच सार्वजनिक कामांत त्यांचा पुढाकार असायचा. गावात शाळा बांधताना त्यांनीच पुढाकार घेतला होता. त्यांचा हा वसा राजारामने आता पुढे चालविला. तो लोकांना संघटित करीत होता. त्यांचे प्रश्न घेऊन सरकारी अधिकाऱ्यांना भेटत होता. संघटनेचा एक आघाडीचा कार्यकर्ता म्हणून त्याची आता ओळख तयार होत होती.

राजाराम प्रामाणिक असला तरी त्याला एक वाईट खोड होती. तो निर्णय घेताना कोणालाच काही सांगायचा नाही. आधी निर्णय करायचा आणि मग गावकऱ्यांना सांगायचा. त्यामुळे तो बऱ्याच वेळा अडचणीतही यायचा. आपण हे चांगल्यासाठी करतोय आणि आपण पुढारी म्हणून जे करतोय त्याला गावाने मान्यता द्यावी असं त्याला वाटायचं. पण गाव मात्र पक्कं बेरकी. राजारामला ते हमालासारखं वापरायचे आणि तो चुकला की बरोबर त्याला कोंडीत पकडायचे.

**जानबा मिसाळ** गावठाणमधला एक तरुण कार्यकर्ता. तो प्रामाणिक आणि तेवढाच व्यावहारिक होता. चुकीचं काही करायचं नाही आणि कोण चुकलं तर गप्प बसायचं नाही असा त्याचा स्वभाव होता. त्यामुळे गावातली तरुण पोरं त्याला कॉम्रेड म्हणायची. कॉम्रेड म्हणजे प्रामाणिक आणि रोखठोक बोलणारा. असाच काय तो त्यांनी अर्थ घेतलेला. रोखठोक बोलणाऱ्या जानबाला गाव दबकून आणि घाबरून असे. त्यामुळे गावात मीटिंगमध्ये कोणी काय बोलला तरी जानबा त्यांचा समाचार घेत असे. राजारामला त्याची खंबीरपणे साथ असे. तो चळवळीसाठी राजारामएवढा वेळ द्यायचा नाही पण गावातली घडी मात्र व्यवस्थित बसवायचा. मोर्चा, आंदोलनाचे महत्त्व लोकांना आपल्या भाषेत पटवून दत असे. वाचनाचीही त्याला तशी बरीच आवड. चळवळीच्या कामात त्याला याचा चांगलाच उपयोग व्हायचा. त्याला मिळालेल्या जमिनीची लढाई त्याने आत्यंतिक नेटाने लढवली. पळ न काढता पाय रोवून ठामपणे उभा राहिला. त्याची ही लढाई वैयक्तिक वाटत असली तरी ती चित्रीच्या सगळ्याच धरणग्रस्तांना बळ देणारी ठरली.

शिडशिडीत अंगकाठीचा **राऊ मिसाळ** हा एक चळवळीतील कार्यकर्ता. तो सोंगी भजनातला हाडाचा कलाकार आणि वस्तादही होता. त्याचा सामाजिक कामातही तसाच पुढाकार असे, पण संध्याकाळ झाली की मात्र त्याचा स्वतःवरचा ताबा निसाटायचा. पुढे पुढे तो दारूच्या जास्तीच आहारी गेला. त्यातच त्याचं निधन झालं. एक चांगला कार्यकर्ता असा वाया गेला.

**बंडा मिसाळ** व्यावहारिक शहाणपण असलेला तरुण कार्यकर्ता. विठ्ठल चौगलेंच्या बरोबरीनं गावच्या कामात पुढाकारात सोबत असे. संघटना नसताना सुरुवातीच्या काळात बंडानंच पुढाकार घेऊन अनेकांची कामे मार्गी लावलेली. गावाचा आर्थिक व्यवहार सिताराम मिसाळ या तरुणाकडे गावानं विश्वासानं सोपविलेला. त्याच विश्वासानं त्यानं तो सांभाळलेला. सीताराम लिखापढीत हुशार. कोणतीही गोष्ट करायची तर ती नीटनेटकेपणाने अशी याची खासियत. नव्या प्रश्नाचा अभ्यास करायची गड्याला चांगली सवय होती. धरणाचं काम सुरू झालं आणि गड्यानं पुनर्वसन कायद्याचं पुस्तकच आणलं, मीटिंगला येताना व्यवस्थित मुद्दे काढून यायचा. कायद्याची बाजू मांडायचा. त्याच्या सासूबाईंची जमीन चित्री धरणात गेलेली. कन्या वारसानं ती त्याच्या सौभाग्यवतींना मिळालेली. कसायला जमीन वाडवडिलांच्यापासून सीतारामकडेच आली होती. त्यामुळे संपादनाच्या रकमेवर सीतारामचाही हक्क तेवढाच होता. त्याचा राज्याच्या पुनर्वसन मंत्र्याबरोबरच थेट संघर्ष होता.

**बाबू येडगे** अवंडीच्या धनगरवाड्यावरचा जिगरबाज गडी. मुळात डंगे गवळी धनगर असलेला बाबू येडगे आता पक्का कुणबी झालेला होता. प्रचंड कष्ट आणि ढोरमेहनत करून त्याने जांभ्या खडकावर हिरवीगार शेती फुलवलेली होती. जांभ्या खडकासारखाच राकट दिसणारा हा माणूस मनानं मात्र कोवळ्या कोंबासारखा हिरवागार होता. असाच एका मीटिंगमध्ये भेटला आणि पुढे श्रमिक मुक्ती दलाच्या चळवळीचा पुढारी कार्यकर्ता बनला. अवंडी गाव उठल्यानंतर अडचणीत सापडणाऱ्या आपल्या धनगरवस्तीचं काय होणार या चिंतेनं तो अस्वस्थ व्हायचा. त्यामुळे पुनर्वसनाची मीटिंग हाय म्हटलं की बाबू येडगे तिथं जायचा. आपल्या परीने प्रश्न मांडायला बघायचा. अधिकाऱ्यांना भेटायचा, आपलं गाऱ्हाणं मांडायचा पण कोणालाच काय पाझर फुटत नव्हता. शेवटी आमची भेट झाली आणि बाबूदाला पण प्रश्न सुटण्याची पक्की खात्री झाली. आणि चळवळीत सामिल झाला. बाबू येडगे पुढे सगळ्या आंदोलनात आघाडीवर राहत असे. आपल्या प्रश्नांपलीकडे जाऊन इतर लढ्यांत सहभागी होऊ लागलेला. आरोग्य चळवळ, सांस्कृतिक चळवळीतही तो आता सहभागी होत असे. मोर्चे, आंदोलनातील त्याचा सहभाग वाढल्याने त्यालाही नवा आत्मविश्वास आलेला. चिखली गुठ्ठयाच्या स्पर्धेत रेड्याचं औत घेऊन स्पर्धा जिंकणारा धनगर गडी ही त्याची ओळख आता जुनी झालेली. चळवळीचा लढाऊ कार्यकर्ता ही नवी ओळख तयार झालेली.

**अशोक बांदेकर** अवंडीतला तरुण गिरणी कामगार. बरीच वर्षे मुंबईला लालबागच्या रंगारी बदक चाळीत बैठकीच्या खोलीत राहिलेला. त्यामुळे मुंबईच 'रावडीपण' त्याच्यात ठासून भरलेलं. मुळात हा कलंदर वृत्तीचा कलावंत कार्यकर्ता. मनानं साधा, भोळा आणि सरळ माणूस. चित्रीच्या पुनर्वसनाची लढाई निर्णायक टप्प्यावर आलेली आणि त्या दरम्यान अशोक गावाकडं परतलेला. गिरणी कामगार असल्यानं लढा आणि चळवळ अशोकला काही नवीन नव्हती. मुंबईहून इकडे आला आणि तो चळवळीचा कार्यकर्ता बनला. मोठ्या उत्साहाने आणि हिरीरीने तो मोर्चे, आंदोलनात आघाडीवर राहू लागला. कलाकार असलेला अशोक चळवळीची गाणी म्हणताना तल्लीन व्हायचा. त्याच्या आवाजातही एक गोडवा होता, ढोलकीवर थाप मारली की आंदोलक डोलायला लागायचे. स्वतःच्या पलीकडे जाऊन दुसऱ्याच्या सुखदुःखात सामील होणारा हा कार्यकर्ता एखाद्याच्या आहारी मात्र चटकन जायचा. माणसं पारखायला मात्र तो खूपच कमी पडायचा. त्याच्या ह्या स्वभावाचा फायदा मात्र बरेच जण घ्यायचे. अनेक वेळा त्याच्या या स्वभावामुळे तो अडचणीतही आलेला. तरीही लढ्यात, चळवळीत तो कधीच मागं राहिला नाही.

अवंडीतला आणखी एक लढाऊ कार्यकर्ता म्हणजे **अर्जुन मांगले**. सगळेच त्याला अर्जुनमामा म्हणायचे. (अगदी डॉ. भारत पाटणकरसुद्धा), अर्जुनमामाही बरीच वर्षे मुंबईत राहिलेला. मुंबईत राहून सगळं करायचं ते करून आलेला (भाईगिरीसुद्धा). मामाचे सगळे भाऊ वतनदार पाटलांच्या बाजूनं; पण मामा मात्र पोरांच्या बाजूनं शेलारमामासारखा उभा. रोखठोक स्वभाव. चार द्यायला आणि चार घ्यायलाही कधी मागंपुढं न बघणारा. संघटनेच्या सगळ्या कार्यकर्त्यांवर मामाचा भलताच जीव. त्यामुळे अवंडीत बैठक किंवा सभा असली की मामाचा आपल्या घरी जेवणाचा आग्रह. खिशात पैसे असले की मामा म्हणजे कर्णाचा अवतारच. मोर्चा, आंदोलनात सहभागी होताना कधी खिशाचा विचार केला नाही. स्वार्थापलीकडे जाऊन गोरगरीबाची बाजू जोरात मांडायचा. चळवळीच्या सगळ्या आंदोलनात मामा सतत आघाडीवर राहिला.

अवंडीच्या स्वतंत्र ग्राम पंचायतीची पहिली निवडणूक झाली. **प्रकाश कालेकरची** बायको साधना महिला आरक्षणातून सरपंच झाली. जरी ती सरपंच झाली तरी कारभार मात्र प्रकाशच करायचा. अवंडीतल्या इतर कार्यकर्त्यांपेक्षा प्रकाश तसा हुशार. कोणत्या गोष्टीला किती वेळ द्यायचा याचं गणित त्याच्या मनात पक्कं असायचं. नफ्यातोट्याचं गणित जुळवून प्रत्येक घटनेकडे पाहाणारा प्रकाश पक्का व्यवहारी. त्याचा हा व्यवहारीपणा अवंडीकरांच्या फायद्याचा ठरलेला. पुनर्वसनाच्या प्रत्येक गोष्टीत तो लक्ष घालू लागलेला. मुळात हुशार आणि चौकस असलेल्या प्रकाशला चळवळीमुळे प्रश्न सोडविण्याची नवी दृष्टी आलेली. कोणता प्रश्न कसा सोडवायचा, त्याच्या मुळाशी कसं जायचं हे त्याला लवकरच अवगत झालेलं. लोकांचे प्रश्न घेऊन तो आता अधिकाऱ्यांना भेटू लागला. नागरी सुविधांच्या कामाकडे बारकाईने लक्ष देऊ लागला. जमीनवाटपाचे आदेश काढून आणणे, जमिनीचा ताबा प्रकल्पग्रस्तांना देणे, सातबारा काढणे, भूखंडाचे आदेश काढणे, त्याचे ताबे देणे, घरबांधणी अनुदान या कामात पुढाकार घेऊन ती पुरा करू लागला. कागदपत्रांची पूर्तता करण्यात तो भलताच पटाईत. त्याच्या कामाच्या पद्धतीचा अवंडीकरांना खूपच फायदा झालेला. मोर्चा, आंदोलन यांद्वारे संघर्षाच्या आघाडीवर तो जास्त नसला तरी ठरलेल्या गोष्टी नीटपणे करून घेण्यात त्याचा वाटा महत्त्वाचा राहिला.

### ३.५ समाज

साहित्य हा समाजजीवनाचा आरसा आहे असे म्हटले जाते. समाजात घडणाऱ्या घडणाऱ्या घटना-प्रसंगाचे प्रतिबिंब साहित्यातून पडत असते. समाज हा साहित्य निर्मितीचा मूलस्रोत आहे. साहित्य आणि समाज यांना जोडणारा सेतू लेखक असतो. साहित्यातून त्या त्या काळातील मूल्यकल्पना आणि त्या त्या काळातील वाङ्मयीन पर्यावरण लेखक संवेदनशीलपणे प्रकट करत असतो. विविध काळातील समाजजीवन, समाजातील रूढी, परंपरा, श्रद्धा, व्यवसाय, कुटुंबपद्धती, वर्णव्यवसस्था, जीवनपद्धती लेखक साहित्यातून चित्रित करत असतो. लेखक हा समाजजीवनाचा एक घटक असल्याने तो आपल्याला आलेल्या अनुभवांना आपल्या प्रतिभेच्या जोरावर शब्दबद्ध करताना समाजजीवनाचा धांडोळा घेत असतो. याच पार्श्वभूमीवर संपत देसाई यांच्या ‘एका लोकलढ्याची यशोगाथा’ या अनुभवकथनातील समाजजीवनाचा विचार करू.

लेखकाने प्रस्तुत पुस्तकात समाजातील वंचित, उपेक्षित, दुर्बल घटकांचे समाजजीवन रेखाटले आहे. धरणग्रस्तांच्या लढ्याचे वर्णन करताना लेखक आपल्यासमोर आजरा आणि चित्री परिसरातील जनजीवन वाचकांसमोर अनुभवकथनाच्या रूपाने मांडतो. पुस्तकाच्या प्रारंभी आजरा परिसरातील सामाजिक जीवनाचा वेध आपल्या लेखनातून लेखक घेतो. आजरा परिसरातील असलेल्या विविध संमीश्र समाजजीवनाची पार्श्वभूमी लेखक सांगतो. इथे सर्वसामान्य कष्टकरी, कुणबी, धनगर जातीतला समाज तर आहेच याबरोबरच मुस्लिम, जैन, ख्रिश्चन समाजही मोठ्या प्रमाणावर आहे. जरी तो या मातीत परप्रांतातून कधी काळी आला असला तरी तो आज इथल्या मातीतला वाटावा इतका एकरूप झाला आहे. लेखक सांगतो की, साधारण चौदा, पंधराव्या शतकात इथं

मुस्लीम आले. काही लढाईच्या निमित्ताने आले. तर काहीनी इथल्या जातिव्यवस्थेला कंटाळून इस्लाम आपलला केला. तसे इथले सगळेच मुस्लीम कष्ट करून जगणारे. कुठेतरी हाताच्या बोटावर मोजता येतील इतक्याच लोकांना कसण्यासाठी जमिनी. बाकी ८० टक्के मुस्लीम भूमिहीनच. त्यांनी जगण्याचे नवे नवे मार्ग शोधले. गावागावात फिरून काहींनी भात, नाचणीचा व्यापार सुरू केलेला. तर काहींनी ट्रक ड्रायव्हर, क्लीनर, टायर पंक्चर, हमाली असा नवा मार्ग स्वीकारलेला. खरं तर इस्लाम हा जातीविरहित धर्म. बलुतेदार जाती धर्मांतरित होताना त्या आपला मूळचा व्यवसाय घेऊन इस्लाममध्ये आल्या. बागवान, कासार, अत्तार, नालबंद, नदाफ, कसाब, शिकलगार, तांबोळी अशा कित्येक बलुतेदार जाती इथंही दिसू लागल्या. कुणब्यांच्या। बैलांना पत्र्या मारणारे नालबंद, आया-बहिणीचं हात हातात घेऊन बांगड्या भरणारे कासार, सौभाग्याचं लेणं असलेलं कुंकू विकणारे आणि मंगळसूत्र गुंफणारे अत्तार, शेतातलं माळवं घराघरात पोहोचवणारे बागवान या साऱ्यांचं एक घट्ट नातं तयार झालं. परस्परपूरक व्यवसायामुळे ते अधिक जैविक बनत गेलं.

अनेक धर्माचे, अनेक जातींचे लोक इथं आले आणि पुरते आजरेकर बनून गेले. तसा हा तालुका तळकोकणाला जवळचा. तळकोकणातून व्यापाराच्या निमित्ताने वैश्य वाणी इथे आले. आजऱ्याच्या मातीत ते एकरूप होऊन गेले. बाराव्या शतकात नव्या क्रांतिकारक लिंगायत धर्माची स्थापना झाली आणि मानवतेचं सुंदर स्वप्न घेऊन शेजारच्या कर्नाटकातून हा धर्म आजऱ्यात आला. व्यापारउदीम करणारे या धर्मातील लोक बघता बघता आजरेकर झाले. साहजिकच आजऱ्याच्या आर्थिक नाड्या वैश्य वाणी आणि लिंगायत वाणी यांच्या हातात गेल्या.

देसाई हे या भागातले इनामदार. मूळचे गोव्याचे विशाल गोमंतकाचे राजे. त्यांचीच काही घराणी घाट चढून वर आली. सोबत येताना गोमंतकाचा मुख्य देव असलेल्या रवळनाथालाही ती घाटावर घेऊन आली. जिथं रवळनाथ मंदिर त्या गावात देसायांची वस्ती. रवळनाथ इथल्या अनेक गावांचं ग्रामदैवत. तळकोकणात कणकवली-ओरोसपासून दक्षिणेला कारवारपर्यंत तर घाटावर पेरणोली-आजऱ्यापासून पार बेळगाव-खानापूरपर्यंत या गोमंतकाच्या खुणा जागोजागी दिसतात. तसेच बार्देस प्रांतातून धर्मांतरित झालेले ख्रिश्चनही मोठ्या प्रमाणात वर आले. गोव्याला जवळ असलेल्या घाटमाथ्यावरील वाड्या-वस्त्या त्यांनी जवळ केल्या. त्यांची संस्कृती, त्याचं राहणं, वागणं इथल्या कुणब्यांच्या जवळ जाणारं. काही इथंच शेती करू लागले तर काही इथं आपला मासेविक्रीचा पारंपरिक व्यवसाय करू लागले.

जवळजवळ साडेतीनशे वर्षांपूर्वी आजऱ्यात आलेला ख्रिश्चन समाज पेरणोली, वाटंगी, साळगाव, धनगरमोळा, शेळप, पारपोली, खानापूर, हालेवाडी अशा अनेक गावांत इथल्या मातीशी एकरूप झाला. जरी ते ख्रिश्चन झाले असले तरी त्यांची सांस्कृतिक जडणघडण मात्र इथल्या लोककला आणि वारकरी परंपरेतूनच घडलेली. गावागावात मंदिरात चाललेल्या भजनात तो तल्लीन होऊन जायचा. दर रविवारी तो चर्चमध्ये ज्या श्रद्धेने जायचा त्याच भक्तिभावाने तो ग्रामदैवातालाही पुजायचा. आजऱ्याच्या चर्चला तसा खूपच जुना इतिहास. सावंतवाडी आणि बेळगाव सोडले तर या परिसरात उभारलेले सर्वांत जुने चर्च, जवळजवळ तीन-साडेतीनशे वर्षांचा इतिहास. चर्चच्या दिवाबत्तीचा खर्च चालावा म्हणून मुसोली या गावी इचलकरंजी जहागिरीतून जमीनही मिळालेली होती.

कोकण आणि देशसंस्कृतीचा सुंदर मिलाप आजऱ्याच्या मातीत बघायला मिळतो. मराठी, मालवणी, कोकणी, दख्खनी, कानडीसह वेगळा चंदगडी बाज असणारी भाषा बोलणारे अनेक धर्माचे, जातींचे लोक या भागात कित्येक वर्षापासून राहत आहेत. पश्चिम भागात तळकोकणातील दशावतारी नाटकासह दहिकाला आणि शिमग्याचा उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा होतो. तर पूर्वेकडच्या भागात तमाशाच्या फडाबरोबरच कर्नाटकातील संग्या बाळयाचाही खेळ त्याच गोडीने रंगतो. वारकरी भजनाच्या जोडीनं सोंगी भजनांनीही आपला लोककलेचा

पारंपरिक बाज कायम ठेवला आहे. इथल्या घनदाट जंगलांनी गवळी धनगरांचा संथ लयीतला गज्जोनृत्याचा ठेवा आजही जपून ठेवला आहे अठरापगड जातीधर्माच्या लोकांनी आजरा कसा बनत गेला याचा उलगडा हे पुस्तक वाचताना होत जातो. लोकलढ्याची गोष्ट वाचताना आजाऱ्याचा अपरिहार्य इतिहासही वाचकांसमोर येतो.

या परिसरातील कष्टकरी कुणबी समाजाबरोबर डंगे धनगर हाही समाजजीवनातील महत्त्वाचा घटक. चचित्रीच्या उगमाकडे सह्याद्रीच्या घनदाट जंगलाच्या कुशीत गाई-म्हशी पाळणाऱ्या डंगे धनगरांची वस्ती. जंगलाशी सलगी करत, जंगलातल्या काटक्या-कुटक्या गोळा करणे, जंगलात मिळणारा मध, फळं गोळा करणे आणि निसर्गाबरोबरच स्वतःला समृद्ध करीत हे लोक जगताना दिसतात. चित्रीच्या काठावरील धनगरवाडे म्हणजे दह्या-दुधाचे आगरच. एका एका कुटुंबात खंडी-दोन खंडी गाई- म्हशी. तितक्याच शेळ्या-मेंढ्याही. दिवसभर गाई-म्हशीच्या सोबतीनं जंगलात फिरणारा डंगे गवळी धनगर म्हणजे निसर्गाचा खराखुरा सोबती. त्यांची राहणीमानही साधे आणि निसर्गाशी साधर्म्य सांगणारे असे असे. मातीनं लिंपलेल्या कारवीच्या कुडाच्या भिंती, वर गवती छप्पर असलेला लांबलचक मांगोर म्हणजेच डंगे गवळी धनगरांचं घर. मांगोराच्या सभोवताली लाकडी कुंपण. त्यात गाई-म्हशी मोकळेपणानं हिंडत. झडीच्या पावसात कायम ढणढणणारी, माणसासह गुरा-ढोरांनाही उब देणारी, तिथंच एका कोपऱ्यात लावलेली चूल. कोणताही डामडौल नाही की उधळपट्टी नाही. घर म्हणजे उन, पाऊस, वारा आणि थंडीपासून संरक्षण इतकाच काय तो घराचा अर्थ. गुरं, ढोरं, पोरं आणि माणसं सगळीच एकत्र. त्यांची ही घरं म्हणजे नैसर्गिक एअरकूलरच. झडीच्या पावसात आणि हिवाळ्यात उब देणारी तर तापणाऱ्या उन्हातही गारवा देणारी.

डंगे गवळी धनगरही अगदी इथल्या निसर्गासारखाच उदार, एकदा एखाद्याला आपलं मानलं की मुक्त हस्ते त्याच्यावर प्रेमाची उधळण करणारा. अनोळखी माणूस आला तरी खोपटातला दह्या-दुधानं भरलेला मोगा रिकामा करायला मागंपुढं न बघणारा. गुराढोरांमागनं रानभर हिंडून रापलेल्या चेहऱ्याची ही माणसं मनानं मात्र फारच निर्मळ. कातळातून पाझरणाऱ्या नितळ पाण्यासारखी. निसर्गासोबत मैत्री करता करता निसर्गाचाच एक भाग बनून गेलेली ही माणसं स्वतःचं असं वेगळं सांस्कृतिक जग जन्माला घालत गेली. त्यांची गाणी, त्यांचं नृत्य, त्यांचं संगीत इतकंच नव्हे त्यांचे लग्न-बारसं यांसारखे कार्यक्रमही निसर्गाच्या सहभागातूनच फुलत गेले.

भोवतालच्या निसर्गात मैत्रीपूर्ण हस्तक्षेप करीत पिढ्यानपिढ्या राबणाऱ्या स्त्री-पुरुषांनी चित्रीच्या काठाकाठानं शेती करीत स्वतःची म्हणून अशी एक वेगळी जीवनशैली विकसित केली. वाडवडिलांनी झाडं-झुडपं तोडून, साफसफाई करून बनवलेल्या शेतीचा स्वतःच्या अनुभवातून विकास केला. हा विकास करताना निसर्गाला इजा होणार नाही याची काळजीही घेतली. जंगलं जिवंत ठेवून छोट्या छोट्या ओहोळी आणि चित्रीही बारमाही वाहती राहील असाच व्यवहार कायम केला. छोट्या छोट्या ओहोळींवर आडव्या पाटाची छोटी छोटी धरणं दरवर्षी बांधली. पाणी वळवत वळवत शेतापर्यंत आणलं. जिराईत शेतीची बागाईत बनवली. जे मातीशी झटतात, जे पिकांशी बोलतात असे राबणारे हातच निसर्गाचा समतोल राखू शकतात. निसर्ग आणि माणूस, जंगली प्राणी आणि कुणबी, कुणबी आणि गवळी धनगर यांनी परस्परपूरक अशी जीवनरीत इथे विकसित केली. असे समिश्र स्वरूपाचे समाजजीवन या परिसरात आनंदान जगत असलेले दिसून येते.

या परिससरातील लोकांमध्ये रूढी, परंपरा, श्रद्धा, समजूती जेवढ्या खोल रूजल्या होत्या तेवढी जातव्यवस्थाही मनात खोलवर रूजलेली होती. मार्क्स-फुले-आंबेडकर यांच्या विचारधारेवर काम करणारे नेते-कार्यकर्ते लढ्याचे नेतृत्व करीत असल्यामुळे भारतीय समाजव्यवस्थेचे भान त्यांना आहे. त्यामुळे वर्गलढ्यामधील जातीय प्रश्नाची हेळसांड झालेली दिसत नाही. या लढ्यात अनेक दलित कार्यकर्तेसुद्धा योगदान देताना दिसतात. राजाराम चौगुले यांना दलित वस्तीमध्ये रात्रीच्या वेळी जेवणाचा प्रसंग येतो तेव्हा जातीय नेणिवेतून झालेली चौगुलेंची घालमेल समाजव्यवस्थेतील जात जाणीव-नेणिवेचे वैशिष्ट्य दर्शवते. परंतु चळवळीतील सततच्या

संपर्कातुन राजाराम यांच्यातील जातीयवृत्ती गळून पडते. पुढे त्यांच्या घरी दलित पोरांचा वावर अगदी चुलीपर्यंत होतो. दलित वस्तीतला सामूहिक जेवणाचा हा प्रसंगही जातीच्या पार जाऊन वर्गीय आत्मभान देणारा ठरतो.

**३.६ संस्कृती**

'एका लोकलढ्याची यशोगाथा' या पुस्तकाचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे या पुस्तकात लेखकाने आजरा आणि चित्री परिसरातील संस्कृतीचे केलेले चित्रण होय. प्राचीन अशा संस्कृतीचा वारसा या परिसराला लाभला आहे. वर्षानुवर्ष पारंपरिक पर्यावरणपूरक शेती आणि निसर्गावर जगणाऱ्या इथल्या शेतकऱ्याने त्यांची अशी जगण्याची संस्कृती निर्माण केलेली दिसून येते. त्यांच्या परंपरा, रूढी, सण, समारंभ, उत्सव, श्रद्धा, धनगरवाड्यातील डोंगरझाडीतील देव-दैवते, पारंपरिक लोकसंस्कृतीमधील लोकनृत्यादी लोककला, रोंबाट आणि चव्हाटासारख्या लोककलांचे जीवनातील महत्त्व, गावागावातील वारकरी संप्रदाय आणि वारकरी परंपरा अशा संपन्न आणि समृद्ध सांस्कृतिक जीवनाचे चित्रण या पुस्तकात आले आहे.

मुस्लिमांचीही वस्ती आजरा गावात तशी बरीच मोठी. त्यामुळे त्यांचे सांस्कृतिक दर्शनही या परिसरात दिसते. इब्राहीम आणि गौस या दोन सरदार असलेल्या भावांच्या नावाने इब्राहीमपूर आणि गवसे ही गावे वसलेली. कधी काळी इथं नबाब येऊन राहिलेला त्यामुळे आजऱ्याच्या वेशीवरच नबाबपूर हे गाव अस्तित्वात आलेलं. तसेच सुफी संतांच्या परंपरेच्याही काही खुणा इथे दिसतात. इथं असलेला हजरत दावल मलिकचा दर्गा हा मुस्लिमांपेक्षा इथल्या बहुजनांचेच श्रद्धास्थान अधिक. रवळनाथाच्या दर्शनाला ज्या भक्तिभावाने इथला माणूस जातो त्याच श्रद्धेने तो दावल मलिकसमोर नतमस्तक होतो. रवळनाथाला भरलं फळ देताना दावल मलिकला धूप अगरबत्ती लावायला तो कधी विसरला नाही. अनेक धर्माचे, अनेक जातींचे लोक इथं आले आणि पुरते आजरेकर बनून गेले. तसा हा तालुका तळकोकणाला जवळचा. तळकोकणातून व्यापाराच्या निमित्ताने वैश्य वाणी इथे आले. आजऱ्याच्या मातीत ते एकरूप होऊन गेले. येताना ते एकटे आले नाहीत त्यांनी सोबत तळकोकणातली संस्कृतीही आणली. बाराव्या शतकात नव्या क्रांतिकारक लिंगायत धर्माची स्थापना झाली आणि मानवतेचं सुंदर स्वप्न घेऊन शेजारच्या कर्नाटकातून हा धर्म आजऱ्यात आला. व्यापारउदीम करणारे या धर्मातील लोक बघता बघता आजरेकर झाले, आणि वेगळी सर्वधर्मसमभावाची संस्कृती येथे निर्माण झाली. तसा हा तालुका सांस्कृतिकदृष्ट्या गोमंतकाला जवळचा. त्यामुळे गोमंतकाचा मुख्य देव असलेल्या रवळनाथाचे दर्शनही येथे घडते. तसेच बार्देस प्रांतातून धर्मांतरित झालेले ख्रिश्चनही मोठ्या प्रमाणात येथे आले, आणि इथल्या मातीत आणि संस्कृतीतही बेमालूमपणे मिसळले. जरी ते ख्रिश्चन झाले असले तरी त्यांची सांस्कृतिक जडणघडण मात्र इथल्या लोककला आणि वारकरी परंपरेतूनच घडलेली.

कोकण आणि देशसंस्कृतीचा सुंदर मिलाप आजऱ्याच्या मातीत बघायला मिळतो. मराठी, मालवणी, कोकणी, दख्खनी, कानडीसह वेगळा चंदगडी बाज असणारी भाषा बोलणारे अनेक धर्माचे, जातींचे लोक या भागात कित्येक वर्षापासून राहत आहेत. पश्चिम भागात तळकोकणातील दशावतारी नाटकासह दहिकाला आणि शिमग्याचा उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा होतो. तर पूर्वेकडच्या भागात तमाशाच्या फडाबरोबरच कर्नाटकातील संग्या बाळ्याचाही खेळ त्याच गोडीने रंगतो. वारकरी भजनाच्या जोडीनं सोंगी भजनांनीही आपला लोककलेचा पारंपरिक बाज कायम ठेवला आहे. इथल्या घनदाट जंगलांनी गवळी धनगरांचा संथ लयीतला गज्जोनृत्याचा ठेवा आजही जपून ठेवलेला दिसतो.

बाबासाहेब आजरेकरांनी १८३२ साली स्थापन केलेला आजरेकर फड इथल्या सांस्कृतिक जीवनातला महत्त्वाचा भाग. पंढरपूर आणि वारकरी संप्रदायातील एक महत्त्वाचा फड म्हणून याचा नावलौकिक आहे. हा फड

मूर्तीऐवजी तुकाराम महाराजांच्या गाथेची पूजा करतो. अक्षरांची पूजा आणि ज्ञानाला महत्त्व देणारा हा फड आहे. या फडाच्या प्रेरणेतूनच पेरणोली गावी मोठ्या उत्साहाने दरवर्षी तुकारामबीज साजरी करण्याची परंपरा आहे.

इथल्या सांस्कृतिक जीवनातील महत्त्वाचा भाग म्हणजे शिमगा उत्सव होय. शिमग्याला रोंबाट आणि चव्हाटा या लोककला आनंदाने साजऱ्या केल्या जात. रोंबाट म्हणजे तमाशा. निसर्गासोबतच्या जैविक नात्यातून फुललेली संस्कृतीही समृद्ध. ज्या उत्साहात अवंडीचे धनगर दसरा साजरा करायचे त्याच उत्साहात इथले कुणबी शिमग्याचा उत्सव साजरा करायचे. शिमग्याच्या पहिल्या दिवशी चव्हाट्यावर होळी उभी केली जायची. तिच्या भोवतीनं सारा गाव जमायचा. नैवेद्य दाखवून मानकऱ्यांच्या पोळ्या होळीला बांधल्या जायच्या. दुसऱ्या दिवशी सगळं गाव जमून रानात पोस्तासाठी भुवड काढाय निघायचं. शिकार झाली की वाजतगाजत चौकात आणली जायची. तिची पूजा करायची, नंतर चव्हाट्यावर सामूहिक जेवण व्हायचं आणि नंतर रोंबाट रंगायचं. रोंबाट एकदा रंगात आलं की पहाट कधी व्हायची ते कळायचं नाही. सारं गाव रोंबाटात हरवून जायचं. रात्री जेवण झालं. लोक सजूनधजून घरातून बाहेर पडत. कुणी ढोल, कुणी डफ, कुणी हलगी, कुणी चिपळ्या तर कोण ढोलकी घेऊन रस्त्यावर येत. 'जय जोता बाई जय जोता' असा घोष करीत लोक चव्हाट्यावर जमत. म्हातारी-कोतारी, बायका-पोरं सगळीच हौसेनं जमू लागतात. काही पुरुष नऊवारी लुगडं नेसून नटूनथटून बायांच्या वेषात येतात. नऊवारी लुगडं, त्यावर कमरपट्टा, डोळ्यांत काजळ, पायात पैंजण, केसात गजरा माळलेले पुरुष गडी हलगीच्या तालावर नाचतनाचतच चव्हाट्यावर येतात. तिथंच दोन काठ्या उभ्या केल्या जातात. काठीला पडदा बांधला जातो. क्षणातच रंगमंच तयार केला जातो. नेपथ्य नावाचा प्रकारच तेथे नसतो. कलावंत आणि प्रेक्षकांत फारसं अंतरच उरत नाही.

"अवंडी गाव सुंदर.... आम्ही राहतो आजऱ्याच्यवर ।
भवताली गर्द डोंगर.... चित्री नदीच्या तीरावर
अवंडी गाव सुंदर.......।"

अशा लयबद्ध गीतातून गावाच्या वर्णनाने कार्यक्रमाला सुरुवात होते आणि आता चव्हाट्यावर रंग भरू लागतो. शेतात राबणारी, घाम गाळणारी ही माणसं नृत्य-संगीतात भान हरपून तल्लीन होतात. ढोलकी, हलगी आणि डफाच्या तालावर त्याचं थिरकणं तर अप्रतिमच असतं. एखाद्या व्यावसायिक कलाकारालाही लाजवणारं. हा लोककलेचा समृद्ध वारसा दऱ्याखोऱ्यांतल्या या राबणाऱ्या माणसांनी जिवापाड जपून ठेवला आहे. या साध्या, सरळ आणि मातीत राबणाऱ्या माणसांनी श्रमसंस्कृती जोपासली, रांगड्या पद्धतीनं व्यक्त केलेला सृजनाचा आविष्कार स्वतःबरोबर मानवी संस्कृतीलाही समृद्ध करणारा असा आहे.

**३.७ पर्यावरण**

'एका लोकलढ्याची यशोगाथा' हे संपत देसाई यांचे पुस्तक धरणग्रस्तांच्या लोकलढ्याचे कथन करते. या पुस्तकामुधन चळवळ आणि लोकांनी दिलेला लढा जरी वाचकांसमोर येत असला तरी या पुस्तकामधून निसर्ग, भौगोलिक परिसर, संस्कृती, समाज जीवन, सण, उत्सव, लोकश्रद्धा, लोकसंस्कृतीचे दर्शनही वाचकांना घडते. या पुस्तकातून या परिसरातील वेगळे विश्व वाचकांपर्यंत येते. प्रस्तुत ठिकाणी या गोष्टींचा थोडक्यात आढावा घेऊ.

पुस्तकाच्या प्रारंभी ते येथील समृद्ध नैसर्गिक जीवनाची ओळख करून देतात. चित्री हा निसर्गाचा एक समृद्ध वारसा आहे. महाराष्ट्रात सर्वाधिक पाऊस पडणाऱ्या आंबोली आणि तेथील भव्य सह्याद्रीच्या पर्वतरांगांच्या घाटमाथ्यावर वसलेला हा प्रदेश. निसर्गानं या प्रदेशाला भरभरून दिले. त्यातून जैवविविधतेचा मोठा वारसा या प्रदेशाला लाभला. अनेक दुर्मिळ झाडांनी समृद्ध जंगलातून बारामाही वाहणारे ओढे-नाले, नाना

प्रकारच्या जातींची झाडे, पशू-पक्षी आणि दुर्मिळ वन्य जीवांचा वावर, आज जगात दुर्मिळ झालेला काळा चित्ता आणि अनेक प्रकारच्या वनौषधींना या प्रदेशाने सांभाळले आहे. येथील पाणीही नानाविध वनौषधींच्या मुळांना स्पर्शून येणारे. त्यामुळे येथील अधिवास दुर्गम असला तरी येथील रहिवाशांचे जगणे समृद्ध करणारा होता.

आजऱ्याच्या जंगलझाडीत वर्षानुवर्षे पारंपरिक आणि पर्यावरणपूरक चाललेली शेती, ही शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचे निसर्गसंवेदन लेखक चित्रित करतो. चित्री परिसर आणि पर्यावरणाचे प्रारंभी लेखक चित्रण करताना सूक्ष्म तपशील देतो. ते असे. 'चित्री कोल्हापूर जिल्ह्यातील आजरा तालुक्यातील हिरण्यकेशी नदीची उपनदी. कोल्हापूर सिंधुदुर्गच्या सरहद्दीवर नांगरतासच्या घनदाट जंगलात उगम पावणारी, सह्याद्रीच्या घाटमाथ्यावर अति कोसळणाऱ्या पावसाचं पाणी वाहून नेणारी, आजूबाजूला पसरलेल्या घनदाट जंगलातून वाट काढत काढत तीव्र उतारावरून अवंडी गावाजवळून सपाटीच्या दिशेने झेपावणारी, हिरण्यकेशीच्या ओढीनं जांभ्या खडकातून खळाळत पुढे आजरा गावाजवळ हिरण्यकेशीत स्वतःला समर्पित करणारी ही छोटीशी नदी. डाव्या हाताला आंबोलीपासून आजऱ्यापर्यंत पसरलेली चाळोबाची डोंगररांग, तिच्यापलीकडे आंबोलीतून आलेली हिरण्यकेशी तर उजव्या हाताला तारओहोळीला कुशीत घेऊन जाणारी खेतोबाची गर्द हिरवी डोंगररांग.' यातून या परिसराचे आणि पर्यावरणाचे चित्र वाचकांसमोर उभे राहते.

चित्री आणि आजरा परिसर हा निसर्गाने आणि जैवविविधतेने समृद्ध असा परिसर याचे सूक्ष्म चित्रण लेखक या पुस्तकात करतो. चित्री नदीचे खोरे म्हणजे एक समृद्ध पर्यावरणीय वारसा होता. ही नदी घनदाट व जिवंत जंगलामधून वाहते. अनेक बारमाही वाहणारे ओहळ या नदीला मिळतात. बारमाही पाणी उपलब्ध असल्यामुळे शेकडो प्रकारचे वृक्ष, दुर्मीळ पशुपक्षी या जंगलात पहावयास मिळतात. वड, पिंपळ, ऐन, किंजळ, बहावा, पळस, खैर, हिरडा, आवळा, नाना, जांभूळ, सावर, पांगिरा, सिसम शिकेकाई, साग या अशा सदाबहार डेरेदार वृक्षांबरोबरच बकरा, कारवी, नरक्या अशी वनौषधी आणि तमालपत्री, मिरी हे मसाल्याचे पदार्थ येथे मिळतात. येथील जंगलात चितळ, गवे, रानडुक्कर, हरण, सांबर, अस्वल, ससे, शेकरू, तसेच बिबट्या, वाघ, काळा चित्ता यांचे दर्शन घडते. शेकरूसारख्या (महाराष्ट्राचा राज्यप्राणी) दुर्मीळ प्राण्याला चित्रीच्या काठावरील समृद्ध जंगलानेच जीवदान दिलेले. येथे राहणाऱ्या लोकांची निसर्गाशी घट्ट मैत्री आहे. विशेषतः घनदाट जंगलात राहणारे गाई म्हशी पाळणारे डंगे धनगर खऱ्या अर्थाने निसर्गपुत्र आहेत. इथले पर्यावरण त्यांच्यासाठी त्यांचे जीवन आहे. या पर्यावरणाची हानी होऊ नये यासाठी ते काळजी घेतात. त्यांच्या वाडवडिलांनी शेती करण्यासाठी झाडे झुडपे तोडून साफसफाई करून शेती विकसित केली होती. नंतरच्या पिढ्यांनी शेतीपर्यंत नैसर्गिकरित्या पाणी आणले आणि बागायती शेती केली. दरवर्षी आडव्या पाटाची छोटी छोटी धरणे बांधली. जंगलाशी सलगी करत, जंगलातल्या काटक्या-कुटक्या गोळा करीत, जंगलात मिळणारा मध, फळं गोळा करीत निसर्गाबरोबरच स्वतःला समृद्ध करीत हे लोक जगताना दिसतात. आजऱ्याचा पश्चिम भाग मनाला भूरळ घालतो. इथला धुवांधार पडणारा पाऊस चेरापुंजीची आठवण करून देतो. गर्द झाडीत लपलेली छोटी छोटी गावं कडक उन्हाळात सुखद गारवा देतात. आजऱ्याचा गर्द झाडीत कोसळणारा रामतीर्थ धबधबा मनाला सुखावून टाकतो. पावसाळ्यात रामतीर्थचं सौंदर्य खूलन येते. याचं वर्णन लेखक खुबीने करतो, 'पावसाळ्याच्या दिवसात तर रामतीर्थाचं सौंदर्य खुलून येतं. एखाद्या अवखळ तरुणीसारखी हिरण्यकेशी उधाणत येते. कोसळणाऱ्या पावसाचं पाणी घेऊन आंबोलीपासून येणारी हिरण्यकेशी इथं रौद्र रूप धारण करते. काळ्या कातळातून फेसाळत ती स्वतःला खोल दरीत झोकून देते. आजूबाजूच्या गर्द झाडीत तिचा आवाज भरून राहतो. पावसाळा सरला की ती थोडी शांत होते. तिचा रंग बदलतो. काळ्या कातळाचा खोल काळेपणा तिच्यामध्ये येतो. प्रौढ, प्रगल्भ बाईसारखी ती धीरगंभीर होते.

आंबोलीपासून पूर्वेकडे वाहणारी हिरण्यकेशी इथे दक्षिणेकडे वळते. दुपारच्या वेळी धबधब्यातून कोसळणाऱ्या पाण्याला सूर्याच्या किरणांमुळे पिवळी किनार येते. माध्यान्हीचा सूर्य डोक्यावर आला की तिचं सौंदर्य अधिकच खुलतं.

मसोलीपासून आंबोलीपर्यंत चाळोबाची डोंगररांग. मसोली आणि हाळोलीच्या डोक्यावर चाळोबाचं उंच शिखर. गर्द झाडीतून आकाशाच्या दिशेनं झेपावणारं. घनदाट जंगल पार करून शिखरावर आलं की आख्खा तालुका नजरेत भरतो. दक्षिणेला चित्रीचं खोरं तर उत्तरेला हिरण्यकेशी. चाळोबाचं शिखर म्हणजे टेहळणीची चौकीच. सामानगड आणि भुदरगडाला शत्रूच्या धोक्याचा इशारा देण्याचं ठिकाण म्हणजे चाळोबा. तारओहळला जन्माला घालणारी खेतोबाची रांग चित्रीच्या पलीकडे. दाट झाडीत वसलेलं खेतोबाचं ठाणं माणसाला मोहिनी घालतं. त्याला आपल्या रोजच्या कटकटी काही काळ विसरायला लावतं.

पश्चिमेला आजऱ्याची हद्द जिथे संपते तिथेच नांगरतासचा धबधबा. नांगरीच्या तासाइतकाच पाण्याचा प्रवाह खोल भेगाळलेल्या खडकात कोसळून वेगाने वाहत जाणारा. पुढे गडदूवाडीजवळ हिरण्यकेशीत मिसळणारा. तिथंच पलीकडे गर्द झाडीत लपलेलं किटवडे हे गाव. आजऱ्यातील नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातील सर्वाधिक कोसळणाऱ्या पावसाचं गाव. महाराष्ट्राची चेरापुंजी. सिंधुदुर्गमधले गेळे आणि किटवडे यांच्यामध्ये कावळेसाद हे पर्यटकांना कायम साद घालणारं ठिकाण. महाबळेश्वरच्या ऑर्थर पॉइंटची आठवण करून देणारं. घोड्याच्या नालेसारखी खोल दरी. पावसाळ्यात खोल दरीत स्वतःला झोकून देणारे पांढरेशुभ्र निर्झर. खोल दरीतून रोरावत वेगाने वर वर सरकणारे धुक्याचे लोट. खोल दरीतून वर वेगाने वाहणारे वारे कोसळणाऱ्या निर्झराला घेऊन वर उसळणारे, कोसळणारे निर्झर कारंज्याच्या रूपात दरीतून पुन्हा वर येणारे, मध्येच ढगाआडून सूर्याची किरणं दरीत पडली की कारंज्याच्या सप्तरंगी धनुकल्या बनतात. निसर्गाच्या या अप्रतिम रूपानं माणूस वेडावून जातो.'

समृद्ध अशा पर्यावरणाबद्दल लेखक आपुलकीने आणि जिव्हाळ्याने पुस्तकात लिहतो.' जे मातीशी झटतात, जे पिकांशी बोलतात असे राबणारे हातच निसर्गाचा समतोल राखू शकतात. तीच माणसं निसर्गाचा आदर करू शकतात. इथल्या राबणाऱ्या माणसांनीच निसर्गाचा हा समृद्ध ठेवा जपून ठेवला. चित्रीच्या खोऱ्यातील या संवादी आणि निसर्गगामी मानवी संबंधामुळे ना कधी जंगली प्राणी मानवाच्या आड आले की ना कधी इथला माणूस जंगली प्राण्यांच्या आड आला. निसर्ग आणि माणूस, जंगली प्राणी आणि कुणबी, कुणबी आणि गवळी धनगर यांनी परस्परपूरक अशी जीवनरीत इथे विकसित केली.'

### ३.८ नैतिकता आणि दृष्टीकोन

नैतिकता अशा नैतिक मूल्यांनी बनलेली व्यवस्था आहे. माणसाच्या स्वभावाला आणि जीवनाला आकार देत असते. नैतिकतेमुळे व्यक्ती प्रामाणिकपणे जगू शकते आणि आपल्या भोवतालच्या लोकांप्रति विश्वासाची भावना दृढ करून मैत्रिपूर्ण संबंध प्रस्थापित करू शकते. नैतिकता ही यशाची गुरूकिल्ली आहे. 'एका लोकलढ्याची यशोगाथा' या संपत देसाई यांच्या अनुभवकथनामध्ये देसाई यांच्या ठिकाणी असणारी नैतिकता आणि त्यांचा चळवळीकडे आणि लोकलढ्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन याचा विचार आपल्याला करता येतो. कोल्हापूर जिल्ह्यात, आजरा तालुक्यातील चित्री या गावात धरण बांधले जात आहे. यातूनच येथील भुमीपुत्रांचा पुनर्वसनासाठी संघर्ष सुरू झाला. या लढ्याचे लेखक संपत देसाई एक बिनीचे शिलेदार. हा लढा त्यांनी आणि त्यांच्या साथीदारांनी यशस्वीपणे लढला. या यशस्वी संघर्षाचा इतिहास म्हणजे 'एका लोकलढ्याची यशोगाथा'! ही एक चळवळ नाही तर सर्वसामान्य लोकांना जगण्यासाठी बळ देणारी कथा आहे. या अनुभवकथनाची सुरुवात होते ती धरणाच्या काठावर. लेखक आपल्या पत्नी आणि मुलीसह धरणावर फिरावयास गेलेले असताना

संघर्षाचा सगळा काळ त्यांच्या डोळ्यासमोर तराळतो. आणि इतिहासाचा सारा संघर्षपट उलगडत गोष्टीची सुरुवात होते. हा सारा लोकलढा लेखक शब्दबद्ध करतो. ही लोकलढ्याची यशोगाथा शब्दबद्ध करताना लेखकाच्या ठिकाणी असणाऱ्या नैतिकतेचे दर्शन पुस्तक वाचले की वाचकास होते.

लेखक संपत देसाई धरणग्रस्तांच्या लोकलढ्याची यशोगाथा कथन करताना फक्त एक लेखक म्हणून सर्व गोष्टींचे कथन करत नाही. तर तो लोकलढ्याच्या निमित्ताने आजुबाजूच्या पर्यावयरणाचा आणि काळावकाशाचा प्रामाणिकपणे धांडोळा घेतो. लेखकाला हाच लोकलढा एका कादंबरीच्या माध्यमातून मांडता आला असता. अधिक तपशील घटना-प्रसंगांना अधिक रंजक करून सांगता आले असते. पण देसाई तसे करत नाहीत. जे घडले आहे ते स्वतःचा विवेक जागृत ठेवून मांडणी करतो. संपूर्ण पुस्तक वाचले की जाणवते की ती महत्त्वाची गोष्ट ही की लेखक यशोगाथा कथन करताना कुठेही स्वतःविषयी किंवा स्वतःच्या जीवनाविषी अधिक भाष्य करत नाही. तर तो आपल्या आजुबाजूच्या लोकलढ्यादरम्यान झालेल्या घटनाप्रसंगाविषयी, चळवळीविषयी आणि त्याला पुरक अशा घटना-प्रसंगाचे चित्रण करतो. येथेच लेखकाची नैतिकता आणि लेखकाचा लेखनाप्रतीचा दृष्टीकोन दिसून येतो. पुस्तकाच्या प्रारंभी लेखक धरण होण्यापूर्वीचा चित्रीची नैसर्गिक संपन्नता आणि आजरा परिसराची सामाजिक, सांस्कृतिक आणि भौगोलिक अवकाशाची मांडणी करतो. इथल्या समृद्ध निसर्गाविषयी, इथला डंगे धनगर आणि कुणबी शेतकरी याविषयी मनात असणाऱ्या भावना प्रतिबिंबित करताना दिसतो. कारण लेखकाला फक्त चळवळ, आंदोलन, लढा, मोर्चा याविषयी सांगायची नाही तर यापरिसराविषयी भाष्य करावयाचे आहे.

महाराष्ट्रात चित्रीसारखे अनेक प्रकल्प उभे राहिले आणि राहत आहेत. यामागे अनेक गोष्टी काम करताना दिसून येतात. अशा प्रकल्पामुळे अनेकांची आयुष्य मातीमोल झाली आहेत. प्रकल्पामुळे विकास होतो, समृद्धी येते या सर्व गोष्टी बरोबर आहेत. पण त्या प्रकल्पामध्ये बाधित झालेल्या हजारो लोकांचे काय? असे अनेक प्रश्न समोर उभे राहतात. अशा पाश्वभूमीवर संपत देसाई यांनी उभारलेला चित्रीचा हा लोकलढा ‘आधी पुनर्वसन आणि मगच धरण’ हा दृष्टीकोन समोर ठेवून लढला गेला. संपत देसाई धरणग्रस्तांच्या चळवळीमध्ये सक्रीय कार्य करणारे कार्यकर्ते. पूर्णवेळ चळवळीसाठी देऊन लेखन करणे आणि ते पूर्णत्वास नेणे ही खूप कठीण काम त्यांनी केले. लोकलढ्याची यशोगाथा अनुभवकथन करताना त्यांचे अस्सल कार्यकर्तेपण शब्दाशब्दातून प्रतिबिंबित झाले आहे. ही कहाणी सांगताना आजूबाजूचे सामाजिक संदर्भ, आर्थिक, सांस्कृतिक बांबीकडे तटस्थपणे पाहून ते अचूकपणे मांडल्यामुळे ते एक लोकलढ्याची, धरणग्रस्तांच्या चळवळीची कहाणी राहत नाही तर तो एका कालखंडाचा दस्तऐवज बनतो. आजवरचे आजरा परिसराचे सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय जीवन अगदी वस्तुनिष्ठपणे आपल्यासमोर ठेवतो. लेखकाच्या ठिकाणी असलेल्या नैतिकतेमुळे प्रामाणिकपणे काही गोष्टी नमुद करतो. ' खोलात जाऊन कधी कुठलं राजकारण समजून घेतलं नव्हतं. अन्यायाच्या विरोधात भांडायचे एवढेचं आम्हाला कळायचं. राडा करायला आवडायचं.' आपल्याला या लढ्यात मदत करणारे मित्र, सहकारी, ज्येष्ठ मार्गदर्शक यांच्याप्रती नेहमी कृतज्ञता भाव व्यक्त करताना लेखक दिसून येतो.

कोणताही लढा किंवा एखादी चळवळ म्हटली की त्यात 'फुटीरतावादी' बीजे पेरण्याचे किंवा तो लढा मोडून काढण्यासाठीचे षडयंत्र शासकीय यंत्रणेकडून केले जाते. स्थानिक नेतृत्वाला सोबत घेऊन, विविध आमिषे दाखवून, दबाव टाकून, भिती दाखवून लढा मोडून काढण्याचा अनेकवेळा प्रयत्न केला जातो. आणि त्याला यशही येते. असे अनेकादा होते. चित्रीच्या लढ्याच्या संदर्भातही असे प्रयत्न होतात; परंतु वैचारिक भूमिकेवर ठाम असलेले नेते असले की अशा गोष्टीना थारा नसतो. नेतृत्वाच्या या निष्कलंक वर्तणुकीचा अप्रत्यक्ष परिणाम लोकांवर आणि पर्यायाने चळवळीवर, लढ्यावर होत असतो. म्हणूनच लढ्याचे नेतृत्त्व ज्यावेळी वैचारिकदृष्ट्या

खंबीर असते तेव्हा अशा घटना घडून येत नाहीत. आपल्या आदर्श आणि निष्कलंक वर्तनातून चळवळीने निर्माण केलेला विश्वास संघर्षाला बळ देतो. चित्रीच्या लढ्याबाबतसुद्धा हेच घडतं. चळवळीतील कार्यकर्त्यांचे निष्कलंक वर्तन लोकांच्यात विश्वास निर्माण करते आणि लढा ध्येयप्राप्तीपर्यंत पोहोचतो. हे चळवळीचे यश आहे. लेखक संपत देसाई यांच्या बाबतीत आपल्या हेच म्हणता येईल. त्यांच्या ठिकाणी असणारी नैतिकता आणि योग्य असा दृष्टीकोन यामुळे हा लढा यशस्वी झाला असे म्हणता येईल.

**३.९ शब्दार्थ व स्पष्टीकरण :**

रोंबाट -आजरा परिसरातील गावांमध्ये शिमग्याच्या सणात गावातील मुख्य चौकात वर्षभर घडलेल्या बऱ्या वाईट घटनांची जाहीर चर्चा केली जाते. त्याला रोंबाट म्हणतात.

भूवड- सामुदायिकरित्या परंपरा म्हणून शिकारीसाठी रान उठविणे

कुणबी - कोरडवाहू शेती करणारे लोक

डंगे धनगर - घनदाट जंगलात राहणारे धनगर

घळभरणी- नदीचे पाणी अडवून साठविण्यासाठी घातलेले घातलेले मातीचे बांध

देवराई - देवाच्या नावाने राखून ठेवलेले जंगल

**३.१० स्वाध्याय :**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१. आजरेकर फडाची स्थापना ……….. यांनी केली.

अ)बाबासाहेब आजरेकर ब)नानासाहेब आजरेकर क)बाबासाहे पोवार ड)बाबासाहेब पेरणोलीकर

२. राजाभाऊनी आजऱ्याच्या दुर्गम भागात ………. नावाची एनजीओ सुरू केली.

अ)ग्रामविकास ब)आरोग्यसाथी क) सेहत ड) निर्मिती ज्ञानपीठ

३. चित्री कोल्हापूर जिल्ह्यातील आजरा तालुक्यातील ………….. नदीची उपनदी आहे.

अ)ताम्रपर्णी ब) हिरण्यकेशी क) गोदावरी ड)घटप्रभा

४. ………. हे आजरा परिसरातील अनेक गावांचं ग्रामदैवत आहे.

अ)शंकर ब)भूतोबा क) रवळनाथ ड) भैरवनाथ

५. गावाकडील मित्रांना सोबत घेऊन संपत देसाई यांनी …………… स्थापना केली.

अ) आजरा परिषद ब) आजरा युवाशक्ती क) आजरा राष्टसेवा ड) आजरा युवा मंच

**उत्तरे -** १- अ)बाबासाहेब आजरेकर, २- ड) निर्मिती ज्ञानपीठ, ३- ब) हिरण्यकेशी, ४- क) रवळनाथ, ५- ड) आजरा युवा मंच

**ब) दीर्घोत्तरी प्रश्न (१५ गुण)**

१. एका लोकलढ्याची यशोगाथा मधील व्यक्तिरेखांचा परिचय करून द्या.

२. एका लोकलढ्याची यशोगाथा मधील लेखक संपत देसाई यांचे व्यक्तिचित्र रेखाटा.

३. एका लोकलढ्याची यशोगाथा मधील समाज आणि संस्कृतीचे स्वरूप स्पष्ट करा.

**क) लघुत्तरी प्रश्न (१० गुण)**

१. एका लोकलढ्याची यशोगाथा लेखकाची नैतिकता आणि दृष्टीकोन स्पष्ट करा.

२. एका लोकलढ्याची यशोगाथामधून प्रतिबिंबित होणाऱ्या आजरा परिसराच्या पर्यावरणाचे स्वरूप स्पष्ट करा.

३. एका लोकलढ्याची यशोगाथामध्ये चित्रित झालेल्या संस्कृतिचे वेगळेपण सांगा

**ड) टीपा (१० गुण)**

१. चव्हाटा, शिमगा आणि रोंबाट

२. कॉ. धनाजी गुरव

३. डॉ. भारत पाटणकर

**३.११ संदर्भ ग्रंथ**

१. पानसरे, मेघा; मोरे, नंदकुमार (संपा) : महाराष्ट्र : काही प्रश्न आणि आंदोलने, श्रमिक प्रतिष्ठान, कोल्हापूर, २०२४.

२. भोळे, भा.ल.; बेडकीहाळ, किशोर (संपा) : बदलता महाराष्ट्र, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अकादमी, सातारा.

३. मोकाशी, सयाजीराजे (संपा) : महाराष्ट्रातील लोकचळवळी, नागनालंदा प्रकाशन, इस्लामपूर २०१८.

४. मुक्त शब्द, नोव्हेंबर-डिसेंबर, दिवाळी अंक, मुलाखत, संवादक-एकनाथ पाटील, २०२४.

# विभाग ४.

# ‘एका लोकलढ्याची यशोगाथा’ आकृतिबंध

# लेखनशैली व भाषिक विशेष


४.१ उद्दिष्टे

४.२ प्रास्ताविक

४.३ विषय विवेचन

४.३.१ एका लोकलढ्याची शोधयात्रा - आकृतीबंध

४.४ ‘एका लोकलढ्याची यशोगाथा’ - लेखनशैली

४.४.१ एका लोकलढ्याची यशोगाथा- कथन व्यवस्था

४.४.२ वर्णनशैली

४.४.३ प्रसंगचित्रण -

४.४.४ चित्रमयशैली

४.४.५संवादात्मकता

४.४.६ तपशीलबहुलता

४.५ एका लोकलढ्याची यशोगाथा - भाषिक विशेष

४.५.१ आखूड वाक्यबंधाचा वापर

४.५.२ समर्पक शब्दयोजना

४.५.३ बोलीभाषेचा वापर

४.६ शब्दार्थ व स्पष्टीकरण :

४.७ स्वाध्याय :

**४.१ उद्दिष्टे (Objectives) :**

'एका लोकलढ्याची यशोगाथा' हे पुस्तक अभ्यासल्यानंतर आपणास

१. या पुस्तकाचा आकृतिबंध लक्षात येईल.

२. या पुस्तकाची निर्मितीप्रक्रिया समजून येइल.

३. या पुस्तकातून लेखकाची लेखनशैलीचे वेगळेपण लक्षात येईल.

४. या पुस्तकातील भाषिक सामर्थे समजून येतील.

५. धरणग्रस्तांचा लढा, संघर्ष याचे संवेदनविश्व भाषेच्या माध्यमातून लक्षात येईल.

**४.२ प्रास्ताविक**

'एका लोकलढ्याची शोधयात्रा' हे संपत देसाई यांचे पुस्तक म्हणजे धरणग्रस्तांच्या चळवळीवर बेतलेले हे अनुभवकथन आहे. एका धरणप्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या धरणग्रस्तांच्या लढ्याचे कथन म्हणजे हे पुस्तक आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील चित्री मध्यम प्रकल्पातील विस्तापित लोकांच्या लढ्याची गोष्ट तर आहेच शिवाय संपत देसाई यांनी चळवळीला दिलेल्या योगदानाची संघर्षाची कहाणी आहे. धरणग्रस्तांच्यासाठी आजवर अनेक लढे उभारले गेले. पण सर्वच लढे यशस्वी होतात असे नाही. पण चित्रीचा लढा यशस्वी झाला त्यामुळे या लढ्याची कहाणी यशोगाथा ठरते. या लोकलढ्याचे बिनीचे शिलेदार स्वतः लेखक संपत देसाई आहेत. वाडीवस्तीत राहणाऱ्या अशिक्षित लोकांना त्यांनी चळवळीसाठी उभे केले, आपल्या न्याय हक्कांसाठी लढण्याची उर्मी लोकांच्यात निर्माण केली. अशा लोकलढ्याचे अनुभवकथन देसाई यांनी या पुस्तकातून केले आहे. विद्यार्थीमित्रहो या पुस्तकाच्या आकृतीबंधाविषयी आणि लेखनशैलीविषयी, भाषाशैलीविषयी प्रस्तत घटकात आपण चर्चा करणार आहोत.

**४.३ विषय विवेचन**

एका लोकलढ्याची शोधयात्रा या संपत देसाई यांच्या अनुभवकनाचा आकृतीबंध आणि लेखनशैली तसेच भाषिक विशेषांचा अभ्यास प्रस्तुत घटकात करावयाचा आहे. हा अभ्यास आपण या पुस्तकाचा आकृतिबंध आणि त्याचे स्वरूप कसे आहे. तसेच लेखकाच्या लेखनशैलीविषयी कथनव्यवस्था, निवेदन, वर्णनचित्रण, प्रसंगचित्रण, चित्रमयशैली, तपशीलबहुलता या अनुषंगाने मांडणी करावयाची आहे. तसेच या घटकामध्ये पुस्तकाचे आशयविश्व कथन आणि भाषेतून कसे आकार घेते याचा अभ्यास करावयाचा आहे. याबरोबरच संपत देसाई यांनी लोकलढ्याच्या निमित्ताने उभे केलेले चळवळीचे, संघर्षाचे अनोखे विश्वही विस्ताराने अभ्यासावयाचे आहे.

**४.३.१ एका लोकलढ्याची शोधयात्रा - आकृतीबंध**

मानवी जीवनामध्ये आकाराला असे महत्त्वाचे स्थान आहे. तसेच मानवाने निर्माण केलेल्या विविध कला पाहिल्या तर त्यामध्ये आकाराचे स्थान अनन्यासधारण असल्याचे दिसते. कोणत्याही कलांचा आकार हा त्यांच्या अस्तित्वाचा पुरावा असतो. आकाराशिवाय वस्तूंचे अस्तित्वच प्रतीत होऊ शकत नाही. मानवाने आपल्या अभिव्यक्तीसाठी निर्माण केलेल्या साहित्य या कलेचेही असेच आहे. साहित्यामध्ये प्रामुख्याने कथा, कादंबरी, नाटक, कविता हे प्रमुख प्रकार येतात. या साहित्यातील प्रत्येक प्रकाराला विशिष्ट असा घाट, आकृतीबंध

असलेला पहावयास मिळतो. प्रस्तुत ठिकाणी आपण या पुस्तकाच्या आकृतीबंधाची संकल्पनेचा थोडक्यात विचार करणार आहोत.

आकृतिबंध किंवा घाट हा शब्द आपल्याकडे इंग्रजीतील Form या शब्दावरून मराठी साहित्यामध्ये आला आहे. मराठी साहित्यामध्ये आकृतीबंध या शब्दाला वेगवेगळ्या संज्ञा आहेत. त्यामध्ये घाट, आकार, सौष्ठव, रूपबंध, बांधणी या संज्ञाचा मुख्यत्वे समावेश होतो. यासंदर्भात वेगवेगळ्या अभ्यासकांनी मांडणी केली आहे. द.ग.गोडसे यांनी विशिष्ट जागेत करण्यात आलेली उभ्या, आडव्या धाग्यांची वीण म्हणजे पोत होय. तर रा. भा. पाटणकर यांनी आशय व अभिव्यक्ती असे विभाज केल्यास अभिव्यक्तीला फॉर्म म्हणणे योग्य ठरते. असे मत नोंदविलेले आहे. या आणि अन्य काही अभ्यासकांचा मतांचा विचार केला तर असे दिसते आकृतिबंध संकल्पनेत आशय, अभिव्यक्ती आणि आविष्कार हे घटक महत्त्वाचे ठरतात. कारण आशयाशिवाय आविष्कार, आविष्काराशिवाय अभिव्यक्ती आणि अभिव्यक्तीशिवाय कलाकृतीला अंतीम घाट, रूप प्राप्त होत नाही. त्यामुळे आपल्याला असे म्हणता येईल की, आशय आणि अभिव्यती यांची पेरणी झाल्यानंतर जे उगवून येते, त्यास आकृतीबंध म्हणावे.

‘एका लोकलढ्याच यशोगाथा’ हे संपत देसाई यांचे अनुभवकथन आहे. मराठी साहित्यातील वेगवेगळ्या आकृतींबधाचा विचार करता, हा ललित गद्याकडे आणि आत्मकथनाकडे जाणारा आकृतीबंध आहे. प्रकल्पग्रस्तांच्या चळवळीसाठी आणि हक्कासाठी उभारलेला लढा आणि त्याचे साक्षीदार म्हणून त्या आठवणी लेखक आठवणींच्या रूपाने कथन करतो. ‘धरणाच्या काठावर’ या पहिल्या भागातच लेखक या लोकलढ्याची, आणि त्याच्या संघर्षाची कहाणी सांगायला सुरूवात करतो. ‘मधेच ऐ दगड मुक्ताने चित्रीच्या जलाशयात भिरकावला. ‘डुबुक’ अशा आवाजाबरोबर शांत जलाशयावर तरंग उमटत गेले. खोल जलाशयात प्रतिबिंबित झालेल्या झाडांच्या डोंगररांगाच्या प्रतिमा काही काळ डचमळल्या. आनंदाने टाळ्या वाजवून मुक्ता नाचू लागली. तिने पुन्हा दगड उचलला पुन्हा फेकला. प्रतिबिंबित झालेल्या प्रतिमा पुन्हा डचमळल्या. ती आता हे पुन्हा पुन्हा करू लागली. माझ्या मनातही आठवणींचे तरंग उमटून गेले. चित्री, तिचा खळाळ, तिच्यावर बांधलेले धरण, बंधाऱ्यात आलेले सालेपण, मातीत गाडलेली, पाण्यात बुडलेली विस्थापितांची गावं, त्यांनी केलेला पुनर्वसनाचा यशस्वी संघर्ष, सारा भूतकाळ आठवत गेला, नकळत पुनर्वसनाचा सारा संघर्षपट माझ्यासमोर उलगडत गेला….’ अशी आपल्या अनुभवकथनाची सुरूवात लेखक करतो. ही खरे तर एक कहाणी आहे. जी भूतकाळात होऊन गेली आहे. त्याचा साक्षीदार स्वतः लेखक आहे. त्याची मांडणी लेखक येथे करतो. लेखक या लोकलढ्याचा बिनीचा शिलेदार असल्याने या लोकलढ्याची सर्व हकीकत, घटना, प्रसंग त्याने पाहिलेले आहेत. त्यामुळे त्याची मांडणी तो प्रामाणिकपणे करतो. हे सर्व घटना प्रसंग मांडताना लेखक लालित्यपूर्ण भाषेचा किंवा अनेक घटना प्रसंगाची सरमिसळ कुठे करताना दिसत नाही. कारण जे घडलं आहे पाहिलं आहे तेवढचं सांगण्याचं काम लेखक करतो.

खरे तर हे एक वृत्तांतकथन आहे पण त्याला आपण वृत्तांतकथन म्हणून शकत नाही. कारण ही यशोगाथा मांडताना लेखक फक्त धरणग्रस्तांचा लोकलढा, आंदोलने, सभा, मोर्चा या गोष्टींची नोंद घेत नाही. तर त्यापलिकडे जाऊन लेखक अनेक गोष्टी कथन करतो. ज्या भागात हा लोकलढा उभा केला आहे. तो परिसर त्या परिसराची सामाजिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक, भौगोलिक, राजकीय पार्श्वभूमी कथन करतो. त्यामुळे हे फक्त

लोकलढ्याचे वृत्तांतकथन राहत नाही तर ते एकाचवेळी समष्टीच्या अनेक गोष्टी वाचकांसमोर उभं करतं. त्यामुळे ते अनुभवकथन ठरतं. आजरा परिसराविषयी, धरणग्रस्त गावांविषयी, तिथल्या लोकांविषयी, आंदोलनातील कार्यकर्त्यांविषयी लेखक आत्मियतेने सांगू लागतो त्यावेळी त्यावेळी ते अनुभव लेखकाचे राहत नाहीत तर समष्टीचे होतात. हेच या अनुभवकथनाचे श्रेष्ठत्व आहे.

लेखक संपत देसाई यांच्या 'एका लोकलढ्याच्या यशोगाथा' या पुस्तकामध्ये 'मी' फारसा येत नाही. अगदी काही मोजक्या ठिकाणी लेखक स्वतःविषयी, स्वतःच्या आयुष्याविषयी कथन करताना दिसतो. सुरवातीचा कॉलेजजीवनातील काही आठवणी आणि शेवटी लग्नासंबंधीचा प्रसंग सोडले तर लेखक स्वतःविषयी लेखनात फारेस भाष्य करत नाही. मुळात लेखकासाठी या गोष्टी गौण आहेत. कारण लेखकाला हा लोकांचा संघर्ष, लोकलढा कथन करायचा आहे. त्यामुळ प्रस्तुत ठिकाणी 'स्व' चे प्रतिबिंब कमी दिसून येते. लेखकाला लोकलढ्याच्या निमित्ताने आलेल्या अनुभवांची एक साखळी वाचकांसमोर मांडतो. ही कहाणी सांगताना लेखक अनेक छोटे मोठे प्रसंग, घटना, तपशील, स्थलवर्णने, व्यक्तीवर्णने यांची मांडणी निवेदनाच्या माध्यमातून करतो आणि आत्मकथनासारखा, ललितगद्यासारखा घाट लेखनाला प्राप्त करून देतो. लेखक संपत देसाई यांनी आठवणींच्या रूपाने मांडलेले अनुभवकथन हाच या कलाकृतीचा आकृतिबंध आहे असे म्हणावे लागेल.

### ४.४ 'एका लोकलढ्याची यशोगाथा' - लेखनशैली

'एका लोकलढ्याची यशोगाथा' हे संपत देसाई यांचे अनुभवकथन आहे. या पुस्तकाच्या लेखनैशलीविषयी प्रस्तुत घटकात विचार करावयाचा आहे. प्रारंभी लेखनशैलीविषयी थोडा विचार करू. साहित्य कोणत्याही भाषेतील असो. साहित्याची भाषा आणि लेखनशैली ह्या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत. साहित्यातील शैली ही एखाद्या साहित्यकृतीला, एखाद्या साहित्यप्रकाराला, एखाद्या कालखंडातील साहित्याला किंवा एखाद्या प्रदेशातील साहित्याला आणि विशेष म्हणजे एखाद्या लेखकाला वेगळेपणा प्राप्त करून देणारा घटक आहे. म्हणूनच म.द. हातकणंगलेकर म्हणतात त्याप्रमाणे "आधुनिक साहित्यात शैलीचे महत्त्व सापेक्ष आहे. शैलीची जाणीव अधिक जागृत झालेली आहे. शैलीचा स्वतंत्रपणे विचार करता येतो. शैली ही केवळ भाषेशी संबंधित नाही. शैली म्हणजे केवळ अलंकरण नव्हे. शैलीचा संबंध अनुभवाचे संकलन, विषयाचे आकलन, कलाकृतीची रचना, आकृतिबंध, आविष्काराची रीत, आस्वादाचीही रीत यांच्याशी लावता येतो..." इत्यादी घटकांचा संबंध शैलीशी येतो. एकूणच कलाकृतीला प्राप्त होणारे वेगळेपण म्हणजे रूप, भाषारचना, आकृतीबंध, संरचना अशा घटकांचे वेगळेपण साहित्यकृतीला शैलीमुळे प्राप्त होते. कलावंताची कल्पनीय अनुभव घेण्याची पद्धती म्हणजे त्या लेखकाची लेखनशैली होय. कलाकृतीला अस्तित्त्व, वेगळी ओळख ही लेखनशैलीमुळे प्राप्त होते असे मानले जाते. म्हणजे एका लेखकाची, एका काळाची, एका प्रवाहाची स्वतंत्र शैली निर्माण होऊ शकते. प्रस्तुत पुस्तकाचा लेखनशैलीचा विचार प्रामुख्याने आपणास कथनव्यवस्था, निवेदन, वर्णनचित्रण, प्रसंगचित्रण, चित्रमयशैली, संघर्षचित्रण या आविष्कारघटकाच्या अनुषंगाने करावयाचा आहे. या अभ्यास घटकामध्ये प्रस्तुत पुस्तक वरील मुद्यांचा विचार करता कसे वैशिष्ट्यपूर्ण ठरते याचे विश्लेषण करावयाचे आहे.

### ४.४.१ एका लोकलढ्याची यशोगाथा- कथन व्यवस्था

एका लोकलढ्याची यशोगाथा संपत देसाई यांनी धरणग्रस्तांच्या चळवळीविषयीचे अनुभवकथन आहे. आजरा परीसरातील धरणग्रस्तांच्या हक्कासाठी दिलेल्या लढ्याची कहाणी या पुस्तकात देसाई यांनी कथन केली आहे. हे पुस्तक कथनाच्या माध्यमातून आविष्कृत होते. या लढ्याची गोष्ट संपत देसाई सांगतात. त्यालाच निवेदक अथवा कथनकर्ता असे संबोधले जाते. या ठिकाणी संपत देसाई या लोकलढ्याची कहाणी सांगण्याचे काम करतात. हे काम फक्त आपल्याला आलेले अनुभवकथन करणे इतके मर्यादित नसते तर अनुभवांची आंतरिक जुळणी करणे, आपल्या सुसंगत अशा भाषेतून वाचकांशी संवाद साधणे, अनुभव आणि स्वतःचे संबंध स्पष्ट करणे, आपल्या सांगण्याला वैचारिक भूमिका प्राप्त करून देणे. यासारखी कार्येही निवेदकाकडून केली जातात. यावरून अनुभव कथनाची अथवा निवदेनाची प्रक्रिया ही कथन, वर्णन, भाष्य करणे आणि संवाद याद्वारे चालत असते. लेखक नेहमी आशयानुसार या कथनप्रकाराचा वापर करत असतो.

कथन अथवा निवेदन हे प्रामुख्याने प्रथमपुरुषी, तृतीयपुरुषी स्वरूपाचे असते. जेव्हा कथेतील पात्र स्वतः निवेदन करत असते, घटना प्रसंग स्वतः सांगत असते त्यावेळी ते प्रथम पुरुषी निवेदन असते. याउलट निवेदक बऱ्याचदा त्या कथेतील गोष्टीतील पात्र नसतो, तो कथेतील सर्व घटना, प्रसंग त्रयस्थासारखा बाहेरून कथन करत असतो. त्यावेळी ते तृतीय पुरुषी निवेदन असते.

एका लोकलढ्याची यशोगाथा हे संपत देसाई यांचे अनुभवकथन मुळात एक गोष्ट आहे. धरणग्रस्तांनी दिलेल्या चळवळीचा लढा आणि त्यांना आलेल्या यशाची यशोगाथा आहे. या पुस्तकाचा मी हा स्वतः लेखक नायक आहे. तो त्रयस्थपणे आपल्याला आलेल्या आठवणीचे, अनुभवांचे कथन करतो. हे अनुभवकथन लेखकाने स्वतःशी प्रामाणिक राहून, तटस्थपणे केलेले आहे. या पुस्तकात लेखकाचे स्वतःची जीवन फार कमी आले आहे. चळवळ आणि चळवळीशी निगडीत असणाऱ्या अनेक घटना प्रसंगाचे निवेदन लेखक करताना दिसतो. आपल्या विवेकी दृष्टीतून आपल्याला आलेल्या अनुभवांची मांडणी लेखक करताना दिसतो. या अनुभवकथनाच्या प्रारंभी भाग एकमधील येणारा पुढील पाहता येईल.

‘पावसाळा नुकताच सरलेला. सुगी उंबरठ्यावर आलेली. गर्द काळोखं हिरवेपण डोंगर झाडीत भरून राहिलेलं. निरभ्र मोकळं आकाश आणि सायंकाळची कोवळी किरणं यामुळे वातावरण अधिकच आल्हाददायक होतं. मी, माझी लेक मुक्ता आणि मनिषा (माझी पत्नी) बाबुदाच्या गावी निघालो होतो. बाबुदाचं गाव म्हणजे चित्री धरणाच्या पलीकडे डोंगराच्या पायथ्याला वसलेली, आठ-दहा घरांची, विखुरलेली डंगे धनगरांची छोटीशी वस्ती.

त्याच्या पुढे दाट झाडीत आणखी दोन वस्त्या. सरकार दप्तरी वाडा क्रमांक दोन व तीन अशी त्यांची नोंद. तर बाबुदाच्या वाड्याची वाडा क्रमांक एक अशी नोंद; पण आख्खा तालुका मात्र याला बाबुदाचा वाडा म्हणूनच ओळखायचा. चित्रीच्या धरणाने अवंडी गाव पूर्ण विस्थापित झालेलं. कुणब्यांची वस्ती आता आजऱ्याच्या उशावर येऊन वसलेली. डंगे धनगरांच्या वस्त्या मात्र तिथंच निसर्गासोबत आपलं नातं जपत मूळ ठिकाणी राहिलेल्या.

बदलत्या जगाबरोबर त्याही आता आपलं रुपडं बदलू लागलेल्या. चळवळीच्या संघर्षातून चाळोबाच्या पायथ्यानं आणि धरणाच्या काठाकाठानं पक्का रस्ता बाबुदाच्या वाड्यापर्यंत आलेला. एका बाजूला चित्रीचा जलायश तर दुसऱ्या बाजूला चाळोबाची घनदाट बारी. यामधून जाणारा रस्ता पर्यटकांना खुणावणारा. अधूनमधून

तरुण पोरापोरींची टोळकी धरणाच्या काठाकाठानं पार बाबुदाच्या वाड्यापर्यंत पोहोचत. मोबाइलची रिंग आता वाड्यावरच्या प्रत्येक खोपटात खणखणाय लागलेली. रस्त्याबरोबर अनेक बऱ्या-वाईट गोष्टीही आता बाबुदाच्या वाड्यापर्यंत येऊन पोहोचलेल्या.

आम्ही भिंतीवरून चालत चालत उजव्या तीरावर आलो. भिंतीलगतच उजव्या तीरावरच गावठाणवाडी उठून आजरा-बेळगाव रस्त्यावर बुरुड्याच्या माळावर वसलेली. सुरुंगाच्या हादऱ्यानं कणा मोडलेलं गाव नव्या गावात ताठ कण्यानं उभं राहिलेलं. जुन्या घरांच्या मातीच्या ढिगाऱ्यावर झुडपं वाढलेली. तेवढ्याच काय त्या गावठाणवाडीच्या अस्तित्वाच्या खुणा शिल्लक राहिलेल्या. धरणाच्या पाण्यानं अवंडीला पुरतं वेढलेलं. रामलिंगाची देवराई मात्र अवंडीचं अस्तित्व राखून होती. गावातल्या चुली आता कायमच्या थंडावलेल्या. रोज सकाळ-संध्याकाळी घराघरात चुली पेटल्या की गर्द झाडीत लपलेली अवंडी आपली ओळख दाखवून द्यायची. गर्द हिरव्या डोंगरझाडीतून तुटलेली अवंडी आता आजरा शहराचं उपनगर बनलेली.

रायवाड्याच्या अस्तित्वाच्या मात्र काहीच खाणाखुणा इथे दिसत नव्हत्या. धरणाच्या भिंतीत रायवाडा गाव पुरतं गाडलेलं. धरणाची भिंत रायवाड्याच्या उरावर उभी राहिलेली. धरणाच्या खालच्या बाजूला चार-दोन शेतकऱ्यांच्या जमिनीचे तुकडे राहिलेले. तेवढीच काय ती रायवाड्याची ओळख आता बाकी राहिलेली. मातीत पुरलेलं हे छोटं गाव चाळोबाची डोंगररांग जिथं संपते तिथं वसलेलं. खानापूरच्या गायरानात गाडलेल्या बीजातून जसे कोंब तरारून यावेत तसं तरारून आलेलं.

मधेच एक दगड मुक्ताने चित्रीच्या जलाशयात भिरकवला. 'डुबुक' अशा आवाजाबरोबर शांत जलाशयावर तरंग उमटत गेले. खोल जलाशयात प्रतिबिंबित झालेल्या झाडांच्या डोंगररांगाच्या प्रतिमा काही काळ डचमळल्या. आनंदाने टाळ्या वाजवून मुक्ता नाचू लागली. तिने पुन्हा दगड उचलला पुन्हा फेकला. प्रतिबिंबित झालेल्या प्रतिमा पुन्हा डचमळल्या. ती आता हे पुन्हा पुन्हा करू लागली. माझ्या मनातही आठवणींचे असंख्य तरंग उमटून गेले. चित्री, तिचा खळाळ, तिच्यावर बांधलेले धरण, बंधाऱ्यात आलेले साचलेपण, मातीत गाडलेली, पाण्यात बुडलेली विस्थापितांची गावं, त्यांनी केलेला पुनर्वसनाचा यशस्वी संघर्ष. सारा भूतकाळ आठवत गेला, नकळत पुनर्वसनाच्या इतिहासाचा सारा संघर्षपट माझ्यासमोर उलगडत गेला...'(पृ.१३-१४) वरील सर्व भाग पाहिला का लेखकाला पुनर्वसनाच्या इतिहास आठवतो. प्रारंभी या निमित्ताने पुढील सर्व घटनाप्रसंगाची वातावरणनिर्मिती करतो. आठवणींच्या रूपानं लेखक ही यशोगाथा पुढे कथन करतो.

धरणग्रस्तांच्या लढ्याच्या निमित्ताने अनेक मोर्चे आणि आणि आंदोलने याचे निवेदन लेखक अनेक ठिकाणी करतो. 'पाच वाजले, घरी परत जायला बैलगाड्या जुंपल्या. लोक गावकडे घोषणा देत परतले. मोर्चा परतला. नवं बळ, नवी ऊर्जा लोकांना मिळाली. लोकांची छाती गवनि अधिकच फुलली. शेपटीचे गोंडे वर करून बैलगाड्या सुसाट गावाकडे निघाल्या. आम्ही सगळे कार्यकर्ते मोर्चा संपवून दावल मलिक दर्यावर आलो. दावल मलिकचा दर्गा हे आमच्या बैठकांचं ठिकाण झालं होतं. चळवळीच्या बऱ्याच बैठका आता इथं व्हायच्या. मोर्च्यांचा आढावा घेतला. पुढे काय करायचं ते ठरविलं आणि आम्ही उठलो.'(पृ.८०) अशा स्वरूपाचे अनेक प्रसंग, घटना लेखकन निवेदनाच्या माध्यमातून कथन करतो. हेच या पुस्तकाचे मोठे सामर्थ्य आहे. कारण एखाद्या गोष्टीसारखे हे कथन वाचकांची उत्सुकता वाढविण्यास मदत करते.

### ४.४.२ वर्णनशैली

वर्णनशैली हा संपत देसाई यांच्या एका लोकलढ्याची यशोगाथा या अनुभवकथनाचा महत्त्वाचा विशेष आहे. या अनुभवकथनाची अनेक प्रसंग, घटना पाहिले की, लेखकाची साधी सोपी वर्णनशैली वाचकांना वेगळी अनुभूती देऊन जाते. आजरा परिसराचे प्रारंभी लेखकाने कलेले वर्णन अभ्यासण्यासारखे आहे. 'चित्रीच्या

काठाकाठाने वस्ती करून राहणाऱ्या या भागातील कष्टकरी स्त्री-पुरुषांची इथल्या निसर्गाशी पुरातन दोस्ती. चित्रीच्या उगमाकडे सह्याद्रीच्या घनदाट जंगलाच्या कुशीत गाई-म्हशी पाळणाऱ्या डंगे धनगरांची वस्ती. जंगलाशी सलगी करत, जंगलातल्या काटक्या-कुटक्या गोळा करीत, जंगलात मिळणारा मध, फळं गोळा करीत निसर्गाबरोबरच स्वतःला समृद्ध करीत हे लोक जगत आलेले. चित्रीच्या काठावरील धनगरवाडे म्हणजे दह्या-दुधाचे आगरच. एका एका कुटुंबात खंडी-दोन खंडी गाई- म्हशी. तितक्याच शेळया मेंढ्याही. दिवसभर गाई-म्हशीच्या सोबतीनं जंगलात फिरणारा डंगे गवळी धनगर म्हणजे निसर्गाचा खराखुरा सोबती.

'मातीनं लिंपलेल्या कारवीच्या कुडाच्या भिंती, वर गवती छप्पर असलेला लांबलचक मांगोर म्हणजेच डंगे गवळी धनगरांचं घर. मांगोराच्या सभोवताली लाकडी कुंपण. त्यात गाई-म्हशी मोकळेपणानं हिंडणाऱ्या. झडीच्या पावसात कायम ढणढणणारी, माणसासह गुरा-ढोरांनाही उब देणारी, तिथंच एका कोपऱ्यात लावलेली चूल. कोणताही डामडौल नाही की उधळपट्टी नाही. घर म्हणजे उन, पाऊस, वारा आणि थंडीपासून संरक्षण इतकाच काय तो घराचा अर्थ. गुरं, ढोरं, पोरं आणि माणसं सगळीच एकत्र. निसर्गाचा इतका माफक आणि गरजेपुरता वापर थक्कच करणारा. निसर्गाच्या सोबतीनं राहताना घरांची रचनासुद्धा निसर्गाला कमीत कमी इजा होईल अशा रीतीनंच केलेली. त्यांची ही घरं म्हणजे नैसर्गिक एअरकूलरच. झडीच्या पावसात आणि हिवाळ्यात उब देणारी तर तापणाऱ्या उन्हातही गारवा देणारी.' (पृ.१७-१८) वरील उतारे पाहिले की, लेखकाची वर्णनशैली ध्यानात येते. यामुळे तो परिसर वाचकांसमोर उभा राहतो. त्या परिसराची वैशिष्ट्ये वाचकांच्या सहज लक्षात येतात. तेसच लेखकाच्या लेखनातील सूक्ष्म दृष्टीकोन लक्षात येतात. बारीकसारीक अनेक गोष्टींचे तपशील लेखक आपल्या अनुभवातून मांडत जातो. ही लेखकाची जमेची बाजू लेखनात दिसून येते. याबरोबरच लेखकाने रामतीर्थ, पेरणोली, परिसरातील छोटे छोटे धनगर वाडे, खेतोबा, चाळोबाची डोंगररांग यांची वर्णने येतातच. त्याचबरोबर धरणग्रस्तांची आंदोलने, चळवळी यांची वर्णनेही वाचकांना अधिक आकर्षित करते. याची आणखी काही उदाहरणे पाहता येतील.

'तळकोकणाशी ही गावं जास्त जवळची. इथले उत्सवसुद्धा तळकोकणासारखेच. इथंही दहीकाल्याचा उत्सव जोरात. गावच्या बाहेर जंगलालगत गर्द राईत रामलिंगाचं कौलारू मंदिर. रात्रभर इथंच राईत दहीकाला रंगायचा. दशावतार नाटक व्हायचं.'(पृ.८१)

'मुळात डंगे धनगर म्हणजे डंगात राहणारा धनगर. डंग म्हणजे घनदाट आणि किर्रर जंगल. सह्याद्रीच्या डोंगरकपारीत यांच्या हजारो वस्त्या. घनदाट जंगल, विस्तीर्ण पसरलेले सडे, मुबलक चारा, बारमाही वाहणाऱ्या जिवंत ओहळी, यामुळं गुरं पाळण्याचा पारंपरिक व्यवसाय पिढ्यान्पिढ्या जपलेला. प्रत्येक कुटुंबामागे खंडी-दोन खंडी जनावरं. अवंडी, मोरेवाडी, चितळे, किटवडे, पेरणोली या गावांशेजारी धनगरांच्या आठ दहा वस्त्या. गाई-म्हैशी आणि दह्या दुधानं समृद्ध असणारे धनगरवाडे आता ओस पडत चाललेले. कुठेतरी एखादंदुसरं जनावर तग धरून राहिलेलं.'(पृ.९६)

'सह्याद्रीच्या पठारावर जांभ्या खडकात वसलेलं तालुक्याच्या पश्चिम टोकावरचं हे गावच्या अलीकडं रामलिंगाची गर्द हिरवी देवराई. वेशीत जाईपर्यंत गावं कसलं ते है एक देखणं गावं. दिसायचं नाही. उंच उंच झाडीत लपलेली छोटी छोटी कौलारू घरं. घरासमोरची अंगणे स्वच्छ शेणानं सारवलेली. एकदा का पावसाला सुरुवात झाली की गाव अडगळीत पडायचं. पाऊस धो धो कोसळायचा. आंबोलीत उगम पावणारी हिरण्यकेशी पावसाळ्यात दुथडी भरून व्हायची. गावाला बेटाचं स्वरूप यायचं.' (पृ.९७) तसेच लेखकाने रोंबाट, चव्हाट्याचं केलेलं वर्णनही वाचनीय असे आहे. सांस्कृतिकदृष्ट्या संपन्न परिसराचे तसेच निसर्गासोबत जैविक नात्यातून फुललेली संस्कृतीचे विविधांगी दर्शन घडवताना लेखकाची वर्णनशैली अधिक सकस बनते.

लेखक संपत देसाई यांनी लिहिलेल्या एका लोकलढ्याची यशोगाथा या अनुभवकथनामध्ये प्रामुख्याने धरणग्रस्तांचे आंदोलन, आणि लढा यासंदर्भात अधिक तपशील आले आहेत. तरीही या सर्व गोष्टी सांगताना लेखकाने आजरा आणि आजुबाजुच्या परीसराची, निसर्गाची, स्थळांच्या वर्णनामधून परिसर जिवंत केला आहे. ही सर्व वर्णनांचे अनुभवकथन लेखकाने प्रमाणभाषेत केली आहेत तरीही अनुभवकथनाची परिणामकारकता कुठेही कमी झाली नाही हेच त्यांच्या लेखनशैलीचे विशेष होय.

**४.४.३ प्रसंगचित्रण -**

'एका लोकलढ्याची यशोगाथा' या संपत देसाई यांच्या अनुभवकथनामध्ये अनेक प्रसंग प्रेरणा देणारे असे आहेत. हे अनुभवकथन असल्याने या पुस्तकातील बहुतेक अनेक प्रसंग हे धरणग्रस्तांचा पुनर्वसनाचा लढा, आंदोलने, चळवळ, सभा, मिटींग, प्रशासन आणि आंदोलक यांतील संघर्ष यावर बेतलेले आहेत. पोलिस प्रशासन आणि शासकीय यंत्रणा ज्यावेळी रायवाडा उठवण्यासाठी येतात त्यावेळी गावकरी आणि प्रशासन यांच्यात टोकाचा संघर्ष होतो. कारण लोकांना त्यांच्या लाभक्षेत्राच्या जमीनींचा ताबा मिळालेला नसतो. नव्या वसाहतींची कामे अपूर्ण असतात. अशावेळी लोकांना आणि आंदोलकांना न जुमानता पोलिस आणि पाटबंधारे खात्याचे अधिकारी रायवाडा उठविण्यासाठी येतात त्यावेळी गावातील सर्व पुरूष, पोरं, बायका प्रशासनासमोर उभे ठाकतात. त्यातील बायामाणसं पुढे होतात आणि 'पहिल्यांदा मशनरी आमच्या अंगावर घाला मगच घरावर चालवा.' असं म्हणून बाया आडव्या होतात. त्यावेळी प्रकरण हाताबाहेर जाते असे वाटल्यावर पोलिस मशनरी मागे घ्यायला लावतात. या प्रसंगाबद्दल लेखकाला रायवाडा हे 'पुरून उरलेलं गाव' असे वाटते.

लढ्याच्या निमित्ताने लोक जोडले जातात. त्यांच्या सभा आयोजित केल्या जातात. शासकीय यंत्रणांना तोंड दिले जाते. आंदोलने केली जातात. प्रकल्पठिकाणी येणाऱ्या अधिकाऱ्यांना पळवून लावले जाते. जिल्हाधिकाऱ्यांना कार्यालयात कोंडून ठेवले जाते. अशा ठिकाणचे अनेक प्रसंग लेखकाने आपल्या अनुभवकथनात सांगितले आहेत. रायवाडा सोडतानाचा प्रसंग वाचकाना अस्वस्थ करतो. 'आता आपल्याला गाव सोडावं लागणार याची खूणगाठ मनाशी बांधून लोक तयारीला लागलेले. २२ एप्रिलला गुढीपाडवा लोकांनी आपल्या गावात शेवटचा साजरा केला. दुसऱ्या दिवशी आवराआवर केली आणि २४ एप्रिलला रायवाड्यातील एक एक घर निखळू लागलं. तसं बरंचसं सामान लोकांनी पूर्वीच हलवलेलं. घरावरच्या खापऱ्या आणि काय असेल ते लाकूडसामान एवढंच शिल्लक राहिलेलं. कायद्याप्रमाणे एका कुटुंबाला पसारा हलवाय तीन वाहनांची सोय. पाटबंधारे खात्याने तीही केलेली. लोकांनी जुन्या घराचं सामान, जनावरांची वैरण, जळण जे काही किडूकमिडूक होतं ते सगळं भरून रायवाडा सोडला.

सामान भरतानाच गळ्याशी आलेला हुंदका बायांनी कसातरी आवरून धरलेला. सामान भरलं, गाड्या हलल्या अन् बायांचा बांध फुटला. एकमेकीच्या गळयात गळा घालून त्या ओक्साबोक्शी रडू लागल्या. आपल्या आयाबहिणी का रडतात ते लहान पोरांना कळेना. ती गोंधळलेली. नव्या गावाची नव्या घराची ओढ त्यांना लागलेली. इतकी वर्षे या परिसरातल्या निसर्गाशी, इथल्या मातीशी, नदीनाल्यांशी, चाळोबाच्या बारीशी जपलेलं नातं आता कायमचं संपणार होतं. मुळापासून उन्मळून पडलेल्या झाडासारखी अवस्था आज रायवाड्याची झालेली. पुरुष गडी स्वतःला सावरत डोळ्यांत पाणी न आणता आतल्या आत रडू लागलेले.'(पृ. १३०) अशा प्रसंगामधून लेखकाच्या सर्जनशीलतेचा आणि लेखनशैलाचा अनोखा प्रत्यय वाचकांना येतो. याबरोबरच घळभरणीचा प्रसंग, धरणग्रस्तांना अटक करून कळंबा जेलला घेऊन जाण्याचा प्रसंग, त्यातील घटना लेखकाने

प्रत्यकारीपणे रेखाटल्या आहेत. आवंडीकरांचे ठिय्या आंदोलन, लेखकाच्या लग्नाचे प्रसंग यासारख्या प्रसंगानी हा लोकलढा अधिक वाचनीय होतो. या अशा अनेक प्रसंगामधून धरणग्रस्तांच्या ठिकाणी असलेली एकजूट, हक्कासाठी लढा देणे, हा लढा देताना अंगी धैर्य, धरणात गेलेल्या जमीनी आणि नवीन घरे जोपर्यंत मिळत नाही तो पर्यंत संघर्ष करत राहणे. असा प्रेरणा देणारा देस्तऐवज या प्रसंगामधून वाचकांच्यासमोर येतो. यासंदर्भात नंदकुमार मोरे म्हणतात, 'लहान प्रसंगामधून प्रकल्पग्रस्तांना संस्काराच्या ज्या गोष्टी सांगितल्या जात, त्या त्यांना माणूस म्हणून उन्नत करणाऱ्या होत्या. चळवळीच्या नेत्यांबरोबरच राजशिष्टाचार बाजूला ठेवून भेटायला येणारे कलेक्टर, प्रांताधिकारी आणि इतर काही अधिकारी अशा साऱ्यांनीच या चळवळीतील लोकांना काही ना काही शिकवल आहे.' ही एक मोठी प्रेरणा या लढ्याची यशोगाथा वाचकांसमोर ठेवते.

### ४.४.४ चित्रमयशैली

संपत देसाई यांच्या 'एका लोकलढ्याची यशोगाथा' या अनुभवकनाचा सर्वात मोठा विशेष कोणता असेल तर त्याची चित्रमयशैली होय. देसाई धरणग्रस्तांच्या लढ्याची कहाणी आठवणींच्या रूपाने मांडतात. हे अनुभव मांडताना त्यांची ठिकाणी असणारी सर्जनशीलता प्रत्ययास येते. या लढ्याच्या निमित्ताने अनेक घटना, प्रसंग लेखकाने सांगितले आहेत. हे घटनाप्रसंग वाचकांसाठी नवीन आहेत. महाराष्ट्रात यासारखी अनेक आंदोलने, चळवळी झाल्या आहेत. पण या सर्वात हा लोकलढा वैशिष्टपूर्ण असा आहे. या लोकलढ्याने सर्वांसमोर एक नवा आदर्श उभा केला. एक नवा विचार दिला. याचे प्रत्यंतर वाचकाला येते. या लोकलढ्याचे वाचन करताना अनेक छोटे मोठे प्रसंग वाचकाच्या डोळयासमोर उभे राहतात. हे संपत देसाई यांच्या लेखनातील वेगळेपण अधोरेखित होते.

संपत देसाई यांच्या प्रस्तुत पुस्तकामधून चित्रमयशैलीचा प्रभावीपणे प्रत्यय येताना दिसतो. एका लोकलढ्याची यशोगाथा वाचताना छोट्या मोठ्या घटना प्रसंगाचे वाचकांच्या मना विशिष्ट चित्रे, दृश्ये आणि भावना निर्माण होतात. या लेखनशैलीत शब्दांचा वापर केवळ विचारांची अभिव्यक्ती करण्यासाठी येत नाही तर वाचकाला यामुळे सजीवन जिवंत अनुभव देण्यासाठी होतो. वाचकासमोर एका दृश्याचे, संवेदनांचे किंवा वातावरणाचे सजीव चित्र उभे राहते. हे देसाई यांच्या लेखनाचे वैशिष्टय ठरते. प्रत्यक्ष पुस्तकातील काही उतारे उदाहरणे म्हणून पाहता यतील.

'आम्ही तिघेही धरणाच्या भिंतीवर आलो. चित्रीचं सारं खोरं नजरेच्या टापूत येत होतं. इटे, देऊळवाडीपासून पार आजऱ्यापर्यंतचा सारा शिवार भिंतीवरून दिसत होता. धरणाच्या खालच्या बाजूला दूरवर पसरलेली भाताची शेती आपला रंग बदलत होती. हिरव्या-पिवळया रंगांची भातशेती पायऱ्यापायऱ्यांनी चित्रीच्या पात्रात उतरत होती. तर वरच्या बाजूला चित्रीचं पाणी डोंगराच्या पायाला स्पर्श करीत आत खोलवर जंगलात घुसलेलं. पाण्याने वेढा दिल्याने छोट्या टेकड्यांची बेटं तयार झालेली.'

'आम्ही भिंतीवरून चालत चालत उजव्या तीरावर आलो. भिंतीलगतच उजव्या तीरावरच गावठाणवाडी उठून आजरा-बेळगाव रस्त्यावर बुरुड्याच्या माळावर वसलेली. सुरुंगाच्या हादऱ्यानं कणा मोडलेलं गाव नव्या गावात ताठ कण्यानं उभं राहिलेलं. जुन्या घरांच्या मातीच्या ढिगाऱ्यावर झुडपं वाढलेली. तेवढ्याच काय त्या गावठाणवाडीच्या अस्तित्वाच्या खुणा शिल्लक राहिलेल्या. धरणाच्या पाण्यानं अवंडीला पुरतं वेढलेलं. रामलिंगाची देवराई मात्र अवंडीचं अस्तित्व राखून होती. गावातल्या चुली आता कायमच्या थंडावलेल्या. रोज सकाळ-संध्याकाळी घराघरात चुली पेटल्या की गर्द झाडीत लपलेली अवंडी आपली ओळख दाखवून द्यायची. गर्द हिरव्या डोंगरझाडीतून तुटलेली अवंडी आता आजरा शहराचं उपनगर बनलेली.'

'रायवाड्याच्या अस्तित्वाच्या मात्र काहीच खाणाखुणा इथे दिसत नव्हत्या. धरणाच्या भिंतीत रायवाडा गाव पुरतं गाडलेलं. धरणाची भिंत रायवाड्याच्या उरावर उभी राहिलेली. धरणाच्या खालच्या बाजूला चार-दोन शेतकऱ्यांच्या जमिनीचे तुकडे राहिलेले. तेवढीच काय ती रायवाड्याची ओळख आता बाकी राहिलेली. मातीत पुरलेलं हे छोटं गाव चाळोबाची डोंगररांग जिथं संपते तिथं वसलेलं. खानापूरच्या गायरानात गाडलेल्या बीजातून जसे कोंब तरारून यावेत तसं तरारून आलेलं.'(पृ.१४ )

उपरोक्त उतारे वाचले की वाचकाच्या समोर लेखकाने अनुभवलेला सारा परिसर दृश्यरूपाने डोळ्यासमोर उभा राहतो. धरणाची भिंत, धरणावरून दिसणारी भात शेती, चित्रीचं पाणी, गावठाणवाडी,जुन्या घरांच्या मातीच्या ढिगाऱ्यावर वाढलेली झुडपं, रामलिंगाची देवराई, चाळोबाची डोंगररांग या सर्व परिसराचे चित्र वाचकाच्या न कळत डोळ्यासमोर उभे राहते. 'अवंडी' चित्रीच्या डाव्या तीरावर खालच्या धनगरवाड्याच्या जवळ जंगलाच्या गर्भात उंचावर वसलेलं गाव. गावात जातानाच उजव्या हाताला गावाच्या पायथ्याला ग्रामदैवत रामलिंगाचं कौलारू मंदिर. मंदिरालगत घनदाट देवराई. थोडंसं चढ चढून वर आलं की डाव्या हाताला लिंगायत वतनदारांची हवेलीसारखी टुमदार घरं. पुढं चढ चढून वर आलं की कुणबी शेतकरी, शेतमजुरांची कौलारू खापऱ्यांची आणि गवती छप्पराची छोटी छोटी घरं. गावात आलं की एखादा गड चढून आल्यासारखं वाटायचं. गावात उभं राहिलं की सगळं चित्रीचं खोरं नजरेच्या टापूत यायचं. जांभ्या खडकावर पोसलेल्या उंचच उंच वाढलेल्या आंबा, फणस आणि माडाच्या झाडांमुळे तर अवंडी एखाद्या हिल स्टेशनसारखी वाटायची.' (पृ.२३)

हा उतारा वाचला की कधीही न पाहिलेली अवंडी दृश्यरूपाने वाचकांच्या डोळ्यासमोर उभी राहते. प्रस्तुत पुस्तकामध्ये आंदोलनाची आणि चळवळीच्या निमित्ताने अनेक छोटे प्रसंग लेखकाने कथन केले आहेत. त्यामध्ये 'दुपारी बारा वाजता गावातल्या सगळ्या बैलगाड्या घेऊन चाफवडे, जेऊरचे लोक आले. प्रचंड तणावात बैलगाड्यांसह मोर्चा निघाला. बैलगाड्या घेऊन निघालेला आजऱ्यातला हा पहिलाच मोर्चा. आजऱ्याची बाजारपेठ मोर्चा बघून अचंबित होत होती. "उचंगी धरण रद्द... झालेच पाहिजे" "यात्रेत दारू पिऊन दंगा करणाऱ्या अधिकाऱ्यांना अटक... झालीच पाहिजे." अशा घोषणा देत मोर्चा पोलीस स्टेशनवर आला. पोलीस स्टेशनच्या आवारात आणि समोरच्या रस्त्यावरच लोकांनी बैलगाड्या सोडल्या. मोर्चाला प्रचंड संख्येने आलेले लोक आणि बैलगाड्यांमुळे पोलिसांची भलतीच तारांबळ उडाली.'(पृ.७९) हा उतारा वाचताना वाचकांसमोर मोर्चाचे चित्र उभे राहते. 'पूर्वेकडे तोंड करून बांधलेलं लांबलचक दुपाकी घर, घराच्या मागे गर्द हिरवे अवंडीचे घनदाट जंगल. घराच्या समोर घराएवढाच मांडव, गवतानं झाकलेला. मांडवाखालची जमीन स्वच्छ शेणानं सारवलेली. घराच्या उजव्या हाताला डोंगरातून पाइपने आणलेलं पाणी बाराता(मा)स वाहाणारं. त्याच पाण्यावर फुललेली केळीची बाग आणि उसाचा मळा. काकडी, कोबी, टोमॅटो, मिरची यासारखं माळवंही फुलवलेलं.'(पृ.१२१) किंवा 'डोक्याला मुंडासे, अंगात काचोळा आणि लंगोट लावलेला एक धिप्पाड गडी आम्हाला बघून लगबगीनं पुढं आला. उन्हात रापलेला रुंद काळा चेहरा, त्यावर पांढऱ्याशुभ्र झुपकेदार मिशा आणि कानात बाळी घातलेला हा गडी साठीकडं झुकलेला क्षणभर जंगलचा राजाच वाटला.'(पृ.९७) सारख्या वर्णनामधून वाचकासमोर छोट्या धनगरवाड्याचे आणि तिथल्या धनगराचे सचित्र डोळ्यासमोर उभे राहते. याबरोबरच रोंबाट, शिमगा, चव्हाटा याची लेखकाने केलेली वर्णने दृश्यरूपाने आपल्यासमोर उभी राहतात. तिथंच दोन काठ्या उभ्या केल्या. काठीला पडदा बांधला. क्षणातच रंगमंच तयार झाला. नेपथ्य नावाचा प्रकारच नाही. कलावंत आणि प्रेक्षकांत फारसं अंतरच नाही. हलगी चढली, डफावर थाप पडली आणि एका सुरात रोंबाट सुरू झालं.

"अवंडी गाव सुंदर.... आम्ही राहतो आजऱ्याच्यावर।
भवताली गर्द डोंगर.... चित्री नदीच्या तीरावर

अवंडी गाव सुंदर........... ।"

अशा अनेक प्रसंगांमधून आणि वर्णनामधून लेखक संपत देसाई यांनी चित्रमयतेचा प्रत्यय वाचकांना दिला. हे त्यांच्या लेखनशैलीचे महत्त्वाचे आणि वेगळे वैशिष्ट्य आहे असे म्हणावे लागेल.

**४.४.५संवादात्मकता**

कथनपर साहित्याचे महत्त्वाचे वैशिष्ट्ये कोणते असेल तर ते संवाद होय. कथनपर साहित्यात वर्णनपरतेबरोबर संवादालाही विशेष महत्त्व असते. अर्थात वाङ्मयप्रकारांनुसार संवादाचे स्वरूपही वेगळे असते. तसेच स्व संवाद, पात्रा पात्रांमधील संवाद, समूहसंवाद, जनसंवाद अशा वेगवेगळ्या पातळ्यांवर कलावकृतींमध्ये संवाद घडत असतो. या संवादाच्या माध्यमातूनच कथानक आकार घेत असते. कथानकाचा विस्तृत पट वाचकांसमोर उभा करण्याचे काम संवादातून पूर्ण होत असते. 'एका लोकलढ्याची यशोगाथा' या अनुभवकथनाचा विचार करता तपशीलवर्णनाबरोबरच संवादात्मकताही तितकीच महत्त्वाची ठरली आहे. या पुस्तकामध्ये वर्णनपरता, पात्रे अधिक आहे. संवाद तुलनेने कमी आहेत. ते सहाजिकच आहे. कारण हे पुस्तक अनुभवकथन आहे. प्रत्यक्षात घडलेल्या लोकलढ्याचे आठवणीच्या रूपाने मांडलेले कथन आहे. त्यामुळे कादंबरीसारखे, कथेसारखे संवाद या पुस्तकात येत नाहीत. पण काही ठिकाणी प्रसंगाच्या अनुषंगाने संवाद आले आहेत. शिवाय संपूर्ण अनुभवकथन हे संपत देसाई यांनी स्वतःशी केलेला स्व संवादाच आहे. याची काही उदाहरणे पाहू.

उचंगीच्या धरणावर सर्व्हेसाठी आले असताना 'मी माझ्या बायकोचं कुंकू पुसून आलोय' असं काय काय तहसीलदार बडबडून आले होते. तो मुद्दा घेऊन कॉम्रेड धनाजीनं एकदमच हल्ला चढविला. परिषदेला जेवढे पुरुष त्याच्या दुपटीनं स्त्रिया होत्या. त्यांच्याकडे पाहत धनाजी म्हणाला, तहसीलदारसाहेब "तुम्ही तुमच्या बायकोचं कुंकू पुसून आलाय पण आम्ही आमचं कुंकू तर सोबतच घेऊन आलोय." धनाजीच्या या वाक्यानं तरुण पोरांनी जोरदार घोषणाबाजी केली. (पृ.५९)

कॉ. डॉ. भारत पाटणकरांनी एका सभेच्या दरम्यान आंदोलकांशी केलेला संवाद असा,

लाभक्षेत्रातल्या काही पुढाऱ्यांनी चळवळीच्या कार्यकर्त्यांना 'उपरे' असे म्हटलेले. तोच धागा पकडून डॉ. भारत पाटणकरांनी स्थानिक पुढाऱ्यांना सडकून काढले.

ते म्हणाले, "जो माणूस कष्ट करतो, ज्याच्या हातावर घट्टा आहे त्याची आणि आमची जात एक आहे. त्याची आणि आमची भावकी एक आहे. त्यामुळे या देशात कष्टकरी माणसं न्याय्य हक्कासाठी जिथं जिथं लढायला उभी राहतात तिथं तिथं आम्ही जाणार. कारण ती आमची परंपरा आहे. या देशाच्या स्वातंत्र्यासाठी ज्यांनी रक्त सांडलं त्यांचे आम्ही वारसदार आहोत. त्यांचाच वसा पुढे घेऊन जात आहोत."

असे म्हणत ज्या डिसोझा या पुढाऱ्यानं टीका केली होती त्यांना उद्देशून डॉक्टर पुढे म्हणाले, "अहो डिसोझा, आम्हांला उपरं म्हणताना आमचं आडनाव बघा. ते या मातीतलं हाय पण तुमचं आडनावही परदेशातून आयात केलेलं हाय. निदान याचं तरी भान ठेवा."(पृ.६०)

गावातून बाहेर पडताना घरातून भाकरी बांधूनच बाहेर पडायचं ही रायवाडेकरांची सवय. बैठकीला निघण्यापूर्वी त्यांनी तिथंच कोपऱ्यात श्रमिकवर भाकरी सोडल्या. कोणाची काय चौकशी नाही की कुणाला काय खाणार म्हणून विचारलं नाही. डॉक्टरांनी ते पाहिलं. ते गालातच हसले. त्यांनी खुणेनंच एकाला जवळ बोलाविलं. त्याला काय कळंना, भाकरीच्या कपड्याला हात पुसत तो डॉक्टरांजवळ गेला.

"रिकामा न्हवं भाकरी घेऊन ये. आम्हीपण उपाशीच हाय."

डॉक्टरांच्या बोलण्यानं तो फारच खजील झाला. स्वतःला सावरत तो म्हणाला, "आम्हाला वाटलं तुम्ही आमच्यातली भाकरी कशी खाणार? म्हणून नाय विचारलं."
"तुम्ही आणि आम्ही काय वेगळं हाय व्हय? आण त्यातली भाकरी इकडं..." डॉक्टरांनी असे म्हणताच तो बघतच राहिला. भाकरी तर खाऊन संपवलेली. गडी ओशाळला. त्याची अडचण डॉक्टरांच्या लक्षात आली.
"राहू दे घे आम्ही जेवलोय, परतच्या वेळी खाऊ तुझी भाकरी."(पृ.६२)
आम्हाला पाहताच बाबूदाची बायको लगबगीनं पाणी घेऊन बाहेर आली. पायावर पाणी घेऊन मी बाबुदादाच्या घरात आलो. वहिनीनं चहा देत बाबुदादाला विचारलं,
"बाजार आणला का ?"
मला वाटलं आज शुक्रवार, आजऱ्याचा बाजारचा दिवस, बाबुदादाला बाजार आणाय सांगितला असेल, पण तेवढ्यात बाबुदादाच म्हणाला,
"मी कंदी बाजार आणतुया, तूच तर आणतीस न्हवं."
"घरचा नव्हं काकानुंचा." वहिनी हळूच म्हणली.
बाबुदादा काय समजायचं ते समजला. तो म्हणाला, "काकानुसनी तसला बाजार चालत नाय."
त्या दोघांचं बोलणं मला काहीच समजेना. मी गोंधळून बाबुदादाकडे पाहिलं. (पृ.१२२ )
कळत नकळत संवादातून प्रकटणारी ही भाष्यात्मकता लेखकाची जीवनदृष्टी प्रकट करते. तसेच मानवी वर्तनव्यवहारावर प्रकाश टाकते. एकूणच अनुभवकथनाच्या, संवादाच्या ओघात आलेली ही वाक्ये आशयाला अधिक मूल्यगर्भ बनवतात.

**४.४.६ तपशीलबहुलता**

'एका लोकलढ्याची यशोगाथा' या संपत देसाई यांच्या अनुभवकथनामध्ये अनेक तपशील येतात. धरणग्रस्तांच्या हक्कासाठी उभारलेल्या लढ्याचे अनुभवकथन करताना तपशीलवर्णन येणे सहाजिकच आहे. त्याशिवाय ते अनुभव अधिक सकस होणार नाहीत. उलट तपशीलवर्णनामुळेच कथनातील आशयाला बळकटी मिळाली आहे. अशा तपशीलबहुल शैलीमुळे लेखक पात्रे आणि भोवतालचा अवकाश वाचकांसमोर दृश्यरूपात उभा करू शकला आहे. अनुभवकथनातील पात्रांच्या, निवेदकाच्या मनः स्थितीचा अंदाज येतो. तसेच अर्थनिर्णयासाठी हे तपशील पूरक ठरतात. या पुस्तकातील चळवळीला सुरूवात या विभागात आजरा परिसराचे, तिथल्या समाजिक, राजकीय, धार्मिक आणि सांस्कृतिक, अवकाशाचे अनेक तपशील येतात. ते आशयाला पुरक असेच आहेत. लेखक पुढे ज्या गोष्टींचे अनुभव कथन करतो त्याची पार्श्वभूमी म्हणून ते आलेले दिसून येतात. 'जवळजवळ साडेतीनशे वर्षांपूर्वी आजऱ्यात आलेला हा ख्रिश्चन समाज पेरणोली, वाटंगी, साळगाव, धनगरमोळा, शेळप, पारपोली, खानापूर, हालेवाडी अशा अनेक गावांत इथल्या मातीशी एकरूप झाला. जरी ते ख्रिश्चन झाले असले तरी त्यांची सांस्कृतिक जडणघडण मात्र इथल्या लोककला आणि वारकरी परंपरेतूनच घडलेली. गावागावात मंदिरात चाललेल्या भजनात तो तल्लीन होऊन जायचा. दर रविवारी तो चर्चमध्ये ज्या श्रद्धेने जायचा त्याच भक्तिभावाने तो ग्रामदैवातालाही पुजायचा. आजऱ्याच्या चर्चला तसा खूपच जुना इतिहास. सावंतवाडी आणि बेळगाव सोडले तर या परिसरात उभारलेले सर्वात जुने चर्च. जवळजवळ तीन-साडेतीनशे वर्षांचा इतिहास. चर्चच्या दिवाबत्तीचा खर्च चालावा म्हणून मुसोली या गावी इचलकरंजी जहागिरीतून जमीनही मिळालेली.

वारकरी परंपरेचा मोठाचे प्रभाव इथल्या ख्रिश्चनांच्यावर पडलेला. विठ्ठलाच्या ओढीनं जशा वारकऱ्यांच्या दिंड्या पंढरीच्या दिशेनं निघतात त्याच ओढीनं ख्रिश्चनांची दिंडीही ओल्ड गोव्याच्या दिशेनं दरवर्षी निघते. टाळ-मृदुंगाच्या तालावर हजारो लोक अपार श्रद्धेनं या दिंडीत आजही सहभागी होतात. सेंट फ्रान्सिस झेविअरच्या ओढीनं शेकडो मैल अंतर चालत जातात. ख्रिश्चन समाजाबरोबर अन्य जातिधर्माच्या लोकांचाही मोठा सहभाग या दिंडीत असतो. मध्यंतरी काही काळ थांबलेली ही परंपरा पुन्हा एकदा नव्याने फादर प्रभूधरनी पुनरुज्जीवित केली.

'कोकण आणि देशसंस्कृतीचा सुंदर मिलाप आजऱ्याच्या मातीत बघायला मिळतो. मराठी, मालवणी, कोंकणी, दख्खनी, कानडीसह वेगळा चंदगडी बाज असणारी भाषा बोलणारे अनेक धर्मांचे, जातींचे लोक या भागात कित्येक वर्षांपासून राहत आहेत. पश्चिम भागात तळकोकणातील दशावतारी नाटकासह दहिकाला आणि शिमग्याचा उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा होतो. तर पूर्वेकडच्या भागात तमाशाच्या फडाबरोबरच कर्नाटकातील संग्या बाळ्याचाही खेळ त्याच गोडीने रंगतो. वारकरी भजनाच्या जोडीनं सोंगी भजनांनीही आपला लोककलेचा पारंपरिक बाज कायम ठेवला आहे. इथल्या घनदाट जंगलांनी गवळी धनगरांचा संथ लयीतला गज्जोनृत्याचा ठेवा आजही जपून ठेवला आहे.'(पृ.३१)

याबरोबरच धरणग्रस्तांचा चळवळीबरोबरच अनेक चळवळी नव्याने निर्माण झाल्या. कारण लढ्यातून आणि संघर्षातून नवे परिवर्तन घडू शकते हे सिद्ध केले होते. त्यामुळ आजरा तालुक्यात अनेक सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि राजकीय चळवळी निर्माण झाल्या. यामध्ये आरोग्य चळवळ, डंगे गवळी धनगरांची चळवळ, समन्यायी पाणीवाटप चळवळ, सांस्कृतिक चळवळ, जातिअंताची चळवळ, साहित्यसंमेलन अशा चळवळींचा समावेश होतो. या सर्व चळवळींचे सूक्ष्म तपशील लेखकाने आपल्या अनुभवकथनातून नोंदविले आहेत. या चळवळींच्या उभारणीपासून ते कार्यापर्यंत यामधील दिलेल्या कार्यकर्त्यांच्या योगदानाचे तपशीलही पहावयास मिळतात.

हा लोकलढा यशस्वी करण्यासाठी अनेकांचे मोलाचे योगदान आहे. त्याचे अनेक तपशील संपूर्ण लेखनात आले आहेत. स्वतः लेखक, कॉ. भारत पाटणकर, कॉ. धनाजी गुरव, प्रा. विठ्ठल बन्ने, श्रीपतराव शिंदे, राजाभाऊ शिरगुप्पे, प्रा. सुनील गुरव, कॉ. अशोक, रवी शेंडे सारखे असंख्य कार्यकर्ते त्यांचे कामाचे संदर्भ अनेक ठिकाणी आले आहेत. याबरोबर लढ्यासाठी योगदान देणारे शेकडो कार्यकर्तेही पुस्तकात तपशीलरूपाने आले आहेत. 'चित्रिच्या लढ्याचे शिलेदार' या विभागात लढ्याला योगदान देणाऱ्या आणि लढा यशस्वी करणाऱ्या कार्यकर्त्यांविषयी, प्रकल्पग्रस्त गावांमधील, धनगरवाड्यांमधील अनेक लोकांविषयी लेखक संपत देसाई कृतज्ञताभाव व्यक्त करतात.'बाळू दोरूगडे, प्रकाश दोरूगडे, जानू लाड, चंदर भागवत हे सर्व तरुण कार्यकर्ते पुनर्वसनाच्या लढ्यात सक्रिय झालेले. शांताराम लाडांबरोबरच विश्राम कालेकरांची त्यांना साथ मिळत होती. विश्राम कालेकर म्हणजे प्रकाश कालेकरांचा चुलतभाऊ. तसं त्याचं मूळ गाव अवंडी. वडील रायवाड्याला येऊन राहिलेले. आता ते पुरते रायवाडेकर झालेले. विश्राम कालेकरही पूर्वी मुंबईला गिरणीत काम करून आलेला. चार-पाच भाऊ. त्यात हा मुंबई करून आलेला. बाहेरच्या जगाची बऱ्यापैकी माहिती असलेला.

बाहेर राहिल्याने व्यवहारी शहाणपण त्याला कळत होतं. आपला मुद्दा शांतपणे आणि तेवढ्याच ठोसपणे मांडण्याची त्याची सवय. डोक्यावर टोपी आणि काखेला पिशवी अडकवून गंभीरपणे मोर्चात सहभागी होणाऱ्या या माणसाचा संघटनेवर ठाम विश्वास. ज्यांचा संघटनेवर विश्वास असतो तीच माणसं आंदोलन यशस्वी करू शकतात. हे या कार्यकर्त्यांनी दाखवून दिलेलं. स्वतःला सिद्ध करता करता संघटनेलाही सिद्ध केलेलं.

चित्रीच्या या कार्यकर्त्यांना दत्ता गुरव, रवि शेंडे, संजय तर्डेकर, वंदन जाधव, बजरंग पुंडपळ, संजय घाटगे, संभाजी बापट, मारुती सावंत, मारुती पाटील, मारुती चव्हाण, दशरथ घुरे, नारायण भडांगे, हरी सावंत, सुरेश मिटके यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांची साथ मिळत गेलेली. हळूहळू ताकद वाढत गेलेली आणि उद्ध्वस्त झालेल्या चित्री धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाची लढाई बघता बघता त्यांनी टप्प्यात आणली.'(पृ.१६२) याबरोबरच आंदोलनांचे येणारे अनेक तपशील, प्रशासकीय अधिकारी, राजकीय नेते यासर्वांचे सूक्ष्म तपशील आशयाला अधिक बळकटी देणारे ठरतात.

**४.५ एका लोकलढ्याची यशोगाथा - भाषिक विशेष**

कोणत्याही साहित्याच्या मूल्यनिर्णयाच्या दृष्टीने भाषा हा महत्त्वाचा घटक आहे. कोणत्याही साहित्यकृतीची संहिता ही भाषेच्या माध्यमातून आकाराला येत असते. लेखक आपले म्हणने किवा आशय वाचकांपर्यंत पोहचवण्यसाठी परिणामकारक भाषारूपे योजत असतो. पात्रांचे स्वभावविशेष, लेखकाचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन याचाही प्रभाव भाषेवर कळत नकळत होतो. 'एका लोकलढ्याची यशोगाथा' मध्ये संपत देसाई यांनी आपले अनुभवकथनासाठी प्रामुख्याने प्रमाणभाषेचा वापर केला आहे. पण लोकलढ्याचे अनुभव कथन करताना निवेदनाच्या रूपात काही घटना प्रसंगाच्यावेळी भाषेची वेगवेगळी रूपे अगदी सहजपणे आली आहेत. यामध्ये कोणतीही जाणीपूर्वक रचना केली आहे, किंवा भाषेची ओढाताण केली आहे असे दिसून येत नाही. अनुभवकथनामधील सुरवातीच्या काही भागांमध्ये भाषेमधला साधेपणा, सरळपणा दिसून येतो. उदाहरण म्हणून लेखकाने कथन केलेले काही उतारे पाहू.

मी जानबावर उखडलोच, "आज तू जमीन बदलून मागशील, उद्या तुझं बघून दुसराही उठल, म्हातारी मेल्याचं दुःख नाही काळ सोकावंल. आपणच असा धीर सोडला तर लाभक्षेत्रातल्या लोकांना आयती संधी मिळंल. आधीच ते संधी शोधातायत. काय वाट्टेल ते झालं तरी जमीन बदलून घ्यायची नाही आणि तुला जर घ्यायची असेल तर संघटनेचा आणि तुझा इथून पुढे काहीही संबध नाही." अशी आम्ही भूमिका घेतली. जानबा तसा कार्यकर्ता, त्याला याचे काय पडसाद उमटू शकतात याचं भानही होतं. तसा तो लढाऊही होता. (पृ१४६)

तीनही गावे आता नवीन वसाहतीत स्थलांतरित झालेली. नव्या गावात नवा संसार थाटलेला. नव्या परिसराशी, नव्या रानाशी गावे स्वतःला जोडून घेऊ लागलेली. खानापूरच्या गायरानात रायवाड्याची वसाहत तर बुरुड्याच्या माळावर गावठाणवाडीची वसाहत मूळ धरू लागलेली. नव्या रानात मशागतीची कामे चालू झालेली. जुन्या मालकांच्या बरोबर थोड्याफार कुरबुरी चाललेल्या. काही अडथळे येत होते. काही ठिकाणी आम्ही जाऊन वाद मिटवत होतो. तर काही ठिकाणी पोलिसांची मदत घेऊन अडथळे दूर केले जात होते.(पृ.१४३)

पोलिसांच्या गाड्यांची भलीमोठी रांग लागलेली. अर्धा पोलीसफाटा आजऱ्यात तर अर्धा उचंगीच्या माळावर उतरलेला. पावसानं माळावर चिखल झालेला. पावसानं पोलिसांची भलतीच पंचाईत केलेली. डोईवर इरलं घेऊन बाया माळावर अपावसान काही जणींनी तिखटाच्या पुड्याही कंबरेला खोचलेल्या. झुडपाझुडपात दगडांचे ढीग तरुण पोरांनी आधीच रचून ठेवलेले. पोलिसांना पाहाताच माणसांना अधिकच जोर चढलेला. घोषणांनी सारा परिसर दणाणून सोडलेला. (पृ.११०)

कष्टकऱ्यांच्या चळवळीपासून दूरच. चळवळी होत्या पण त्या प्रस्थापित व्यवस्थेचं समर्थन करणाऱ्या. परिवर्तनाच्या चळवळीचा अनुभव नसलेलं हे गाव अचंबित झालेलं. या गावासाठीच नव्हे तर संपूर्ण

तालुक्यालाच हे नवीन होतं. अडीच-तीनहजार कष्टकरी स्त्री-पुरुष पहिल्यांदाच एकत्र जमत होते. आजऱ्याच्या मातीत एका नव्या चळवळीला जन्माला घालत होते... जमिनीला वाफसा आला आणि त्यात पेरणी केली तर पीक तरारून येतं. आजऱ्याच्या मातीलाही आता वाफसा आला होता. चळवळीची पेरणीही बरोबर घातित होत होती. (पृ.५८)

वरील उतारे पाहिले तर लेखकाचे भाषेवरील प्रभूत्व लक्षात येते. ज्याविषयी लेखक कथन करतो त्याविषयीची भाषा निवेदनातून आली आहे. याबरोबरच छोटी छोटी वाक्यरचना, बोलीभाषेंचा वापरही, उपमा, वैशिष्ट्यपूर्ण विशेषणे याची झलक संपत देसाई यांच्या लिखानात दिसून येते. त्याचा उहापोह काही मुद्यांच्या अनुषंगाने करू.

### ४.५.१ आखूड वाक्यबंधाचा वापर

एका लोकलढ्याची शोधयात्रा या अनुभवकथनामध्ये संपत देसाई यांनी छोट्या छोट्या वाक्यरचनांचे उपयोजन केले आहे. अशा वाक्यरचनेमुळे कथाशयाला चित्रमयता प्राप्त झाली आहे. अर्थात लेखकाने हे जाणीवपूर्वक केले आहे असे नाही तर ते कथनाच्या ओघाने आले आहे. प्राचीन साहित्यामध्ये छोटी छोटी वाक्यरचनेचा अवलंब होता. तशा प्रकारची रचना या पुस्तकात आली आहे.

'याच भागातून मध्यम जातीतला शेतकरी मुंबईला गिरण्यांमध्ये कामगार म्हणून गेलेला. तोही आता गावी परतलेला. तो आमच्या सभांना जमत होता. चांगला प्रतिसाद देत होता. आमचा हुरुप आणखीनच वाढत चाललेला. क्रांतिवीर नागनाथआण्णा, डॉ. भारत पाटणकर, बळीरामजी देसाई यांच्या उपस्थितीत परिषद झाली. गावागावातून लोक वाहनं करून स्वतःच्या खर्चानं आलेली. सुरुवातीला लांबूनच पाहणारे काही पुढारी गर्दी बघून हळूहळू सहभागी झाले.'(पृ.१०१)

'पेरणोली हे माझे गाव म्हणजे वारकऱ्यांच गाव. अशी ख्याती पंचक्रोशीत. प्रत्येक घरात हमखास वारकरी भेटणारच. वारकरी संप्रदायाची मोठी परंपरा गावाला लाभलेली. गावात आमच्या घराशेजारी विठ्ठल मंदिर, सकाळ संध्याकाळी तिथे विठ्ठलनामाचा गजर. टाळ-मृदंगाचा नाद ऐकतच आम्ही लहानाचे मोठे झालो. तुकोबाच्या पुण्यतिथीला मोठा सोहळा भरायचा. इथे तुकारामांची पुण्यतिथी साजरी होण्याला दीड-दोनशे वर्षाचा इतिहास. तुकारामाची पुण्यतिथी हाच गावातला सर्वांत मोठा सार्वजनिक उत्सव. गावातल्या माघारणी सुद्धा तुकोबाच्या पुण्यतिथीला माहेरी येतात. जणू तुकोबा त्यांचा बंधुरायाच असल्यासारखा. त्यामुळे परिषद आमच्या गावीच घेण्याचा आम्ही निर्णय घेतला.'(पृ.१०४)

'पाटबंधारे खात्यानेही आता धरणाचे काम सुरू करायची तयारी चालवलेली. त्याची कुणकुण आम्हालाही लागलेली. लोकांची भातकापणी संपलेली. गवतकापणीला वेग आलेला. पोलिसांच्या मदतीनं धरणाचा नारळ फोडायला यंत्रणा कधी येईल ते सांगता येत नव्हतं. तारओहळच्या लोकांना त्याची आता खात्री झालेली. त्यामुळे कामात असले तरी लोकांचं लक्ष मात्र धरणाच्या स्थळाकडे असायचं.'(पृ.११५)

'उचंगीचा माळ माणसांनी फुलून गेलेला. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना माळावर बैलगाड्या सोडलेल्या. पोलिसांच्या गाड्या अगोदरच येऊन थांबलेल्या. जवळ जवळ हजारहून अधिक पोलीस. दीड-दोनशे जवानांची जलदकृती दलाची तुकडी. दीड-दोनशे महिला पोलीस. राखीव दलाची एक तुकडी. अश्रुधुराच्या नळकांड्या सोबत आणलेल्या. काही झालंच तर ॲम्ब्युलस तयार ठेवलेली. बिनतारी संदेशयंत्रणाही सज्ज ठेवलेली. अशा सगळ्या फौजफाट्यासह पोलीस गाड्यांच्या लांबच लांब रांगा लागलेल्या.' (पृ.११६) अशा प्रकारची साधी,

सोपी, सहज आणि सुलभ छोटी वाक्यरचनेमुळे एक प्रकारची परिणामकारकता लेखनात आलेली दिसून येते. हे देसाई यांच्या भाषाशैलीचे वेगळेपण दिसून येते.

### ४.५.२ समर्पक शब्दयोजना

एका लोकलढ्याची यशोगाथा मधील शब्दयोजना समर्पक आहे. ही शब्दयोजना धरणग्रस्ताची चळवळ आणि लोकलढा, आंदोलन, मोर्चा, सभा या साऱ्या विश्वाशी निगडी अशा स्वरूपाची आहे. काही काही ठिकाणी लेखक बोलीरूपांचाही वापर करतो. या शब्दयोजनेतून लेखक एक एक दृश्यचित्र वाचकांसमोर उभे करतो. यामुळे लेखकाने कथन केलेल अनुभवद्रव्य अधिक ठाशीव होताना दिसून येते. लेखकाने वापरलेली शब्दरूपे ही धरणग्रस्तांची चळवळ, आजरा परिसर, तिथला अवकाश सजीव रूपात करताना दिसतात. कॉम्रेड, पुनर्वसन, आराखडा, बुडीतक्षेत्र, विस्थापन, श्रमुद, कार्यकर्ते, घोषणाबाजी, फौजफाटा, परिषद, मोर्चा, मेळावा, सेवाभावी प्रकल्प, लाभक्षेत्र, भूमी संपादन, ठिय्या आंदोलन, ठेकेदार यासारख्या शब्दरूपांमुळे धरणग्रस्तांची चळवळ आणि लढ्याचे चित्र उभे राहते. त्या परिसरातील काही नव्या विशेषणांचा वापरही लेखक करतो. त्यामुळे त्यापरिसरातील बोलीतील वेगळी वैशिष्टये वाचकांसमोर येतात. त्यामध्ये हेलपाटा, रोंबाट, घळभरणी, झपाझपा, इपरीत, गुठ्ठा, घुटमळणे, डांबले (खुंट), शिडशिडीत, झाडझाडोरा, ब्याद, परसाकडे, काकरीसाठी, उखडणे, घरंगळणे सारखे शब्द अर्थाचे थेट वहन करण्याचे काम करतात. त्यामुळे प्रसंग वाचनीय होतात. गज्जी नृत्या या परिसरामध्ये गज्जो नृत्य असा शब्दप्रयोग लेखक वापरताना दिसून येतो. तसेच बाजार म्हणजे दारूची बाटली हे नवे रूप वाचकांसमोर येते. याबरोबरच लटलटाय लागली, पोराटोरांचं लटांबर, आयत्यात कोयता, तरव्याची पेंडी, निपटून जाणे, दूपाकी घरं,कोवळ्या कोंबासारखा, उघडीप दिली, भुवड काढणे, पोस्त करणे. अशा प्रकारच्या रचनेमुळे हे अनुभवकथन अधिक वाचनीय बनले आहे. याबरोबरच तुमचं धरण आमचं मरण, आधी पुनर्वसन मगच धरण, पुरून उरलेंल गाव सारखी सुभाषितवजा वाक्यरचना ठाशीवपणे अनुभवाचे कथन करते.

### ४.५.३ बोलीभाषेचा वापर

संपत देसाई यांनी ‘एका लोकलढ्याची यशोगाथा’ हे अनुभवकथन लिहिताना प्रमाणभाषेचा वापर केला आहे. पण घटना प्रसंगांची मांडणी करताना तसेच निवेदनाच्या अनुषंगानी स्थानिक बोलीचा वापरही केला आहे. ही बोली आजरा परिसरातील भोवतीचा ग्रामअवकाश वाचकांसमोर ठेवते. तसेच प्रकल्पग्रस्तांच्या लढ्याचे कथन करताना काही प्रसंग आणि घटनांच्या अनुषंगानी संवादरूपाने बोलीची रूपे आली आहेत.
अवंडीचे कार्यकर्ते म्हणाले, "चला त्याचं काय ऐकू नका. असे आयत्यात कोयता मारणारे बरेच येत्यात."
कॉम्रेड धनाजी म्हणाला, "ए मामा, बस आता, लई झालं तुझं कौतिक, रस्ता असा मिळत नाही त्यासाठी लढावं लागतंय." (पृ.८३)
"काय करावं तेच आता कळंनासं झालंय, येक साहिब येतुय तो याक सांगतुया तर दुसरा येगळंच..."
कुणीतरी कोपऱ्यातून हलक्या आवाजात पुटपुटलं. पाठोपाठ त्याला दुजोरा देत कोणीतरी बोललं...
"आता आलायसा तर सांगा तुमचंबी काय ते... ऐकताव आणि जाताव... घराकडं." समोर बसलेल्या काही लोकांना आम्ही सरकारी अधिकारीच वाटलो. सुकवे गुरुजी त्यांना मधेच थांबवत म्हणाले, "सदुमा... आगा ही काय धरणाची माणसं नाहीत. ही तुमच्या बाजूनं सरकारच्या विरोधात लढायचं काम करत्यात. त्याबद्दल बोलाय आल्यात."

सुकवे गुरुजींनी खुलासा दिल्यावर काही जणांचे चेहरे निवळले. जरा अंग झटकून मोकळं होऊन ऐकायला बसल्यासारखे नीट बसले.

"आवं काय सांगायचं तुमास्नी? धरणाची भीत आता घराच्या परड्याला येवून लागलीया. अजून जमिनीचा तुकडा दिलेला नाही तवर उठा म्हणत्यात. पोलिसांचंबी भ्या दावत्यात." पांडू राणे अडखळत अडखळत बोलला.

त्याला अडवत मधेच विश्राम कालेकर म्हणाला, "पांडूदा, आगा तू जमिनीसाठी पैसे तरी भरलाइस व्हय गा..."

"आगा मी भराय नाही खरं इतरांनी भरल्यात न्हवं.... तेचं काय ?" पांडू राणेंनी इतरांची काळजी बोलून दाखवली. मधेच तेचं बोलणं तोडत शांतराम लाड म्हणाले, "आता तुमचं रामायण पुरे.... सायेब तुम्ही बोला."(पृ.५२)

शेवटी मीच म्हटलं, "सगळयास्नी घेवून आल्यासा काय एव्हढं काम काढल्यासा?'

त्यानं सगळयांच्या तोंडाकडे पाहिलं. कचरत कचरतच तो म्हणाला, 'गावात देऊळ बांधायचं म्हनताव तवा तुमच्याशी बोलायचं म्हणून आलावात.'

"मग हे सांगायला एव्हढं का घुटमाळत्यासा, बांधा की देऊळ... कुठलं बांधत्यासा?' कॉम्रेड धनाजी असं म्हणताच सगळ्यांना एकदम तोंड फुटलं.

'तसं काय ठराय नाय तुमास्नी इचारून बांधायचं म्हणून आलाव हाय.' (पृ.१६७)

वरील संवाद पाहिले तर आजरा परिसरातील ग्रामीण लोकांच्या दैनंदिन व्यवहारातील बोलीतील अनेक रूपे पहावयास मिळतात. आयत्यात कोयता, कौतिक, येतुय, याक सांगतुया, आलायसा, ऐकताव, जाताव, तुमास्नी, भरलाइस, आल्यासा, एव्हढं, काढल्यासा, म्हनताव, आलावात, घुटमाळत्यासा, बांधत्यासा, इचारून अशी वैशिष्ट्यपूर्ण रूपे या पहावयास मिळतात.

**४.६ शब्दार्थ व स्पष्टीकरण :**

रोंबाट -आजरा परिसरातील गावांमध्ये शिमग्याच्या सणात गावातील मुख्य चौकात वर्षभर घडलेल्या बऱ्या वाईट घटनांची जाहीर चर्चा केली जाते. त्याला रोंबाट म्हणतात.

भूवड- सामुदायिकरित्या परंपरा म्हणून शिकारीसाठी रान उठविणे

कुणबी - कोरडवाहू शेती करणारे लोक

डंगे धनगर - घनदाट जंगलात राहणारे धनगर

घळभरणी- नदीचे पाणी अडवून साठविण्यासाठी घातलेले घातलेले मातीचे बांध

देवराई - देवाच्या नावाने राखून ठेवलेले जंगल

**४.७ स्वाध्याय :**

अ) दीर्घोत्तरी प्रश्न (१५ गुण)

१. एका लोकलढ्याची यशोगाथा या संपत देसाई यांच्या पुस्तकाचा कथनाचा आकृतिबंध स्पष्ट करा.

२. एका लोकलढ्याची यशोगाथा या संपत देसाई यांच्या पुस्तकाची लेखनशैली स्पष्ट करा.

३. एका लोकलढ्याची यशोगाथा या संपत देसाई यांच्या पुस्तकाची भाषिक विशेष सोदाहर सांगा

**ब) लघुत्तरी प्रश्न (१० गुण)**

१. एका लोकलढ्याची यशोगाथा मधील बोलीभाषेचे स्वरूप विषद करा.

२. आजरा गावाचे भौगोलिक, सामाजिक व राजकीय स्वरूप लेखकान कसे वर्णन केले आहे ते सांगा.

३. एका लोकलढ्याची यशोगाथा मधील प्रसंगचित्रण थोड्यात स्पष्ट करा.

**क) टीपा (१० गुण)**

१. चव्हाटा, शिमगा आणि रोंबाट

२. निवेदनशैली

३. संवाद

**२.८ संदर्भ ग्रंथ**

१. पानसरे, मेघा; मोरे, नंदकुमार (संपा) : महाराष्ट्र : काही प्रश्न आणि आंदोलने, श्रमिक प्रतिष्ठान, कोल्हापूर, २०२४.

२. भोळे, भा.ल.; बेडकीहाळ, किशोर (संपा) : बदलता महाराष्ट्र, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अकादमी, सातारा.

३. मोकाशी, सयाजीराजे (संपा) : महाराष्ट्रातील लोकचळवळी, नागनालंदा प्रकाशन, इस्लामपूर २०१८.